नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९१२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५५ * अंक १९५ * * नागपूर * गुरुवार, दिनांक १६ ऑक्टोबर २०२५ | पुरवणीसह पाने ८ | किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

## जेडीयूकडून ५७ उमेदवारांची यादी जाहीर

■ वृत्तसंस्था, पटना, दि. १५ :
जेडीयूने बुधवारी ५७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. या यादीत, जेडीयूने तीन बाहुबली नेत्यांना तिकीट दिले आहेः मोकामा येथून अनंत सिंह, एकमा येथून धुमल सिंह आणि कुचाकोट येथून अमरेंद्र पांडे. दहा अनुसूचित जातीचे उमेदवार उभे करण्यात आले आहेत.

विजय कुमार चौधरी यांचा मुलगा सराईरंजन येथून निवडणूक लढवणार असल्याचे वृत्त होते, परंतु पक्षाने पुन्हा मंत्री विजय चौधरी यांना उमेदवारी दिली आहे. २०२० च्या निवडणुकीत १२ मतांच्या कमी फरकाने विजयी झालेले कृष्णा मुरारी शरण उर्फ प्रेम मुखिया यांना हिल्सा येथून पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे.

अग्राग्रलेख

**खरीखरी..**

## शरणासन्न नक्षली

आपल्या केंद्रीय गृहमंत्र्यांनी येणाऱ्या मार्चपूर्वी नक्षल चळवळीला 'क्विक मार्च' करून संपवून टाकू असे घोषित केले होते. आपल्या देशातील जंगल म्हणजे नक्षलवाद्यांचे शरणस्थान होते, महाराष्ट्रातील गडचिरोली सारखा जिल्हा तर संपूर्णपणे नक्षलग्रस्त होता. विशेष म्हणजे आज नक्षलवाद्यांचे मस्तक (मास्टरमाईंड) असलेला अगदी चांगला शिकला सवरलेला भूपती उर्फ सोनू शरण आला आणि त्यामुळेच गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलवाद आता केवळ नावापुरताच शिल्लक उरलेला आहे. १९७६ सालापासून नक्षलवाद्यांचे आंदोलन म्हणजे त्यांच्या भाषेत सर्वहाराचे आंदोलन होते. भारतातील नक्षल चळवळीचा आधारस्तंभ म्हणून मानलेल्या भूपती उर्फ मल्लोजुला रेणु गोपाळराव आज ६० सोबत्यांसह शरण आलेला आहे. नक्षलवादी चळवळीला हा आता जवळजवळ शेवटचा हादरा आहे. १९५५ साला दरम्यान तत्कालीन आंध्र प्रदेशामध्ये जमीनदारांविरुद्ध मोठे आंदोलन उभारण्यामध्ये डावे पक्षच आघाडीवर होते, त्याकाळी आचार्य विनोबाजी भावे यांनी त्याच राज्यात भूदान आंदोलन अगदी मोठ्या प्रमाणात सुरू केल्यामुळे बड्या बड्या जमीनदारांनी आपली बरीच शेती लोकांना दान केली होती. त्यामुळे काही काळ त्यांचे म्हणजेच नक्षल्यांचे आंदोलन थांबले होते परंतु , त्यानंतर त्यांनी अत्यंत पद्धतशीरपणे पश्चिम बंगालच्या नक्षलवादी ठिकाणांपासून पुन्हा आंदोलनाची सुरुवात केली. जवळजवळ ५० वर्षे नक्षलवादी चळवळीने भारतामध्ये एवढी दहशत निर्माण केली होती की, त्या दहशतीपायी देशाचा काही भाग ज्यामध्ये मोठी मोठी जंगले होती. तो जणू काही भारतात नव्हताच परंतु, आज शरणागती पत्करलेल्या भूपतीचे संपूर्ण कुटुंब या चळवळीत सामील होते. त्यामध्ये त्याचा मोठा भाऊ किशन हाही नक्षली चळवळीचा मोठा नेता होता. तो १४ वर्षांपूर्वी पोलीस चकमकीमध्ये मारला गेला. तसेही यापूर्वीचे आणि आताचे सर्व नक्षलवादी माजी सैनिकांकडून लष्करी शिक्षण घेतलेले आहेत. चार महिन्यांपूर्वी नक्षल चळवळीत प्रभावी असलेली महिला म्हणजेच विमला श्रीराम उर्फ ताराक्का हिने आत्मसमर्पण केले होते. ताराक्का ही भूपतीची बायको आणि सुजाता ही त्याची भावजई आहे. आता यांनी आत्मसमर्पण केल्यावर भूपती मधील पती या तीरावर आणि बायको त्या तीरावर हे तसेही फार काळ चालणार नव्हते. आपल्या केंद्रीय गृहमंत्री यांनी मार्च २०२६ ची मुदत दिली होती. त्यामुळे भावाची बायको विधवा झाल्यावर आपल्या बायकोलाही विधवा करू नये, असा कदाचित भूपतीचा विचार असावा.

▶▶ पान ८ वर

## निवडणूक आयोगाविरोधात
# विरोधी पक्ष आक्रमक



■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ :
राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगाविरोधात आक्रमक भूमिका घेतली आहे. काल वरिष्ठ नेत्यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीनंतर समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने आज पुन्हा एकदा विरोधकांच्या सर्वपक्षीय शिष्टमंडळाची राज्य निवडणूक आयुक्त आणि राज्य निवडणूक मुख्य अधिका ?्यांसोबत सुमारे तासभर बैठक झाली.

या बैठकीत ठाकरे बंधूंनी निवडणूक अधिकाऱ्यांना चांगलेच धारेवर धरले. व्हीव्हीपॅट नसेल तर बॅलेटवर निवडणुका घ्या, अशी मागणी ठाकरे बंधूंनी आयोगाकडे केली. तर मतदार याद्यांमधील घोळावरून शेकापचे जयंत पाटील चांगलेच आक्रमक झाल्याचे दिसून आले.

### तोपर्यंत निवडणुकाच घेऊ नका...



राजकीय पक्षांना शेवटची मतदार यादी का दाखवत नाही? मतदार नोंदणी बंद करून लपवाछपवी कशासाठी? असे थेट भिडणारे प्रश्न राज ठाकरे यांनी निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांना विचारले. निवडणूक आयोगाच्या उत्तराने समाधान न झाल्याने राज ठाकरे यांनी थेट तुम्ही निवडणुकाच घेऊ नका असा वर्मी लागणारा घाव घातला.

सर्व राजकीय पक्षांचं एकमत होत नाही, तोपर्यंत निवडणूक घेऊ नका. सत्तेतील तीन पक्षांसाठी तुम्ही काम करत नाही असं राज ठाकरेंनी निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांना सुनावलं. आमचं तुमचं करू नका, आमच्यासाठी निवडणूक आयोग एकच असं राज ठाकरे म्हणाले. राजकीय पक्षांना क्लिअर झाल्याशिवाय निवडणूक घेऊ नका. निवडणूक कार्यक्रम रद्द करा अशी मागणी राज ठाकरे यांनी केली.

महाराष्ट्रात एकेका मतदाराला ८-८ वेळा मतदानाचा हक्क देण्यात आला आहे. त्यामुळे राज्य व केंद्रीय निवडणूक आयोगाचे सर्व्हर महाराष्ट्रात दुसरेच कुणीतरी ऑपरेट करत असल्याचा संशय आहे, असा आरोप जयंत पाटील यांनी केला.

ते म्हणाले, आम्ही महाराष्ट्रातील सर्व विरोधी पक्षांनी महाराष्ट्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यांना आम्ही एक निवेदन दिले. त्याद्वारे त्यांना महाराष्ट्रातील मतदारयाद्यांमधील अनेक चुका दाखवल्या. त्यावर त्यांनी सीओ यांनी आम्हाला हा मुद्दा केंद्रीय

▶▶ पान ८ वर

## माओवाद पर्वाच्या समाप्तीची सुरुवात

सर्वोच्च नेता भूपतीसह ६१ माओवाद्यांचे मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत सशस्र आत्मसमर्पण

मुख्यमंत्र्यांकडून गडचिरोली पोलिसांना १ कोटींचे बक्षीस जाहीर



■ महासागर प्रतिनिधी, गडचिरोली, दि. १५ :
केंद्र व राज्य शासनाच्या प्रयत्नातून माओवादी केंद्रीय समितीच्या अनेक जहाल वरिष्ठांसह एकूण ६१ सदस्यांनी सशस्त्र आत्मसमर्पण केले. ही माओवादाच्या समाप्तीची सुरुवात असून माओवाद १०० टक्के हद्दपार होणार, अशा परिस्थितीत आपण पोहोचलो असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितले. या लढाईचे नेतृत्व गडचिरोली जिल्हा करत आहे, हा महाराष्ट्रासाठी अभिमानाचा मुद्दा आहे असल्याचाही उल्लेख त्यांनी केला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत गडचिरोली येथे साडेपाच कोटींहून अधिक बक्षीस असलेल्या नक्षल चळवळीतील सर्वोच्च नेता भूपती उर्फ मल्लोजुल्ला वेणूगोपालराव याच्यासह माओवादी केंद्रीय समितीच्या दोन डिकेएसझेडसी सदस्य, १० डिव्हीसीएम दर्जाच्या वरिष्ठ कॅडरसह एकूण ६१ जहाल माओवादी सदस्यांनी सशस्त्र आत्मसमर्पण केले. त्यांनी ५४ अग्निशस्त्रांसह व माओवादी गणवेशात मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समोर आत्मसमर्पण केले. या सर्व आत्मसमर्पित माओवाद्यांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते संविधानाची प्रत देऊन लोकशाहीच्या मुख्य प्रवाहात स्वागत करण्यात आले.

पोलिस महासंचालक रश्मि शुक्ला, राज्य गुप्त वार्ताचे आयुक्त शिरीष जैन, अप्पर पोलीस महासंचालक विशेष कृती डॉ. छेरिंग दोरजे, विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, जिल्हाधिकारी अविश्यंत पंडा, आमदार डॉ. मिलिंद नरोटे, पोलिस उपमहानिरीक्षक अंकित गोयल, जिल्हा पोलिस अधीक्षक निलोत्पल, केंद्रीय रिझर्व पुलिस बल उप महानिरीक्षक (परिचालन) अजय शर्मा, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुहास गाडे प्रामुख्याने उपस्थित होते.


▶▶ पान ८ वर

## २० जणांची ओळख पटविण्यासाठी डीएनए सॅम्पलिंग सुरू

■ वृत्तसंस्था, जैसलमेर, दि. १५ :
राजस्थानातील जैसलमेर येथे बस आगीत बळी पडलेल्या २० जणांची ओळख पटविण्यासाठी डीएनए सॅम्पलिंग सुरू झाले आहे. प्रियजनांचा शोध घेणाऱ्या कुटुंबातील दोन सदस्यांचे नमुने घेतले जात आहेत.

जोधपूरमधील महात्मा गांधी रुग्णालय आणि जैसलमेरमधील जवाहर रुग्णालयात डीएनए सॅम्पलिंगची व्यवस्था करण्यात आली आहे. यापूर्वी, मंगळवारी रात्री उशिरा, जैसलमेरहून १९ मृतदेह जोधपूरला आणण्यात आले. त्यापैकी फक्त हाडे असलेले एक पोते होते. एका व्यक्तीचा मृतदेह आधीच जोधपूरमध्ये होता.

मंगळवारी दुपारी ३:३० वाजता, जैसलमेर-जोधपूर महामार्गावर एका एसी स्लीपर बसला आग लागली. या अपघातात वीस प्रवासी जिवंत जळाले. मृतदेह बसच्या मध्ये अडकले होते.






## पॅनल सिस्टिम म्हणजे भाजपचा घोटाळ्याचा फॉर्म्युला!



■ **मुंबई:** मुंबईमध्ये व्हीव्हीपॅट एस्ट मशीन देणं जर निवडणूक आयोगाला शक्य नसेल तर काल आम्ही सर्वांनी जी मागणी केली बॅलेट पेपरवर निवडणुका घ्या त्याला का घाबरत आहात तुम्ही असा सवाल ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी केला आहे. मुंबईमध्ये तरी बॅलेटवर निवडणुका घेतल्या पाहिजे. मी तर म्हणेल की संपूर्ण महाराष्ट्रात बॅलेट पेपरवर निवडणुका घेतल्या पाहिजेत.

संजय राऊत म्हणाले की, यापूर्वी महाराष्ट्रात एकास एक निवडणूक झाली आहे. कशाला पाहिजे पॅनल सिस्टिम हे भाजप वाल्यांनी निवडणुकीत घोळ करण्याचे फंड आणले आहे. एकाच भागात ४ नगरसेवक लोकांनी जायचे कुणाकडे. नाशिक, ठाण्यात एकाच भागाला ४ नगरसेवक हा बकवास पणा आहे. निवडणूक ही एकास एक असते. मुंबईमध्ये जशी एकास एक निवडणूक आहे तशी जर संपूर्ण महाराष्ट्रात झाली तर यांचा पराभव होईल. पॅनल सिस्टिम? हा बकवास आहे.

संजय राऊत म्हणाले की, २० हजार मतदार मी बाहेरुन आणले असे मिंधे गटाचा निवडून आलेला आमदार सांगतो आहे.याची दखल घ्यायला नको का? आमची लढाई तिथे सुरू आहे. पैठण मतदारसंघात ५६ हजार मतदान बोगस आणि बाहेरुन आणण्यात आले आहे. आमदारांनी २० हजारांचा आकडा दिला आहे.

**शिंदे, फडणवीसांकडे दुर्लक्ष करा**

संजय राऊत म्हणाले की, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे यांनी काहीही केलेले नाही. त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करा. फडणवीसांना महाराष्ट्रातील २५ वर्षे खासदार असलेला माणूस मराठी नसेल तर त्यांच्यावर उपचार करण्याची गरज आहे. आम्ही मुंबईतील वाडावाडीतील आकडे दाखवत आहोत. आम्ही दिवसभर मतदारयादीवर काम करत आहोत राजकीय कार्यकर्ते तुम्हाला काय मुर्ख वाटत आहे का? निवडणूक आयोगाकडे काय यंत्रणा आहे? निवडणूक आयोग भाजपची यंत्रणा वापरत आहे. ते भाजपचे बटीक झाले आहे.

## दोन माजी आमदारांचा शिंदेसेनेत प्रवेश

■ **मुंबई:** जळगाव जिल्ह्यातील अमळनेर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार शिरीष चौधरी आणि हिंगोली विधानसभा मतदारसंघाचे काँग्रेसचे माजी आमदार हरीभाऊ पाटील गोरेगावकर यांनी आज शिवसेनेत प्रवेश केला. शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. त्यामुळे भाजप आणि काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे.

गेल्या काही निवडणुकांमध्ये माजी अपक्ष आमदार शिरीष चौधरी यांचा भाजपला पाठिंबा होता. त्यामुळे आता अमळनेरमध्ये भाजपला मोठा धक्का बसला आहे. चौधरी स्थानिक कार्यकर्त्यांच्या राजकारणाला कंटाळून शिवसेनेत प्रवेश केल्याचे समोर आले आहे. चौधरी यांच्यासह उबाठा गटाचे अमळनेरचे माजी नगरसेवक गुलाब पाटील, माजी शहरप्रमुख प्रवीण पाठक, माजी प्रभारी नगराध्यक्ष अनिल महाजन, माजी सभापती श्रीराम चौधरी, माजी सभापती देविदास महाजन, माजी नगरसेवक पंकज चौधरी, महेश जाधव, किरण बागुल, बाळासाहेब संघानीय, साखरलाल महाजन यांनी शिंदेसेनेत प्रवेश केला.

# पात्र गावांना सामूहिक वनहक्क मिळणार

### ५०% हून जास्त आदिवासी लोकसंख्येच्या गावांचाही 'पेसा'मध्ये समावेश करा : अजित पवार



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :**
राज्यात सुमारे १७ हजार गावे सामुदायिक वन हक्क मिळण्यासाठी पात्र असून आतापर्यंत केवळ ५ हजार गावांना सामुदायिक वन हक्क देण्यात आले आहेत. उर्वरित गावांना सामुदायिक वन हक्क देण्यासंदर्भात आदिवासी विकास व अन्य सर्व संबंधित यंत्रणांनी प्राधान्याने कार्यवाही करावी. वंचित आदिवासी, गरीब समाजाला सर्व योजनांचे लाभ द्यावेत. अंशतः वन हक्काच्या पात्र दाव्यांवर तातडीने सुनावणी घेऊन जळगाव, धुळे, नंदुरबार जिल्हाधिकाऱ्यांनी ते निकाली काढावेत, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या समिती कक्षात वन हक्क कायदा २००६ च्या प्रभावी अंमलबजावणी संदर्भात तसेच जळगाव, धुळे,नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासींच्या विविध विषयासंदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला आदिवासी विकास मंत्री अशोक ऊईके, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, क्रीडा व युवक कल्याण मंत्री माणिकराव कोकाटे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, लोक संघर्ष समितीच्या प्रमुख प्रतिभाताई शिंदे, आदिवासी विकास विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, आदिवासी वनपट्टेधारकांना सातबारा प्रमाणे पीक कर्ज, गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना, वारसा हक्क आदी योजनांचा लाभ मिळवून द्यावा. वनपट्टे धारकांना फार्मर आयडी ओळखपत्र मिळेपर्यंत आधार कार्डवर आधारित लाभ देण्यात यावे.

वनपट्टा मिळाल्यानंतर एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यास त्याच्या वारसांनी लाभ मिळावा. वनपट्टेधारकांच्या पिकांचे नुकसान झाल्यास त्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी. यासाठी शासन निर्णयात योग्य त्या सुधारणा करण्यात याव्यात. राज्यातील सर्व वनपट्टेधारकांना त्यांच्या मागणीनुसार विविध कार्यकारी सोसायटीचे सदस्य करून कर्ज पुरवठा करावा.

जळगाव जिल्ह्यात 'पेसा' क्षेत्र वगळता उर्वरित काही तालुक्यांमध्ये नऊ लाखापेक्षा जास्त आदिवासींची संख्या असून त्यांच्यासाठी एरंडोल हे मध्यवर्ती ठिकाण असल्यामुळे या ठिकाणी आदिवासी विकास विभागाचे उप प्रकल्प कार्यालय सुरू करण्यासंदर्भात प्रस्ताव सादर करावा, असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले.

पंचायत विस्तार (अनुसूचित क्षेत्र) (पेसा) मध्ये १ हजार ७३४ आदिवासी बहुल गावांचा नव्याने समावेश करण्याबाबत केंद्र सरकारकडे नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यापर्यंत प्रस्ताव पाठवावा. जंगल नसलेल्या परंतु ५० टक्के पेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्येच्या गावांचाही 'पेसा'मध्ये समावेश करावा. प्रधानमंत्री आवास योजनेची सर्व महानगरपालिका, नगरपालिका, ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये प्रभावीपणे अंमलबजावणी करून नियमाप्रमाणे सर्व कब्जाधारकांना जमिनीचा मालकी हक्क मिळण्यासंदर्भातील अडचणी दूर करून त्यांना घरे देण्यात यावीत, असे निर्देशही पवार यांनी या बैठकीत दिले.

जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यात वन हक्कधारकांनी उत्पादित केलेल्या शेतमालावर आधारित महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास कार्यक्रमांतर्गत क्लस्टर उभे करणे, भिल्ल समाजाचे स्वतंत्र बेंच मार्क सर्वेक्षण करणे, इत्यादी विषयांवरही या बैठकीत चर्चा करण्यात आली.

## उद्धव ठाकरेंनी घेतली एकनाथ शिंदेंची जागा



■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १५ :**
माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे मनसेच्या दीपोत्सव कार्यक्रमात हजेरी लावणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार उद्धव ठाकरे यांच्याच हस्ते या दीपोत्सवाचे उद्घाटन होणार आहे.

काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मनसे आणि शिवसेनेचा ठाकरे गट एकत्र येऊन निवडणूक लढवण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. याच कथित युतीला मूर्त रुप देण्यासाठी मनसेचे प्रमुख राज ठाकरे आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे अनेकवेळा एकत्र आले आहेत. अगदी दोन दिवसांपूर्वी राज ठाकरे मातोश्रीवर उद्धव ठाकरे यांनी भेटले होते. ही एक कौटुंबिक भेट होती. असे असतानाच आता उद्धव ठाकरे मनसेच्या दीपोत्सव कार्यक्रमाचे उद्घाटन करणार आहेत.

येत्या १७ ऑक्टोबर रोजी संध्याकाळी ६.३० वाजता मनसेच्या दीपोत्सव कार्यक्रमाचे उद्घाटन केले जाणार आहे. दरवर्षी हा कार्यक्रम मुंबईतल्या शिवाजी पार्कवर आयोजित केला जातो. या कार्यक्रमात दीपावलीनिमित्त आकर्षक रोषणाई केली जाते. याच कार्यक्रमाचे उद्घाटन उद्धव ठाकरे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी राज ठाकरे हेदेखील उपस्थित असतील. म्हणजेच दोन्ही ठाकरे बंधू पुन्हा एकदा महाराष्ट्राला एकत्र दिसणार आहेत. या कार्यक्रमात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे भाषण करण्याचीही शक्यता आहे.

याआधी २०२२ साली मनसेच्या दीपोत्सव कार्यक्रमाचे उद्घाटन एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले होते. आता त्यांचीच जागा यावेळी उद्धव ठाकरे यांनी घेतली आहे.

या कार्यक्रमाची एक निमंत्रण पत्रिकादेखील समोर आली आहे. या निमंत्रण पत्रिकेवर उद्धव ठाकरे यांचे नाव आहे. उद्धव ठाकरे यांच्या नावापुढे शिवसेना पक्षप्रमुख असा उल्लेखही आहे. मनसेच्या दीपोत्सव कार्यक्रमाची दरवर्षी चर्चा असते. याआधीच्या दीपोत्सवात सध्या मुख्यमंत्री असलेले देवेंद्र फडणवीस तसेच सध्या उपमुख्यमंत्री असलेले एकनाथ शिंदे यांनीदेखील हजेरी लावलेली आहे. मनसेच्या या दीपोत्सवात वेगवेगळे कलाकारदेखील उपस्थित असतात. असे असतानाच आता उद्धव ठाकरे यांच्या हस्ते मनसेच्या दीपोत्सवाचे उद्घाटन होणार असल्याने या कार्यक्रमाला विशेष महत्त्व आले आहे. त्यामुळे आता पुढे काय होणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## मुंबईत कबुतरखान्यांवरील बंदीवरून वाद चिघळला

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :**
मुंबईत कबुतरखान्यांवरील प्रशासनाची कारवाई आणि कबुतरांना खाऊ देण्यावर घातलेली बंदी यावरून वाद अधिक चिघळला आहे. नागरिकांच्या आरोग्याला धोका असल्याचे कारण देत महानगरपालिकेने अनेक कबुतरखाने बंद केले, तसेच कबुतरांना अन्न देऊ नये, असे आवाहन केले.




मात्र, पेटा इंडिया या प्राणीसंवर्धन संस्थेने या निर्णयाला तीव्र विरोध दर्शवला असून, या विरोधासाठी त्यांनी सोशल मीडियावर एक अनोखा व्हिडिओ शेअर करत आंदोलनाचा नवा मार्ग निवडला आहे.

पेटा इंडियाने शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये काही लोक कबुतरांचे मुखवटे घालून मुंबईकरांच्या दैनंदिन जीवनातील कामे करताना दिसतात. ट्रेनने प्रवास, फुले आणि वडापाव खरेदी, टॅक्सी चालवणे, बाजारात फिरणे इत्यादी दृश्यांमधून कबुतर सुद्धा मुंबईकरांसारखेच आहेत, हा भावनिक संदेश दिला गेला आहे. या व्हिडिओचा उद्देश म्हणजे, कबुतरांबद्दल सहानुभूती निर्माण करणे आणि मुंबई उच्च न्यायालयाने शहरातील कबुतरखान्यांवरील खाद्यबंदीचा निर्णय मागे घ्यावा, अशी मागणी मांडण आहे.

पेटा इंडियाचे म्हणणे आहे की, कबुतरांना अन्न न दिल्याने ते उपासमारीचा सामना करत आहेत. खाद्यबंदी हा अन्यायकारक निर्णय असून, या सौम्य पक्ष्यांच्या जिवावर बेतणारा ठरू शकतो. कबुतरांना खायला घालणे हे केवळ दयाळूपणाचे कृत्य नाही; अनेक मुंबईकरांसाठी ही एक आध्यात्मिक परंपरा आहे. संस्थेने मागणी केली आहे की, खाद्यबंदीऐवजी कबुतरांसाठी ठरावीक वेळेत, नियोजित ठिकाणी आहार आणि साफसफाईची व्यवस्था केली जावी.

मुंबईतील काही वैद्यकीय संस्थांच्या आकडेवारीनुसार, २०२४ मध्ये श्वसन आजारांपैकी फक्त ०.३% प्रकरणे कबुतरांच्या संपकार्शी संबंधित होती. पेटाने आपल्या निवेदनात स्पष्ट केले आहे की, कोणत्याही प्राण्याला अनावश्यक त्रास देणे हे बेकायदेशीर आहे. प्रशासनाने घेतलेल्या कबुतरखाना बंदीच्या निर्णयाला मानवी मूल्यांच्या विरोधात ठरवले पाहिजे, असे पेटाचे म्हणणे आहे.

## आदिवासी भूषण पुरस्कारसाठी प्रस्ताव सादर करण्यास मुदतवाढ

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :**
आदिवासी कल्याण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती आणि सामाजिक संस्थांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी आदिवासी विकास विभागामार्फत भगवान बिरसा मुंडा आदिवासी भूषण पुरस्कार तसेच भगवान बिरसा मुंडा आदिवासी भूषण संस्था पुरस्कार देण्यात येतात. या पुरस्कारांसाठी प्रस्ताव स्वीकारण्यासाठी २५ ऑक्टोबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. जास्तीत जास्त व्यक्ती आणि संस्थानी प्रस्ताव प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात सादर करावेत असे आवाहन आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी केले आहे.

मंत्री डॉ. अशोक उईके यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात भगवान बिरसा मुंडा आदिवासी भूषण पुरस्कार देण्याकरिता गठीत समितीची बैठक झाली. 30 ३० ऑक्टोबर २०२५ पर्यंत या पुरस्कारांची छाननी प्रक्रिया होणार आहे. अधिक माहितीसाठी व्यक्ती व संस्थांनी प्रकल्प कार्यालयाशी संपर्क साधावा.

## कात्रज घाट वळणावर भीषण अपघातात दोघे ठार

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १५ :**
कात्रज घाट वळणावर दुचाकी व पीएमपीएमएलचा अपघात झाला. या अपघातामध्ये दुचाकी वरील दोघांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती आंबेगाव पोलिसांनी दिली. कात्रज आगाराची कात्रज सारोळा कात्रज ही बस ससेवाडी वरून पुण्याकडे येत असताना दुचाकी देखील त्याच बाजूने जात होती. पीएमटीने दुचाकीला पाठीमागून जोरात धडक दिल्याने अपघात झाला. या अपघातात आकाश रामदास गोगावले (वय २९), रा. ससेवाडी ता. भोर व अनुष्का प्रकाश वाडकर (वय २७) यांचा मृत्यू झाला असून असून नेहा कैलास गोगावले (वय २० वर्ष रा.ससेवाडी ता. भोर) या जखमी असून त्यांच्यावर भारती हॉस्पिटल येथे उपचार चालू आहेत.

## भारतरत्न डॉ. अब्दुल कलाम यांना अभिवादन



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :**
भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्ताने मंत्रालयात सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव सचिव मनीषा वर्मा यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार व फुले अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे विशेष चौकशी अधिकारी-२, सचिव पंकज कुमार, उपसचिव हेमंत डांगे, अवर सचिव गोविंद साबणे, सहायक कक्ष अधिकारी राजेंद्र बच्छाव, विजय शिंदे यांनीही डॉ अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले. यावेळी मंत्रालयातील विविध विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## मंत्रालयात वाचन प्रेरणा दिन साजरा





■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :**
ग्रंथ हे मनुष्याचे मित्र असावेत. प्रत्येकाने सतत वाचत राहिले पाहिजे. ही वाचनाची सवय मनुष्याला ज्ञान समृद्धी मिळवून देत असल्याचे प्रतिपादन मराठी भाषा विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांनी केले. वाचन प्रेरणा दिनानिमित्त मंत्रालयात आयोजित ग्रंथ प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

माजी राष्ट्रपती ए. पी. जे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त १५ ऑक्टोबर वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात येतो. या दिनानिमित्ताने मराठी भाषा विभाग, भाषा संचालनालय यांच्यावतीने मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी सचिव श्री. कुलकर्णी बोलत होते. सुरुवातीला माजी राष्ट्रपती डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला उपस्थित मान्यवरांनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

कार्यक्रमास कौशल्य विकास विभागाचे प्रधान सचिव मनीषा वर्मा, गृह विभागाचे प्रधान सचिव राधिका रस्तोगी, साहित्य मंडळाच्या सचिव मीनाक्षी पाटील, भाषा संचालक अरुण गीते आदी उपस्थित होते.

## : स्तन कॅन्सर : वास्तव

**डॉ. भाऊसाहेब बकाने**
आस्था सर्जीकल व कॅन्सर हॉस्पीटल, वर्धा.

कॅन्सर (कर्करोग) हा शब्द उच्चारताच अंगावर शहारे येतात व तसे स्वाभाविक आहे. वाचे कारण म्हणजे कॅन्सरच्या निदाणानंतर उपाराकरिता होणारा आर्थिक खर्च व उपचार नंतर फलिताची अनिश्चितता तसेच रुग्ण व कुटुंबाला होणारा मानसिक व शारिरीक त्रास हे आहे.

स्तन कॅन्सर हा जगभरातील स्त्रीयांमध्ये होणाऱ्या कॅन्सर पैकी पहिल्या क्रमांकाचा कॅन्सर आहे दोन दशंकापुर्वी भारत देशात योनि-मार्गाच्या कॅन्सरचे प्रमाण हे स्तन कॅन्सर पेक्षा जास्त होते. सध्यास्थितीत स्तन कॅन्सर भारतीय स्त्रियांमध्ये आढळणारा सर्वात जास्त प्रमाणाचा कॅन्सर आहे. २८ पैकी एका स्त्रीला स्तन कॅन्सर होण्याची भविष्यात शक्यता आहे. यावरुन असे लक्षात येते की स्तन कॅन्सर रुग्णाचे प्रमाण हे आपल्या देशात भविष्यात मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता आहे.

भारत व इत्तर विकसनशिल देशाच्या तुलनेत विकसीत देशांमध्ये स्तन कॅन्सर चे रुग्ण जास्त असले तरीही विकसित देशांमध्ये स्तन कॅन्सर मुळे मृत्युमुखी पडणाऱ्यांची संख्या कमी आहे. याचे विश्लेषण केले असता असे निदर्शनास येते कि स्तन कॅन्सरचे निदान व उपचार हे पाश्चिमात्य देशांमध्ये आजार प्राथमिक अवस्थेत असतांना केला जातो. याउलट आपल्या देशात शेवटच्या स्टेज ३ व ४ मध्ये निदान व उपचारा करिता येणाऱ्या रुग्णाची संख्या हि फार मोठ्या प्रमाणात आहे. अलिकडे सुशिक्षित व शहरीभागातील रुग्ण प्राथमिक अवस्थेत येत असल्याचे दिसून येते व हा आशेचा किरण आहे.

मात्र आजतागत ग्रामीण भागातील परिस्थिती मध्ये विशेष फरक जाणवत नाही हि चिताजनक व भारतीय आरोग्य व्यवस्थेला आव्हानात्मक बाब आहे. याची मिमांसा केले असता त्याची अनेक कारणे आहेत. त्यातील महत्वाचे कारण म्हणजे समाजात या रोगाबद्दलची अपुरी माहिती व ज्ञान, अशिक्षितपणा, आर्थिक दुर्बलता, अपु-या आरोग्य सुविधा व रोगाबद्दलचे गैरसमज अशी आहे.

भारतीय स्त्रियांमध्ये स्तन कॅन्सरच्या रुग्णांमध्ये वयाच्या ३० ते ४० वयोगटात झपाट्याने वाढ होत आहे. हे अत्यंत काळजी-जनक आहे. बदललेली जिवनशैली, असंतुलित आहार, शारिरीक हालचालीचा अभाव, वाढता ताण, पर्यावरणातील घटक, उशिराचे गरोदरपण व स्तनपान आणि आणुवंशिक प्रकृती हि याची मुख्य कारणे आहेत. तरुण वयातील स्त्रीयांना स्तन कॅन्सरचा उपचार हा वयोवृध्द स्त्रीयांच्या तुलनेत कमी प्रभावी असतो याचा परिणाम हा कुटूंब व अर्पत्यावर होतो.

लवकर निदान प्रभावी उपचार हे ब्रिदवाक्य सर्वच रोगांकरिता मुख्यत्त्वे कॅन्सर बदल तंतोतंत आहे. स्तन कॅन्सरचे निदान हे प्राथमिक अवस्थेत उपचार झाल्यास त्यावर आजघडीला प्रभावी उपचार पध्दती उपलब्ध आहे. लवकर निदान झाल्यास रुग्णाची निदान व उपचारानंतर साधारण जिवन जगण्याची शक्यता पुर्णपणे वाढते. याऊलट कॅन्सरचे निदान व उपचार उशिरा झाल्यास त्या प्रमाणात प्रभावी ठरत नाही याचाच अर्थ लवकर निदान व उपचार होणे हे अतिशय महत्वाचे आहे.

दुर्दैवाची बाब म्हणजे जगभरातील एकूण स्तन कॅन्सरच्या रुग्णापैकी निम्म्यापेक्षा जास्त रुग्ण हे भारतासारख्या विकसनशील व इतर आथकदृष्ट्या दुर्बल व अविकसीत देशांमध्ये निदान होतात. अशा देशामधील अपुरी आरोग्याची जिवनशैली, आर्थिक अडचणी या बाबीमुळे रुग्ण उपचाराकरिता उशिरा डॉक्टरांकडे येतो. ज्यामुळे मृत्युमुखी पडणाऱ्या रुग्णांची संख्या ही विकासित देशाच्या तुलनेत विकसनशील आर्थिकदृष्ट्या दुर्बल देशांमध्ये जास्त आहे.

वैद्यक शारातील प्रगतीमुळे आजीला सतन केन्सरचे निदान व उपचार हे अगदी प्राथमिक अवस्थेत करणे शक्य आहे. हि कति प्राश्चिमात्य देशांमध्ये झालेली आहे. भारत देशात स्तन केन्सरच्या लवकर निदानाकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना राबविणे शक्य आहे.

**जिवन शैलीतील बदल :-**
जिवन शैलीतील साधारण बदला मद्यसेवन धुम्रपान वजीत करणे, नियमित व्यायाम वाढविते व कॅन्सरचे प्रमाण कमी होण्यास मदत करते.

**स्तनाची स्वतपासणी :-**
वयाच्या तिशीनंतर प्रत्येकने स्वतच्या स्तनाची तपासणी आरशासमोर उभे राहून या स्नान करतांना मासिकानंतर पाच दिवसानी दरमहिण्यात करावी. वियांनी आपल्या जन्मदिवशी स्तनन्सरतज्ञांकडून स्तनांची तपासणी करुन घ्यावी.

त्या स्त्रियांनी वयाच्या ३५ वर्षानी मेमोग्राफी करुन घ्यावी. जर स्तन केन्सर आई, मावशी बहिन यांना झालेला असेल तर नंतर इतरांनी याच्या ४५ वषानंतर प्रत्येक तीन

भारत देशातील स्तन रुग्णाचा स्तर उंचविण्यासाठी तसेच लवकर निदानाकरिता डॉक्टर, नर्सेस यांना प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. सर्वसामान्यामध्ये विशेषता ग्रामीण भागात स्तन कॅन्सर बद्दल जनजागृती करणे अत्यावश्यक आहे या उपक्रमात डॉक्टर्स, नर्सस, स्वंयसेवी संस्था व शासनाच्या सहभाग उत्फुर्तपणे आवश्यक आहे.

आपणास अथवा आप्तेष्टास स्तनाचा आजार असल्यास किंवा स्तनरोगांबद्दल काही शंका असल्यास कुठलाही संकीय न बाळगता स्तनरोग विशेषज्ञ किंवा कॅन्सरतज्ञ अथवा शल्यचिकित्सक यांचा त्वरीत सल्ला घ्यावा. आपणास योग्य मार्गदर्शन देवू शकतात. आधुनिक वैद्यशास्त्र ही प्रणाली काळाच्या कसोटीवर व संशोधनावर आधारित आहे. त्यावर विश्वास ठेवून स्वतः व तसेच इतरांना प्रबोधन करुन मदत करावी.

■ ■ ■

# सूर्यदत्तमध्ये सूर्यभारत उद्योग संशोधन ज्ञानपीठ स्थापना

### विद्यार्थ्यांमध्ये स्टार्टअप, संशोधन व इनोव्हेशन रुजवणार



**: सूर्यभारत उद्योग संशोधन ज्ञानपीठची वैशिष्ट्ये**
- सर्वसमावेशक उद्योजकतेची शाळेपासून ते पदव्युत्तरपर्यंत सर्व शाखेतील विद्यार्थ्यांना संधी
- विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि व्यावसायिक तज्ज्ञतेवर आधारित स्टार्टअप्ससाठी मार्गदर्शन
- संस्थेकडून मार्गदर्शन, पायाभूत सुविधा, मेन्टॉरिंग आणि अर्थसहाय्याची मदत
- 'सूर्यदत्त'च्या माजी विद्यार्थ्यांचे मेंटॉरशिप, नेटवर्किंगसाठी सहकार्य
- पुढील टप्प्यात, उद्योजकतेत रस असलेले रहिवासी व व्यावसायिकांनाही सहभागाची संधी

■ **वृत्तसंस्था, पुणे, दि. १५ :**
विद्यार्थ्यांमध्ये स्टार्टअप, संशोधन व इनोव्हेशनचे बीज रुजवण्यासाठी, तसेच त्यांना उद्योजक बनण्यासाठी पोषक वातावरण उपलब्ध होण्यासाठी सूर्यदत्त ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्समध्ये 'सूर्यभारत उद्योग संशोधन ज्ञानपीठ' स्थापन करण्यात आले आहे, अशी माहिती सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी दिली.

दिवाळीनिमित्त 'सूर्यदत्त'च्या वतीने आयोजित पत्रकारांशी संवाद कार्यक्रमावेळी प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया बोलत होते. पीवायसी हिंदू जिमखाना येथे झालेल्या कार्यक्रमावेळी 'सूर्यदत्त'च्या उपाध्यक्षा व सचिव सुषमा संजय चोरडिया, सहयोगी उपाध्यक्षा स्नेहल नवलखा, मुख्य कार्यपालन अधिकारी अक्षित कुशल, स्वप्नाली कोगजे व्यवस्थापक (ऑपरेशन्स अँड रिलेशन्स), सूर्यदत्त कॉलेज ऑफ हॉस्पिटॅलिटी मॅनेजमेंट अँड ट्रॅव्हल टुरिझमच्या विभागप्रमुख रसिका गुमास्ते आदी उपस्थित होते.

प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया म्हणाले, अभ्यासक्रमाद्वारे ज्ञानदान करणाऱ्या सूर्यदत्त संस्थेमध्ये मिशनः स्टार्टअप फॉर ऑल या ध्येयाने प्रेरित होऊन उद्योजकता आणि नवकल्पनांना प्रोत्साहन देण्याचा सतत प्रयत्न केला जात आहे. येणारा काळ उद्यमशीलतेवर आधारित असणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्टार्टअप, उद्यमशीलता, इनोव्हेशन संस्कृती रुजवायला हवी. अधिकाधिक उद्योजक निर्माण करणे ही काळाची गरज आहे.

विद्यार्थ्यांची आवड, इच्छाशक्ती आणि तज्ज्ञता या गोष्टींवर आधारित उद्योजकीय कौशल्य विकसित करण्यावर भर दिला जाणार आहे. आंतरमहाविद्यालयीन, आंतरशाखीय आणि समविचारी विद्यार्थ्यांचे गट करून त्यांना उद्योजक बनण्यासाठी मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले जाणार आहे.

या मोहिमेचा एक भाग म्हणून विद्यार्थ्यांना सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासावर लक्ष केंद्रित करण्यास प्रोत्साहित केले जाईल. आरोग्य, स्वयंशिस्त आणि ध्येयासक्त शिक्षणावर भर देत त्यांच्या आवडी, करिअरच्या उद्दिष्टांशी सुसंगत उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग वाढवला जाईल. निष्फळ किंवा दिशाभूल करणाऱ्या गोष्टींपासून दूर राहण्यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. विद्यार्थ्यांचे वैयक्तिक परिवर्तन आणि स्वच्छ चारित्र्याची जडणघडण करण्याचा 'सूर्यदत्त'चा प्रयत्न आहे. तसेच या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना नवोन्मेष करण्यास, देशी उत्पादने व सेवा विकसित करण्यास प्रेरित केले जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

'सूर्यभारत' हा उपक्रम आत्मनिर्भर भारताच्या दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. भारतीय उत्पादने आणि सेवांना प्रोत्साहन देऊन विद्यार्थ्यांमधून अधिकाधिक उद्योजक घडवण्याला गती मिळणार आहे. भारत सरकारचे मेक इन इंडिया, आत्मनिर्भर भारत हे स्वप्न साकारण्यासाठी सूर्यदत्त संस्था नेहमीच पुढे राहिली आहे. आम्ही नेहमीच विद्यार्थ्यांमध्ये उद्योगाभिमुख मानसिकता तयार करण्यावर भर दिला आहे. 'नोकरी मागणारे नको, नोकरी देणारे बनूया' ही शिकवण 'सूर्यदत्त'मध्ये दिली जाते. यासह विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास, निरोगी जीवनशैली आणि मूल्याधिष्ठित शिक्षण देऊन राष्ट्रनिर्मितीमध्ये योगदान देतील, असे सक्षम नागरिक आम्ही घडवतो, असेही ते म्हणाले.

## धाड, धामणगाव बढे गावांना तालुक्याचा दर्जा द्या

# भाजप जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांची मंत्री बावनकुळे यांच्याकडे मागणी

■ महासागर प्रतिनिधी
बुलडाणा, दि. १५ :

धाड आणि धामणगाव बढे या गावांना तालुक्याचा दर्जा द्यावा, अशी मागणी भाजप जिल्हाध्यक्ष विजयराज शिंदे यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली. बडनेरा येथे पक्षाच्या बैठकीत १३ ऑक्टोबर रोजी त्यांनी लेखी निवेदन दिले.

या निवेदनाची तत्काळ दखल घेत महसूल मंत्री बावनकुळे यांनी राज्याचे महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांना प्रस्तावात समाविष्ट करण्याचे लेखी आदेश दिले. या मागणीमागे सविस्तर माहिती देण्यात आली आहे. धाड आणि धामणगाव बढे या गावांची लोकसंख्या प्रत्येकी २५ हजारांहून अधिक आहे.




आजूबाजूच्या गावांसह एकूण लोकसंख्या १ लाखांपेक्षा जास्त आहे. दोन्ही गावांचा परिसर केंद्रस्थानी असून, ६० ते ७० गावे या ठिकाणी जोडलेली आहेत. सध्याच्या तालुक्याच्या ठिकाणांपासून या गावांचे अंतर अधिक असल्याने नागरिकांना आरोग्य, शिक्षण आणि प्रशासकीय सेवांसाठी मोठा त्रास सहन करावा लागतो.

या गावांमध्ये महाविद्यालय, उच्च माध्यमिक शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र, पोलिस ठाणे, कृषी सेवा केंद्र, बँका आणि सहकारी संस्था यांसारख्या सुविधा आहेत. त्यामुळे प्रशासनिक दृष्टिकोनातून ही गावे सक्षम असून, फक्त तालुका कार्यालयाची गरज आहे. तालुका दर्जा मिळाल्यास प्रशासन अधिक जवळ येईल.

सेवा जलद, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख होतील. विकासाचा वेग वाढेल. या निर्णयामुळे दोन्ही गावांना तालुका दर्जा मिळण्याच्या आशा निर्माण झाल्या आहेत.

निवेदन सादर करताना भाजपा जिल्हा सरचिटणीस दत्ता पाटील, जिल्हा उपाध्यक्ष चंद्रकांत बरदे, शहराध्यक्ष मंदार बाहेकर, शिक्षक आघाडी जिल्हा संयोजक संदीप नरोटे, जिल्हा सचिव गणेशसिंग राजपूत, हरिणारायण गायकवाड, मोताळा मंडळ अध्यक्ष सचिन शेळके, सागर पवार उपस्थित होते.

## बुध्द धम्म आचरणाचा धम्म : डॉ. रत्नशील खोब्रागडे

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १५ :

बुध्दाचा धम्म हा आचरणाचा धम्म आहे, असे विचार विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागाचे समन्वयक प्रा. डॉ. रत्नशील खोब्रागडे यांनी मांडले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभाग, विद्यार्थी अभ्यास मंडळाच्यावतीने आयोजित 'धम्मचक्र प्रवर्तन-डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आणि आजचे वास्तव' या विषयावरील व्याख्यानप्रसंगी अध्यक्षीय भाषण करताना ते बोलत होते. विचारपीठावर व्याख्याते म्हणून सिनेट सदस्य डॉ. रवींद्र मुंद्रे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा विभागाचे डॉ. वामन गवई, डॉ. भीमराव वाघमारे, डॉ. पवन तायडे, प्रा.सुरेश पवार, प्रा. असित गुर्जर, प्रा. तेजस गुर्जर, प्रा. दादाराव मुटकुरे, अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डी. एल. वानखडे, उपाध्यक्ष संजय घरडे उपस्थित होते. प्रसन्न चित्ताने केलेले कोणतेही कार्य बुध्दाच्या धम्माचे पालन होय. बुध्दाने मनाच्या चौसष्ट अवस्था सांगितल्या असून माणसाने चित्ताची शुध्दी करणे गरजेचे आहे. आपलं काय चुकते हे लक्षात ठेवून मनाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे असेही ते म्हणाले.

डॉ. रवींद्र मुंद्रे म्हणाले, जग ही संकल्पना केवळ महासागर, पर्वत वा नदीनाले, जंगले नाहीत, तर जग म्हणजे या पृथ्वीतलावरील राहणारा प्रत्येक मानवी समूह आणि त्या समूहाच्या जीवन जाणिवा, त्यांचा विचार आचार, त्याची समुचित संरचना होय. या जगात दुःख आहे हे शाश्वत सत्य आहे. दुःखाचे कारण तृष्णा आहे. त्याचे निरसन हे तृष्णेच्या त्यागाने शक्य आहे. ही आर्यसत्ये सांगून जगातील मानवाला 'स्व'चा शोध घेण्याचे स्वातंत्र्य बहाल करणारा बुध्द विचार, बुध्दाच्या धम्माला इतर धर्मापासून वेगळा ठरवतो. आजच्या वास्तवात धर्म हा सत्तेचा गुलाम आणि सत्ता ही धर्माची गुलाम होत चालली आहे. या द्वंद्वात माणूस मात्र माणसापासून तुटत चालला आहे. हा धोका ओळखून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञांचा अवलंब आपल्या आचरणात करून माणसाला समता, स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय देणारी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी



सांगितलेली जगाची पुनर्रचना केली पाहिजे असेही ते म्हणाले. यावेळी सविता मेश्राम, विद्याशाली गुडघे, वंदना काळपांडे यांनी चमूने 'भीमरायांनी देशाबरती' हे गीत सादर केले.

सुरेखा लांडगे, डॉ.रविंद्र खंडारे, भंते अमरज्योती, प्रफुल्ल कडू, मदन गायकवाड या डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा अभ्यासक्रमाच्या प्रथम आणि द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन अलका वर्धे व सुबोध काळे यांनी, तर अभ्यास मंडळाचे सचिव गौतम खंडारे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

गझलकार सुदाम सोनुले, सामाहिक वज्जी संदेशचे कार्यकारी संपादक धर्मशील गेडाम, विलास थोरात, आर. एस. तायडे, जगदीश गोवर्धन, वाघमारे मॅडम, संदीप राऊत, अमरावती शहरातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते, अभ्यासक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता अभ्यास मंडळाचे सहसचिव अरुण गजभिये, पद्मश्री आठवले, गोंडाणे, सुधाकर तलवारे, प्रविणा चिंचोले आदींनी विशेष परिश्रम घेतले.

## मूर्तिजापूर पं. स. आरक्षण सोडत अनेकांच्या अपेक्षांवर फिरले पाणी

■ महासागर प्रतिनिधी
मूर्तिजापूर , दि. १५ :

तालुक्यातील पंचायत समितीच्या १४ गणांकरिता येथील तहसीलच्या गोडावूनमध्ये आरक्षण सोडत घेण्यात आली?. उपविभागीय अधिकारी संदीपकुमार अपार तसेच तहसीलदार शिल्पा बोबडे आणि नायब तहसीलदार रवींद्र राऊत व नागोलकर यांच्या उपस्थितीत लहान बालकाच्या हातून ईश्वरचिठ्ठी काढून पंचायत समितीच्या गणांकरिता आरक्षण काढण्यात आले. यावेळी तालुक्यातील इच्छुकांसह विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. अशाप्रकारे १४ गण आरक्षित झाले असून यामध्ये ७ महिलांचा समावेश आहे. काढण्यात आलेल्या आरक्षणामुळे मोठा फेरबदल झाला असून अनेकांच्या अपेक्षांवर पाणी फिरले आहे. तर आरक्षणानंतर अनेकांच्या अपेक्षा देखील उंचावल्या आहेत. प्रस्थापित आपल्याकरिता सुरक्षित



मतदारसंघाचा शोधात असल्याचे दिसून येत आहे.

### जाहीर झालेले पंचायत समिती गणाचे आरक्षण असे

भटोरी-अनुसुचित जमाती, लाखपुरी-अनुसूचित जाती स्त्री, बोर्टा-अनुसूचित जाती स्त्री, शेलू बाजार-अनुसूचितजाती, कुरुम-नागरिकांचा मागासप्रवर्ग स्त्री, कवठा (सोपीनाथ)-सर्वसाधारण स्त्री, माना-सर्वसाधारणस्त्री, जामठी-ओबीसी स्त्री, सिरसो-ओबीसी, जांभा बु.-अनुसूचित जाती, हातगाव-सर्वसाधारण, उमरी-सर्वसाधारण,धोतख रा (शिंदे)-अनुसुचित जाती स्त्री, कानडी-सर्वसाधारण.

# जिल्ह्यातील ४५ शाळा बंद करण्याचा आदेश

■ महासागर प्रतिनिधी
वाशीम, दि. १५ :

जिल्ह्यातील ४५ शाळा पटसंख्येच्या आधारावर कायमस्वरूपी बंद करण्याचे आदेश शिक्षण उपसंचालक अमरावती यांनी दिले आहेत. या आदेशामुळे शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. शिक्षण बचाव समन्वय समितीने या आदेशाला बेकायदेशीर ठरवत तात्काळ मागे घेण्याची मागणी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. १३ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकाऱ्यांमार्फ त शिक्षण उपसंचालकांना निवेदन पाठवण्यात आले. शिक्षण आयुक्त पुणे यांच्या ७ ऑक्टोबर रोजीच्या आभासी बैठकीनंतर शिक्षण उपसंचालकांनी अमरावती, अकोला, वाशिम, यवतमाळ आणि बुलढाणा जिल्ह्यातील शून्य ते ५ पटसंख्या असलेल्या शाळा तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले. एकाच कॅम्पसमधील शाळा एकत्र करून एकाच शाळेत रूपांतरित करावे,



विद्यार्थ्यांचे इतर शाळांमध्ये समायोजन करावे आणि बंद शाळांचा यु-डायस क्रमांक बंद करावा, असेही आदेशात नमूद आहे. शाळा बंद करण्याचा अधिकार कोणत्याही अधिकाऱ्याला नाही. शिक्षण हक्क कायद्यामध्ये शाळा बंद करण्याची तरतूद नाही. उलट शाळांचा दर्जा सुधारावा आणि संख्या वाढवावी, असे कायद्यात स्पष्ट आहे. त्यामुळे शिक्षण उपसंचालकांनी असा आदेश कसा काय काढू शकतात, असा सवाल समितीने उपस्थित केला आहे. राज्यघटना आणि शिक्षण हक्क कायद्याचे उल्लंघन करणारा हा आदेश असल्याचे समितीने म्हटले आहे. एकाच कॅम्पसमध्ये दोन शाळा भरतात, असे कोणतेही उदाहरण नाही. त्यामुळे कोणती शाळा कोणात समाविष्ट होणार, हा प्रश्नही उपस्थित केला आहे.

कलम १४, १५, १६, १९, २१ आणि २२ अ तसेच कायद्याच्या सेक्शन १८ व १९ नुसार शाळा बंद करणे बेकायदेशीर असल्याचे निवेदनात नमूद आहे. निवेदनावर गजानन धामणे, विजयराव शिंदे, इंजी. सिताराम वाशिमकर, दिलीप गवई, मिलिंद सुर्वे, रंजनाताई पारिसकर, गजानन देशमुख, राजकुमार पडघान, मंगेश भुताडे, राजू धोंगडे, दिपक खडसे, दिनेश पठाडे, अजय सोनुनकर, नारायण काळबांडे, राम धनगर, सुनील कांबळे, पप्पू घुगे, विष्णू राठोड, सुभाषराव बोरकर यांच्यासह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.शाळा बंद करण्याचा निर्णय घटनाविरोधी शून्य किंवा १ ते ५ पटसंख्या असलेल्या शाळा बंद करण्याचा निर्णय घटनाविरोधी आहे. कोणतीही शाळा बंद करता येत नाही. मान्यता नसलेल्या शाळांना निकष लावून मान्यता देण्याचे बंधन कायद्यात आहे. याची जाणीव उपसंचालकांना करून देण्यात आली आहे.

प्रशासनाचा हेतू कायद्याचा भंग करून तातडीने शाळा बंद करण्याचा असल्याचे निवेदनात म्हटले आहे. सामाजिक न्यायाचा विचार न करता शिक्षणविरोधी भूमिका घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. आदेश मागे न घेतल्यास रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

## गोवंश मासाची वाहतूक करणाऱ्यावर कारवाई

### १ लाख ८७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त



■ महासागर प्रतिनिधी
पुसद, दि. १५ :

शहर पोलिस ठाण्याच्या हद्दीत वसंतनगरमध्ये ऑटोतील शिट खाली गोवंशाच्या मासाची वाहतूक करताना पकडले आहे. पकडलेल्या गोवंशाच्या मासाचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आली आहे. ही कारवाई शहर पोलिसांनी रविवारी दि. १२ ऑक्टोबर रोजी सकाळी केली होती. शेख शहादत शेख कादर (५६, रा. वसंतनगर) याला अटक केले आहे. वसंत नगर पोलिस ठाण्याच्या सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार शेख शहादत हा त्याच्या ऑटो क्रमांक (एमएच-२६-एसी-२७८) ने सकाळच्या सुमारास ऑटोमधून गोवंशाच्या मासाची तस्करी होणार असल्याची माहिती बातमीदाराकडून पोलिसांना मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे शहर पोलिस ठाण्याचे ठाणेदार सेवानंद वानखडे यांनी त्यांच्या पोलिस स्टाफ सहायक पोलीस निरीक्षक गोपाल इंद्राळे, बाबाराव पवार, मनीषा वाघमारे, प्रशांत स्थूल, दिनेश साळके, अनुप मडके यांनी वसंत नगरात पेट्रोलिंग सुरू केली. पेट्रोलिंग दरम्यान माहिती मिळाल्या ऑटोला थांबून पाहणी केली. ऑटोमध्ये शासनाने प्रतिबंधित केलेल्या गोवंशाची हिरव्या रंगाच्या नायलॉन नेट खाली व ऑटोच्या शीट खाली झाकून ठेवलेले आढळून आले. पोलिसांनी १ लाख ५० हजार रुपये किमतीचा ऑटो , ३७ हजार ५०० रुपये किमतीचे दीडशे किलो गोवंशाचे मास असा एकूण १ लाख ८७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यात आरोपीला अटक केले आहे. शहरामध्ये मासाची तस्करी होत असल्याची बाब पोलिसांनी उघडकीस आणली आहे.

## शालेय विद्यार्थ्यांना देण्यात येणार व्यसनमुक्तीचे धडे




■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १४:

व्यसनमुक्ती या राष्ट्रहिताच्या कार्यासाठी तरुणाई सरसावली असून, शालेय विद्यार्थ्यांना व्यसनमुक्तीचे धडे देऊन त्यांना दुष्परिणामांची जाणीव करून देण्यात येणार आहे. युवा व्यसनमुक्ती जन समितीकडून या व्यसनमुक्तीचा जागर होणार आहे. समितीकडून जिल्ह्यामध्ये व्यसनमुक्तीचे विविध उपक्रम राबवण्यात येत असून आता शाळांमध्येही जनजागृती करण्यात येणार आहे. देशाला तरुणाईच्या रूपात लाभलेली मोठी संपत्ती म्हणजे आपले युवा; मात्र तोच मोठ्या संख्येने युवक विविध व्यसनात अडकून पडले आहेत. मोठ्या प्रमाणात तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जात आहे. शालेय वयातच अनेक जण व्यसनाला बळी पडत आहेत. व्यसन हे तरुणाची स्टाईल स्टेटमेंट बनत आहे.

अशा परिस्थितीत युवकांना व्यसनमुक्त करण्याचे काम अकोलातील युवा व्यसनमुक्ती जन समिती अकोला ही सामाजिक संस्था करीत आहे. आता व्यसनमुक्त समाज घडण्यासाठी युवकांनी पुढाकार घेतला असून समिती आता शाळांमध्ये जागृती करणार आहे.

याबाबतची माहिती व्यसनमुक्ती प्रचारक अमरदीप सदांशिव यांनी दिली असून व्यसनमुक्तीच्या या चळवळीत त्यांना सचिव ऋषिकेश झीने, कोषाध्यक्ष राहुल तायडे, प्रवीण वाहूरवाघ, सचिन शिरसाट,निलेश खडसान,गोकुल वाहूरवाघ,बळवंत गोपनारायण हे सहभागी होते आहेत. अशी राबवणार मोहिम व्यसनमुक्तीबाबत प्राथमिक, माध्यमिक शाळांमध्ये जनजागृती करण्यात येणार असल्याचे व्यसनमुक्ती प्रचारक अमरदीप सदांशिव यांचे म्हणणे आहे. याबाबत शिक्षण विभागाशी संपर्क साधण्यात येत आहे. व्यसनमुक्तीबाबत शाळांमध्ये समुपदेशही करण्यात येण्यात येणार आहे. गुटखा, दारूसह अन्य व्यसनमुक्तीसाठी जनजागृती करण्यात येणार आहे. एका आठवड्यात किमान एका शाळेत हा उपक्रम राबवण्यात येणार आहे.

### विद्यापीठाच्या हिवाळी २०२५ च्या काही परीक्षांच्या वेळापत्रकात बदल

**अमरावती:** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाद्वारे घेण्यात येणा-या हिवाळी -२०२५ च्या लेखी परीक्षेची वेळापत्रके विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आलेली आहेत. परंतु काही परीक्षांच्या वेळापत्रकात बदल करण्यात आले आहेत. त्यामध्ये बी.ई.सेमि.-४(सी.बी.सी.एस.), बी.ए. सेमि.-१(एन.ई.पी.), बी.पी.ए. सेमि.-१व २, बी.कॉम.सेमि.-१व २(एन.ई.पी.)/ बी.कॉम. (ए./एफ) सेमि.-१व २ (एन.ई.पी.), बी.एस्सी. सेमि.-१व २ (एन.ई.पी.), बी.एस्सी. (गृह विज्ञान) सेमि.-१व २(एन.ई.पी.),बी.पी.ई.अँड एस. सेमि.-१व २(एन.ई.पी.), डिप्लोमा इ बिझिनेस अॅनेलिस्टिक सेमि.-१व २ आणि पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन फायनान्सियल लिट. कोर्स (एक वर्षीय) या परीक्षांचा समावेश आहे.


महाराष्ट्र राज्य
**महसूल व वन विभाग**
उपजिल्हाधिकारी (जि.प.पं.स. व ग्रा.प.नि.) निवडणूक शाखा,
जिल्हाधिकारी कार्यालय, आकाशवाणी चौक, नागपूर
ई मेल -nagpurdycolvp@gmail.com

क्र.सहा.म.अ./ग्रापनि/डे-१३/सं.क्र./कावि-५२२/२०२५ — दिनांक :- १५ ऑक्टोबर, २०२५

**ई-निविदा सुचना क्रमांक ०७/२०२५**

नागपूर जिल्ह्यातीलस्थानिक स्वराज्य संस्था (जिल्हा परीषद, पंचायत समिती, नगर परीषद, नगर पालिका, नगर पंचायती, ग्राम पंचायत इत्यादी) यांचे सार्वत्रिक / पोट निवडणूकीच्या अनुषंगाने, विविध प्रकारची वाहने भाडेतत्वावर पुरवठा करणेसाठी अनुभवी व सुयोग्य अभिकर्त्याकडून विहीत नमुन्यातील निविदा मागविण्यात येत आहे. त्यासाठी अशा प्रकारचा अनुभव असणाऱ्या अभिकर्त्याकडून विविध प्रकारची वाहने भाडेतत्वावर पुरवठा करणेचे कामकाज करून देण्यासाठी योग्य कंत्राटदाराकडून दिनांक १६/१०/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजेपासून ई-निविदा कार्यप्रणालीनुसार निविदा मागविण्यात येत आहे. ई-निविदा http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर अंतिम दिनांक २४/१०/२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करता येईल. निविदा दिनांक २७/१०/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजता उपजिल्हाधिकारी तथा प्रभारी अधिकारी, जि.प.पं.स. व ग्रा.पं. निवडणूक विभाग, नागपूर यांचे कार्यालयात उघडण्यात येईल. कंत्राटदारांना काही अडचणी असल्यास दिनांक २०/१०/२०२५ रोजी दुपारी ०४.०० वाजता उपजिल्हाधिकारी तथा प्रभारी अधिकारी, जि.प.पं.स. व ग्रा.पं. निवडणूक विभाग, नागपूर येथे Pre-Bid Meeting मध्ये सोडविण्यात येईल.

(डॉ. विपीन)
जिल्हाधिकारी,
नागपूर

क्र. संमावज/नाग/४८७/२०२५



MAHAVITARAN Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
**e-Tender Notice**

The Executive Engineer, MSEDCL, Congress Nagar Division invites e-Tender in Two Bid System from Registered, Experienced & Reputed Agencies/Contractors having Experience of similar work in MSEDCL & completing the formalities for the following work- **Tender No. EE/CNDN/Tech/e-Tender/25-26/eT-01**, Work Contract for cleaning of urinals, latrine & cannels sweeping etc. at various Sub-Stations & Offices under Congress Nagar Division, MSEDCL, Nagpur for amounting of **Rs.10 Lakh, EMD:-Rs.10,000/-** & Tender Fee:- **Rs.1,000/- & GST 18 %** extra. The tender document can be downloaded from website- **https://etender.mahadiscom.in/eat App/** from **dt.16.10.2025 up to Dt.29.10.2025.** Last date of submission is **Dt.29.10.2025 up to 17.30 Hrs.**

Executive Engineer
NZ/PR No.122/2025 — Congress Nagar Division M.S.E.D.C.Ltd., Nagpur


# शिबिरात ३५३ जणांची तपासणी

■ महासागर प्रतिनिधी
दिग्रस, दि. १५ :

खासदार संजय देशमुख यांच्या पुढाकाराने शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे दिग्रस तालुका व लोककल्याण आरोग्य केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी दि. १० ऑक्टोबर रोजी गवळीपुरा येथे आरोग्य व नेत्र शिबिर घेण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन खा. संजय देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून अनेक रुग्णांनी आपली आरोग्य तपासणी करून घेतली. या उपक्रमात मोफत आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी, तसेच चष्म्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास रवींद्र आरगडे, राहुल देशपांडे, रुस्तम पप्पूवाले, रमजान पटेल, पूनम पटेल, स्वप्निल दुधे, विभाग प्रमुख, अमर नरोडे, गजानन हडके, भिका नवरंगाबादे, रिजवान नवरंगाबादे, असलम पतलेवाले, इरफान नवरंगाबादे, हुसेन बालापुरे, चांद पप्पूवाले व राम नरके आदी मान्यवर उपस्थित होते. शिबिरात विविध विभागातील तज्ज्ञांनी ३५३ लोकांची तपासणी करून आवश्यक सल्ला दिला तसेच १४३ चष्म्याचे वाटप झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. या सामाजिक उपक्रमाबद्दल नागरिकांनी खा. संजय देशमुख व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आभार मानले.


**NAGPUR MUNICIPAL CORPORATION**
TENDER NOTICE

Commissioner NMC invites e-tenders for the following work. These E-Tender can be download by the Registered Contractors of Nagpur Municipal Corporation e-tendering Portal (**www.mahatenders.gov.in**) The terms and conditions of e-tenders are available on e-tender Portal (**www.mahatenders.gov.in**).

| Name of the Work | Tender Cost |
|---|---|
| Asphalting of Road Near Pardi Police Station at Durga Nagar in Prabhag No. 25. | 758113 |
| Repairing work at UPHC Pardi in Prabhag No. 25. | 479209 |

Note: (1)Tender Sale Start Date : 16/10/2025. (2) Tender Sales End / Submission End Date : 23/10/2025 (3) Tender Opening Date 24/10/2025 (If Possible)

Executive Engineer, Zone 08
Advt No. 566 PR Date: 15.10.2025 — N.M.C., Nagpur.



MAHAVITARAN Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
**e-Tender Notice**

Super scribed percentage rate e-tenders are invited from Established, Reputed, Experienced Contractors and who are Registered for e-tendering with MSEDCL. The offers are invited for the works of 1) Annual Contract of Civil maintenance work for Arvi Division office under Wardha Circle, Dist. Wardha for year 2025-26 for year 2025-26 amounting to **Rs. 8.46 Lakhs 2)** Annual Contract of Civil maintenance work for Wardha Division office under Wardha Circle, Dist. Wardha for year 2025-26 amounting to **Rs. 8.45 Lakhs 3)** Annual Contract of Civil maintenance work for Hinganghat Division office under Wardha Circle, Dist. Wardha for year 2025-26 amounting to **Rs. 8.47 Lakhs 4)** Providing fencing at the backside of the switch yar of 33 KV S/stn Mohgaon (Bh) under O&M Division Katol, Tq. Narkhed, Dist. Nagpur amounting to **Rs. 4.08 Lakhs 5)** Various Civil Maint. Work and metal spreading work at 33 KV S/Stn Isasani, Dist.Nagpur amounting to **Rs. 5.04 Lakhs 6)** Various Civil Maintenance work at Itwari Sub Division Nagpur Dist. Nagpur amounting to **Rs. 8.40** vide e-tender specification No. **EEC/NGP/e-T-28 (II nd call)/2025-26, EEC/NGP/e-T-29(II nd call)/2025-26 , EEC/NGP/e-T-30(II nd call)/2025-26, EEC/NGP/e-T-41/2025-26,EEC/NGP/e-T-42/2025-26,EEC/NGP/e-T-43/2025-26,** respectively. The tender with all details will be available on MSEDCL's website **www.mahadiscom.in** from **date-16.10.2025 to 22.10.2025** and submission on **23.10.2025 up to 13.00 hrs.** Corrigendum shall not be published in newspaper

Executive Engineer (C)
PRO No. 120/NZ. Dt.15.10.2025 — CCCM Division, Nagpur



MAHAGENCO Maharashtra State Power Generation Co. Ltd.
**e-TENDER NOTICE - 086 / 2025-26**

Following e-Tender offers are invited online from registered contractors / companies etc. are available at our website **https://eprocurement.mahagenco.in.**

| e-Tender No. | RFX No. | Particulars of Work / Supply | Estt. Cost Rs. (In Lakhs) |
|---|---|---|---|
| TN0625 C&I2 | 3000062266 | BIENNIAL CONTRACT FOR CHECKING OF ESP HOPPER ASH LEVEL HIGH SENSORS & CONVERTER SWITCHES INCLUDING ALL ESP INSTRUMENTATION FOR C&I-II 500 MW KHAPERKHEDA TPS. | 15.97 |
| TN0626 CHP1 Refloated | 3000062162 | SUPPLY OF RADIATOR FOR CUMMINES ENGINE AT TPS KHAPERKHEDA. | 31.42 |
| TN0627 TM2 Refloated | 3000062285 | SUPPLY OF SPARES FOR ROTARY COMPRESSORS INSTALLED AT UNIT NO.5 TPS KPKD. | 29.90 |
| TN0629 CHP1 | 3000062335 | WORK OF TRANSORTATION OF COAL FROM CHP-I & CHP-II TO REQUIRED LOCATIONS WITHIN PLANT PREMISES AS AND WHEN REQUIRED BASIS AT TPS KHAPERKHEDA. | 36.00 |
| TN0631 CHP1 | 3000062303 | WORK OF COMPLETE REFURBISHMENT / RECONDITIONING OF PADDLE FEEDER ARMS AT CHP-I, TPS KHAPERKHEDA. | 24.15 |
| TN0633 EM1 | 3000062340 | IN-SITU SLIPRING MACHINING OF TURBO GENERATOR OF U#1 AT 210 MW TPS KHAPERKHEDA. | 0.81 |
| TN0634 CHP2 | 3000062360 | BIANNUAL WORK CONTRACT FOR PROVIDING, MONITORING AND MAINTENANCE OF TRUCK MOVEMENT MONITORING SYSTEM AT TPS KHAPERKHEDA. | 157.78 |

Note » Tender cost is Rs. 1,000 /- + GST.

Sd /-
Chief Engineer (O&M)
MSPGCL, TPS Khaperkheda

# सोनेचांदीच्या वाढत्या दरांवर गोंधळ की कटकारस्थान!

सरकार म्हणते अर्थव्यवस्था मजबूत आहे, मग दर आकाशाला का भिडले? उत्तर आर्थिक वास्तवात दडले आहे की काहीतरी वेगळे?



गेल्या काही महिन्यांपासून देशात सोने आणि चांदीच्या दरांमध्ये विक्रमी तेजी पाहायला मिळत आहे. ऑक्टोबर 2025 मध्ये सोन्याचा दर 1.30 लाख प्रति 10 ग्रॅमच्या पुढे गेला आहे, तर चांदी 1.8 लाख प्रति किलोच्या आसपास विकली जात आहे. या झपाट्याने वाढलेल्या दरांमुळे सर्वसामान्यांमध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण झाले आहे. काही लोक याला आर्थिक संकट किंवा आंतरराष्ट्रीय कटकारस्थानाशी जोडत आहेत. तज्ज्ञांच्या मते, या वाढीमागे कोणतेही गूढ नाही, तर स्पष्ट आर्थिक व जागतिक कारणे आहेत.

**आंतरराष्ट्रीय बाजारातील तेजीचा थेट परिणाम**

या व्यवसायाशी संबंधित तज्ज्ञ सांगतात की सोन्याचे दर केवळ भारतातच नव्हे, तर संपूर्ण जगभरात उंचावले आहेत. यावर्षी ऑक्टोबर महिन्यात आंतरराष्ट्रीय बाजारात सोने प्रथमच 4,000 अमेरिकन डॉलर्स प्रति औंसच्या पातळीवर पोहोचले. अमेरिकन फेडरल रिझर्व्हच्या धोरणांमुळे, व्याजदर कपातीच्या अपेक्षा, डॉलरचे अवमूल्यन आणि भूराजकीय तणाव यामुळे जागतिक गुंतवणूकदारांनी सोने 'Safe Haven' म्हणजे सुरक्षित गुंतवणूक पर्याय म्हणून निवडले. जागतिक पातळीवर मागणी वाढली की भारतासारख्या आयातक देशांमध्ये याचा थेट परिणाम जाणवतो.

**रुपया कमजोर, आयात महाग**

भारत आपली बहुतांश सोनेचांदीची गरज परदेशातून आयात करून पूर्ण करतो. या धातूंच्या आंतरराष्ट्रीय किंमती डॉलरमध्ये ठरतात. सध्या डॉलरच्या तुलनेत रुपया सुमारे 88.7 च्या पातळीवर आहे, म्हणजेच रुपया कमजोर झाला आहे. याचा अर्थ जागतिक किंमती स्थिर राहिल्या तरी, रुपया कमजोर झाल्याने भारतात सोनेचांदी आणखी महाग होते.

**केंद्रीय बँकांची खरेदी**

तज्ञ सांगतात की अनेक देश त्यांच्या परकीय चलन साठ्यात सोन्याचा हिस्सा वाढवत आहेत. चीन, रशिया आणि अनेक आशियाई देशांनी गेल्या काही महिन्यांत मोठ्या प्रमाणावर सोने खरेदी केले आहे. अशा प्रमाणातील खरेदीमुळे पुरवठा कमी होतो आणि दर वाढतात. याचा परिणाम भारतीय बाजारावरही दिसतो.

**औद्योगिक मागणीमुळे चांदीत तेजी**

चांदीचा वापर फक्त दागिने किंवा गुंतवणुकीपुरता मर्यादित नाही, तर उद्योगांमध्येही मोठ्या प्रमाणावर होतो जसे सोलर पॅनेल, इलेक्ट्रॉनिक्स आणि इलेक्ट्रिक वाहने. 2025 मध्ये औद्योगिक मागणीत मोठी वाढ झाली, पण पुरवठा मर्यादित राहिला. त्यामुळे चांदीच्या दरात ऐतिहासिक वाढ झाली. भारतात तर परिस्थिती अशी होती की काही म्युच्युअल फंड हाऊसनी Silver ETF मधील नवीन गुंतवणूक योजना तात्पुरत्या स्थगित केल्या.

**घरेलू मागणी आणि सणासुदीचा हंगाम**

भारतात सण, लग्नसमारंभ आणि धार्मिक प्रसंगी सोनेझचांदी खरेदीची परंपरा आहे. सध्या सणासुदीचा हंगाम सुरू असल्याने स्थानिक मागणी वाढली आहे. ही मागणी तेव्हाच अधिक महाग पडते जेव्हा जागतिक दर आधीच उंचावलेले असतात आणि रुपया कमजोर असतो. या दुहेरी परिणामामुळे स्थानिक बाजारात प्रीमियम वाढला आहे म्हणजे आंतरराष्ट्रीय किंमतींपेक्षा अधिक दराने सोनेझचांदी विकले जात आहे.

**ऑक्टोबरमध्ये असे चढले सोनेझचांदीचे दर**

| तारीख | सोने (प्रती १० ग्रॅम) | चांदी (प्रतीकिलो) |
|---|---|---|
| 1 ऑक्टोबर | 1,17,600 | 1,46,500 |
| 6 ऑक्टोबर | 1,19,600 | 1,50,700 |
| 10 ऑक्टोबर | 1,22,000 | 1,67,200 |
| 11 ऑक्टोबर | 1,23,500 | 1,81,000 |
| 14 ऑक्टोबर | 1,30,800 | 1,85,000 |



डॉ. प्रवीण डबली
ज्येष्ठ पत्रकार
9422125656

**कटकारस्थान नव्हे, आर्थिक वास्तव**

शहरातील एका सोन्याचांदीच्या व्यापाऱ्याने सांगितले की अनेक ठिकाणी दरवाढ आंतरराष्ट्रीय कटकारस्थानाचा भाग असल्याची धारणा पसरत आहे. परंतु वास्तव असे आहे की दर जागतिक अर्थव्यवस्था, डॉलरचे व्यवहार, केंद्रीय बँकांच्या धोरणांवर आणि मागणीझपुरवठ्याच्या संतुलनावर ठरतात. मोठे गुंतवणूकदार कधीकधी बाजारात हालचाल निर्माण करू शकतात, पण याला कटकारस्थान म्हणणे अतिशयोक्ती ठरेल.

**नागरिकांनी काय समजून घ्यावे?**

१. सोनेझचांदीचे वाढते दर म्हणजे देशाची अर्थव्यवस्था कमजोर आहे, असा अर्थ होत नाही.
२. ही एक जागतिक आर्थिक प्रक्रिया आहे, ज्यात भारत आयातक देश असल्याने प्रभावित होतो.
३. खरेदी करताना बाजारातील प्रीमियम व ट्रेंड समजून घेणे आवश्यक आहे.
४. गुंतवणुकीसाठी घाईघाईने उच्च दरांवर खरेदी न करता दीर्घकालीन रणनीती आखावी.

तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, सोनेचांदीचे आकाशाला भिडणारे दर हे ना कोणते गूढ आहेत, ना कोणते जागतिक कटकारस्थान. त्यामागे ठोस आर्थिक कारणे आहेत. जागतिक मागणी वाढणे, डॉलरच्या तुलनेत रुपया कमजोर होणे, केंद्रीय बँकांची खरेदी, औद्योगिक मागणी आणि देशांतर्गत सणासुदीची खरेदी. त्यामुळे अफवांवर विश्वास न ठेवता तथ्य समजून निर्णय घेणेच शहाणपणाचे आहे.

**चांदी २ लाख, सोने १.३५ लाख!**

आंतरराष्ट्रीय घडामोडी, वाढती औद्योगिक मागणी, सणासुदीची खरेदी आणि अमेरिकन टॅरिफ यासह इंटरनॅशनल मार्केटमधील अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर सोनेचांदीतील सुरू असलेल्या बंपर तेजीला पाहता दिवाळीपर्यंत सोन्याचा दर प्रति 10 ग्रॅम 1,35,000 आणि चांदीचा दर प्रति किलो 2 लाखांपर्यंत जाण्याचा अंदाज AIGJC चे चेअरमन यांनी व्यक्त केला आहे.

सोन्याचा दर प्रति 10 ग्रॅम व चांदीचा दर प्रति किलो आहे. जीएसटी, मेकिंग चार्ज व हॉलमार्क चार्ज वेगळे आहेत.

# खरेदीला जातांना..!

यशस्वी होण्याचा सर्वात खात्रीदायक मार्ग म्हणजे जीवनात सकारात्मकता अवलंब करून समाजातील लोकांना आनंद मिळून देणे होय. सणासुदीचे दिवस असल्यामुळे आनंद जाणवते. आपण सर्व सण साजरा करतो आणि भरमसाठ खरेदी करण्यासाठी घरातून बाहेर निघतो. पण सणासुदीच्या दिवसात खरेदीला जातांना काही महत्वाची खबरदारी वेळीच घेतलेली बरी, कारण पैसा वर्तमानात फार महत्वाची बाब आहे. पैशाचा पाऊस म्हणजे आनंदाची पर्वणीच म्हणावी लागेल.

आपण पैशाचे महत्व महत्वाचे समजुन जाणले पाहिजे. या देशात लवकरच सरकारी, निमसरकारी व इतर नोकरी करणारे अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांना दिवाळीची भेट म्हणून बोनस रूपाने सरकार कडून बोनस रूपाने पैसे मिळतात आणि त्यातून खरेदी पण भरपूर होणार आहे. पण, एकदा खिशातून पैसा निघून गेल्यावर पश्चाताप होवू नये म्हणून पैशाचे महत्व जाणले पाहिजे. त्याकरिता कुटुंबातील सर्वांनी खरेदी करताना खर्च आटोक्यात ठेवणे भविष्यकाळासाठी उपयुक्त ठरेल. त्यासाठी खालील बाबींवर लक्ष देणे महत्वाचे आहे.

सणासुदीच्या दिवसात मार्केटमध्ये आपल्याला प्रलोभनात टाकेल अशी दुकाने सजलेली असतात, याकरिता सामानाची यादी घरूनच बनवून न्यावी. जे सामान आपल्याला लागते तेच नमुद करावे, जास्तीचे सामान आणता कामा नये.

दुकानात प्रवेश केल्यानंतर दुकानदाराला आपण सामानाची यादी नाव लिहुन सुपुर्द करावी. जर आपल्याला सामानाचे नाव आठवत असेल तर आणखी लिहावे जेणेकरून सुचीच्या बाहेर सामान घेतल्यास आपला खर्च वाढण्याची शक्यता राहते. जे सामान आपल्याला आवश्यक आहे तेच घ्यावे जेणेकरून हिशेब आटोक्यात राहील. हे केल्यास आपला पैसा काही क्षणासाठी आपल्याजवळ राहील आणि नंतरच्या कोणत्याही किरकोळ खर्चासाठी उपयोगी पडेल. आपल्याला या दिवसात बोनस रूपाने जास्तीचा पैसा मिळालेला असतो, म्हणून की काय उथळ पैशाला खळखळाट अधिक याप्रमाणे आपण ७०० ते ८०० रूपयाचे फटाके व इतर वस्तू घेण्यासाठी मागेपुढे पाहत नाही. बोनस रूपाने १५ ते २० हजार रुपये मिळाल्यास खिसा गरम असल्याचे जाणवते. म्हणून ८०० ऐवजी २ ते ३ हजाराचे फटाके घेतो ही बाब भविष्याच्या दृष्टीने उपयुक्त नाही, म्हणून वर्तमानात पैशाचे महत्व जाणून काटकसरीने खर्च करावा.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात लोकांना प्रलोभन दाखविण्यासाठी मोठ मोठे मॉल, डि मॅट व इतर मोठमोठी दुकाने सजवली जातात. सामान्य नागरिक येथेच फसतात, आपल्याला गरज नसलेली वस्तू कारण नसतांना आपल्या घरात येतात. त्यामुळे आपला हिशेब बिघडतो. त्या वस्तुचा उपयोग देखील होत नाही. कालांतराने ती वस्तू उकीडयावर दिसते.

आजच्या काळात पैशाला वारेमाफ महत्व प्राप्त झाले आहे. पैसा वाचविण्याची बचत करणे काळाची गरज आहे. एका कुटुंबाचे काही पैसे वाचले तर संपूर्ण राज्यात आणि देशात कोट्यवधी रूपयांची बचत होईल.

-------------

विजय सरस्वती सिताराम सोनाग्रहे
9325733836
लेखक/वृत्तपत्र समिक्षक
स्नेहविजय २४, उदयनगर, गल्ली नं. ४,
नागपूर-४४००२४
से.नि. प्रबंधक (सामान्य/परिचालन)
भा.खा.नि. नागपूर.

# रेखा : आयुष्य अधांतरी

(कालच्या अंकावरून पुढे)

----------------

विनोद यांची आई कमला त्यांच्या नात्याविरुद्ध होती. त्यांच्यासाठी, रेखा सेक्स मॅनिएक प्रतिमा असलेली एक बदनाम अभिनेत्री होती जिचा भूतकाळ कलंकित होता आणि ती सून होण्यास अयोग्य होती. रेखांनी स्वतः रेखाः द अनटोल्ड स्टोरीमध्ये हे सांगितले होते.

रेखा आणि विनोद मेहरा यांनी 'घर', 'बिंदिया चमकेगी', 'प्यार की जीत', 'ऐलान' यांसारख्या चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे.



काही महिन्यांनंतर, विनोद यांनी आईच्या इच्छेविरुद्ध रेखांशी गुप्तपणे कलकत्त्यातील एका मंदिरात लग्न केले. पण जेव्हा ते मुंबईत परतले आणि रेखांनी सासूच्या पायांना स्पर्श करण्याचा प्रयत्न केला तेव्हा कमलांनी तिला घरात प्रवेश करण्यापासून रोखून दूर ढकलले. रेखा अपमानित होऊन रडत निघून गेल्या.

ही कहाणी वर्षानुवर्षे चर्चेत राहिली, पण २००४ मध्ये रेखांनी एका मुलाखतीत असे सांगून सर्वांना आश्चर्यचकित केले की त्यांनी विनोद मेहरांशी कधीही लग्न केले नाही, ते फक्त चांगले मित्र होते.

विनोद मेहरा नंतर, रेखा अभिनेते किरण कुमार यांना भेटल्या, जे त्यावेळी त्यांची मैत्रीण योगिता बालीचे प्रियकर होते. योगिता अनेकदा रेखांचा सल्ला घेत असे, परंतु कालांतराने, रेखांचे नाव किरण कुमारशीही जोडले गेले.

रेखा आणि किरण अनेकदा पार्ट्यांमध्ये एकत्र दिसायचे. रेखा त्यांना प्रेमाने किं-किं म्हणत असत, पण या नात्यामुळे त्यांच्या कारकिर्दीला धोका निर्माण झाला. रेखा शूटिंगला उशिरा पोहोचणे किंवा गायब होणे हे सामान्य झाले. रेखा आणि किरण कुमार यांनी कोणत्याही मोठ्या चित्रपटात एकत्र काम केलेले नाही.

किरण यांचे वडील, ज्येष्ठ अभिनेते जीवन हे या नात्याविरुद्ध होते. त्यांना वाटले की रेखासारखी वादग्रस्त पार्श्वभूमी असलेली महिला त्यांची सून होऊ शकत नाही. किरण यांनी वडिलांच्या इच्छेपुढे झुकण्याचा आणि रेखापासून दूर जाण्याचा निर्णय घेतला.

रेखांनी पहिल्या काही चित्रपटांच्या यशानंतर १९७२ मध्ये मुंबईत स्वतःचा फ्लॅट खरेदी केला. त्यावेळी जया भादुरी देखील त्याच अपार्टमेंटमध्ये राहत होत्या. रेखा आणि जया वारंवार भेटत असत. रेखा जयांना प्रेमाने दीदीभाई म्हणत आणि अनेकदा त्यांच्या फ्लॅटला भेटत असे. तिथेच रेखांची पहिली भेट अमिताभ बच्चनशी झाली.

१९७३ मध्ये, जया आणि अमिताभ यांचा जंजीर चित्रपट प्रदर्शित झाला, ज्याने अमिताभ यांना अँग्री यंग मॅन म्हणून स्थापित केले. त्यानंतर जया आणि अमिताभ यांनी ३ जून १९७३ रोजी लग्न केले, परंतु रेखांना आमंत्रित केले गेले नाही.

आलाप, खून पसीना, गंगा की सौगंध, मुकद्दर का सिकंदर, मिस्टर नटवरलाल, सुहाग, सिलसिला यांसारख्या चित्रपटांमध्ये अमिताभ बच्चन आणि रेखा यांनी एकत्र काम केले.

'दो अंजाने' चित्रपटाचा काही भाग कोलकाता येथे चित्रित करण्यात आला होता, जिथे रेखा आणि अमिताभ अनेकदा फ्लोरीच्या टी रूममध्ये जायचे, पार्क स्ट्रीटवर फिरायचे आणि बाहेर खाण्यापिण्यासाठी जायचे.

याच काळात रेखा आणि अमिताभ यांच्या कथित नात्याबद्दलच्या बातम्या माध्यमांमध्ये येऊ लागल्या. रेखा आणि अमिताभ यांच्या खऱ्या आयुष्यातल्या प्रेमाच्या अफवांमुळे त्यांची ऑन-स्क्रीन केमिस्ट्री अधिकच रंजक बनली.

त्याच वेळी, रेखांनी मुकद्दर का सिकंदर (१९७८) या चित्रपटात जोहराबाई नावाच्या वेश्येची भूमिका केली होती. रेखांनी खुलासा केला होता की, 'मुकद्दर का सिकंदर' चित्रपटाच्या ट्रायल रन दरम्यान, त्यांनी जया बच्चनला त्यांचे आणि अमिताभ बच्चनचे प्रेमदृश्य पाहून रडताना पाहिले.

फिल्मफेअरला दिलेल्या मुलाखतीत रेखांनी याबद्दल उघडपणे चर्चा केली. त्यांनी खुलासा केला की अमिताभ यांनी त्यांना दोन अंगठ्या दिल्या होत्या, ज्या त्या नेहमी घालत असे. जेव्हा अमिताभ यांनी त्यांच्यासोबत काम करणे थांबवले तेव्हा रेखांनी त्या अंगठ्या परत केल्या आणि त्यांच्याशी असलेले त्यांचे नाते संपुष्टात आणले.

१९८२-८३ मध्ये 'कुली' चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान अमिताभ बच्चन गंभीर जखमी झाले होते. त्यांच्यावर बंगळुरूमध्ये आपत्कालीन शस्त्रक्रिया करण्यात आली आणि त्यानंतर त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले. स्पष्ट कारणांमुळे, रेखांनी रुग्णालयात येऊ नये अशी जयांची इच्छा होती. या काळात रेखा खूप धार्मिक झाल्याच्या बातम्याही आल्या होत्या. त्यांनी महाकालेश्वर येथे एका जप समारंभाचे नेतृत्व केले आणि तिरुपती मंदिरात अनवाणी पायांनी दर्शन घेतले.

फिल्मफेअरला दिलेल्या मुलाखतीत रेखांनी अमिताभसोबतच्या त्यांच्या नात्याबद्दल सांगितले की, त्यांनी हे त्यांची प्रतिमा, त्यांचे कुटुंब आणि त्यांची मुले जपण्यासाठी केले. मी त्यांच्यावर प्रेम करते की ते माझ्यावर प्रेम करतात हे जनतेला का कळावे? मी त्यांच्यावर प्रेम करते आणि ते माझ्यावर प्रेम करतात.

अशाप्रकारे, अमिताभ बच्चन देखील रेखांच्या आयुष्यातून गायब झाले. त्यानंतर, मुकेश अग्रवाल यांनी रेखांनी १९९० मध्ये लग्न केले. व्यवसायात तोटा होत असल्याने मुकेश अधिकच अस्वस्थ झाले आणि त्यांच्यात वारंवार भांडणे होऊ लागली. रेखा त्यांच्यापासून दूर राहू लागल्या आणि मुंबईला परतल्या. पुढे सहा महिन्यात परस्पर सहमतीने घटस्फोट घेण्याचा निर्णय घेतला. २ ऑक्टोबर १९९० रोजी मुकेश यांनी त्यांच्या फार्महाऊसवर गळफास लावून आत्महत्या केली.

रेखांच्या वैयक्तिक आयुष्यातील उलथापालथीचा त्यांच्या कारकिर्दीवरही परिणाम झाला. आज ती एकाकी आहे आणि एकटीच जगते आहे.

■ ■ ■

# अन्नाची नासाडी.. अक्षम्य अपराध!

आज जागतिक अन्न दिन आहे. या अन्न दिनाची कल्पना सर्वप्रथम हंगेरीच्या फूड अँड एग्रीकल्चर ऑर्गनायझेशनच्या शिष्टमंडळाने,संयुक्त राष्ट्र संघाच्या २० व्या आम परिषदेत नोव्हेंबर १९७९ साली मांडली;पहिल्यांदाच १६ ऑक्टोंबर हा दिवस जागतिक अन्न दिवस म्हणून १९८१ ला साजरा झाला.

ही संस्था संयुक्त राष्ट्र महासंघाची विशेष संस्था आहे. या संस्थेचे १९४ अधिक राष्ट्र सदस्य असून त्याचे मुख्यालय इटलीतील रोम शहरात आहे. गरिबी आणि भूकमारी विषयी जागरूकता वाढविणे आणि त्या संदर्भात उपाययोजना करणे हे या संस्थेचे प्रमुख कार्य आहे.

मानवाच्या तीन मूलभूत गरजांपैकी अन्न हे महत्त्वाचे आद्य गरज आहे. संपूर्ण जगभरातील वाढती लोकसंख्या आणि अन्नाची नासाडी(कमतरता) हे आजचे वैश्विक महासंकट बनू पाहत आहे. आज जागतिक अन्न दिनाच्या निमित्ताने याचे चिंतन संपूर्ण जगभरात होणे अपेक्षित असते. खाद्यांन्नाची नासाडी संपूर्ण जगभरातील दीर्घ काळापासून चालत आलेली मोठी समस्या आहे.

अन्न नासाडीच्या संदर्भात अनेक उपाय योजना, जनजागृती केली जात असते.परंतु त्याचा फारसा परिणाम जाणवत नाही. दरवर्षी जागतिक भूक निदेर्शांक ऑक्टोंबर महिन्यात जाहीर होत असतो. ग्लोबल हंगर इंडेक्स (जागतिक भूक निदेर्शांका) नुसार२०२४ साली संपूर्ण जगभरात १२७ देशांच्या सूचित भारत १०५ व्या स्थानी होता. अन्न नासाडीच्या संदर्भात संपूर्ण जगात चीन नंतर भारत दुसऱ्या क्रमांकावर आहे.



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९९३०८३५४५८

संयुक्त राष्ट्राच्या पर्यावरणीय कार्यक्रम २०२४च्या अहवालानुसार जगभरात २०२२ मध्ये जवळपास १. ०५ अब्ज टन खाद्यांन्नाची नासाडी झाली आहे. तर देशात प्रतिवर्षी ७.८१ कोटी टन अन्नाची नासाडी होत असते. शिवाय दुसरीकडे ७८ कोटी जनता भूकमारीच्या संघषार्ला तोंड देत आहे.

आपल्या देशात प्रतिव्यक्ती किमान ५५ किलोग्रॅम अन्नाची नासाडी होत असते. यात शहरी भागातील नागरिकांचा अन्नाच्या नासाडीत अग्रक्रम आहे.

विद्यमान परिस्थितीत एकूण अन्नाच्या उत्पादनापैकी ४० टक्के अन्नाची नासाडी होत असल्याचे म्हटले जाते. ज्याची किंमत ९२हजार कोटींच्या घरात आहे. सर्वाधिक अन्नाची नासाडी घराघरातील उष्ट्या अन्नामुळे होत असते. रेस्टॉरंट, लग्नकार्य, पार्टी, धार्मिक महापंगतीद्वारे होणाऱ्या अन्नांची नासाडी सर्वश्रुत आहे. एकीकडे भुकेल्या पोटांची संख्या, तर दुसरीकडे उष्ट्या ताटातून फेकून दिल्या जाणारे अन्न ही फार मोठी सामाजिक विकृती मानली पाहिजे.

देशातील निम्मी लोकसंख्या अर्धपोटी उपाशी राहून झोपते, तर दुसरीकडे सकळ आहाराच्या अभावामुळे बालकुपोषण दिवसेंदिवस तीव्र होत आहे. अन्न नासाडी ही अक्षम्य सामाजिक अपराध मानला पाहिजे. आज देशातील अनेक नागरिक सकस आहारांचा साधा खर्चही पेलू शकत नाही. हे सामाजिक असमानता आणि असंवेदनशीलपणाचे लक्षणे मानले पाहिजे.

अन्न नासाडीचे गांभीर्य लक्षात घेता एक सर्वकष राष्ट्रीय धोरण राबविणे गरजेचे आहे. प्रक्रिया केलेले अन्न उघड्यावर फेकणे हा गंभीर अपराध ठरला जावा. अन्नाच्या व्ययतेमुळे पर्यावरणास धोका निर्माण होत आहे. आज हवामान बदलाच्या काळात कृषी उत्पादनतेवर मोठा परिणाम होताना दिसतो. त्यामुळे कृषी उत्पादनात घट होत आहे. परिणामी नैसर्गिक अन्य संकट निर्माण होऊ शकते.

अन्न नासाडीचा मुद्दा पर्यावरण, संसाधनावर दबाव, सामाजिक भुकेचा असंतोलपणा आदी गंभीर समस्यांची जननी आहे. हे गांभीर्य लक्षात घेता अन्न नासाडी टाळण्यासाठी अत्यंत कठोर पाऊल उचलणे गरजेचे आहे.

## वाचक लिहितात

### किंडर जॉय नको, फराळ महत्त्वाचा

दिवाळीचा सण जवळ आला की, सामाजिक प्रसार माध्यमांवरुन किंडर जॉयची जाहिरात दाखवण्यास उधाण येते. या जाहिरातीमध्ये दोन लहान मुले आणि त्यांचे आई-वडील दाखवले आहेत. त्या लहान मुलांना त्यांची आई म्हणते की, मोठ्या माणसांना नमस्कार करा व त्यांचे आशीर्वाद घ्या.

ती मुले आधी आज्जीला आणि नंतर काकूला नमस्कार करतात. नमस्कार केल्यावर काकू त्यांच्या हातामध्ये किंडर जॉय हे चॉकलेट ठेवते. चॉकलेट मिळाल्यावर मुले खुश होतात.

जाहिरातीतील नरेटर म्हणजे निवेदक किंडर जॉय या चॉकलेटवर अनेक बक्षीसे मिळवण्याची संधी असल्याचे सांगतो. ही जाहिरात मुलांचा बुद्धिभेद करणारी आहे. यामुळे मुलांना दिवाळीमध्ये करंजी, शंकरपाळी, चिरोटे, विविध प्रकारचे लाडू आणि चिवडे, चकली करतात आणि ते गोळ्यामेळ्याने खाल्ले जातात हे कधीच कळणार नाही. या जाहिराती भारतीय परंपरा आणि संस्कृती नामशेष करण्याचा प्रयत्न करतात. किंडर जॉय आणि त्यावर मिळणारी बक्षिसे म्हणजेच दिवाळी असे या निष्पाप मुलांना वाटणार. भारतीय मिठाई आणि फराळाचे पदार्थ हे जगाच्या पाठीवर कुठेही मिळणार नाहीत. भारतीय मिठाई आणि फराळाचे पदार्थ यांची स्वतःची अशी एक वेगळी खासियत आहे.

भारतीय पालकांनी दिवाळीमध्ये मुलांना चॉकलेट खायला न देता फराळाचे पदार्थ खायला देऊन आणि त्याचे महत्त्व पटवून देऊन संस्कृती जपणे अनिवार्य आहे. या चॉकलेट विक्रीतून कंपनीचा लाभ होतो आणि मुलांवर चुकीचे संस्कार होतात हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

■ संगिता भोसले, सातारा.

### धर्माचा विजय

मृण्मयी देशपांडे यांच्या मनाचे श्लोक चित्रपटाला त्याच्या नावामुळे सर्वच थरातून विरोध झाला. सभर्थभक्त, हिंदुत्ववादी संघटना व समाज यांनी हे प्रकरण लावून धरले. राष्ट्रसंत समर्थ रामदास स्वामी रचित मनाचे श्लोक या ग्रंथाचा अपमान कोणालाही सहन झाला नाही. परंतू धर्माभिमान नसलेल्या धर्मभ्रष्ट असलेल्या चित्रपटसृष्टीमधील अभिनेते, अभिनेत्रींनी मात्र मनाचे श्लोक या नावाला विरोध करण्याचे कारणच नाही असे मत दिले. पण अखेरीच धर्माचाच विजय होऊन चित्रपटाचे नाव बददले गेले. धमार्साठी लढणारे हे खरे धर्माभिमानी आहेत.

■ शंकर पवार, सातारा.

### उपाशीपोटी झोपणाऱ्यांचे काय?

आज १६ ऑक्टोबर विश्व खाद्यान्न दिवस म्हणून जगभरात साजरा केला जात आहे. पण, हे असले दिवस म्हणजे थोतांड असल्याचे जाणवते. मागच्या चार पाच दिवसांपासून नागपूर शहरात बघतो ते काय, प्रत्येक चौक गजबजला आहे, कापड दुकानात गर्दी मावत नाही, दिवाळी आल्याने सर्वत्र खरेदीला उधाण आले आहे. लोकांच्या खिशात पैसा मावत नाही. दुसरीकडे, सकाळी सकाळी दारासमोर धान्य, शिजलेले अन्न किंवा रूपया, दोन रूपये मागण्यासाठी दिनवाण्या नजरेने आर्जव करीत काही लोकं लहान मुले घेवून उभी दिसतात. काय भेसूर चित्र आहे देशाचे? जेवणाच्या पंक्ती असोत, बफे पद्धत असो, सामुहिक भोजनाचे कार्यक्रम असोत, अन्नाची मोठ्या प्रमाणात नासाडी होते आणि हजारो लोकं रात्री उपाशीपोटी झोपतात. कधी थांबणार आहे हे. महासत्ता होण्याच्या दिशेने आमचा देश वाटचाल करतो आहे म्हणे. ज्या देशात लोकं उपाशी झोपतात तो देश खरेच अल्पावधीत प्रगती करू शकेल का? राजकारणी, पुढारी विचार करणार नाहीत. आम्ही भारतियांनी अन्नाची नासाडी करणे थांबवायला हवे.

■ शर्मिला नंदनवार, नागपूर.

# वारंवार हात धुतल्याने आपण आजारी पडू शकतो?

हात धुणे एक आवश्यक सवय आहे, ज्यामुळे अनेक आजारांपासून आपल्याला वाचता येते. आपला हात नेहमी मोबाईल, दरवाजा, नोटा, गाड्या आणि अन्य खाण्या पिण्याच्या वस्तूंना लागत असतो, त्यामुळे अनेक रोगजंतू त्वचेवर येतात. जर आपण हात नीट धुलते नाही तर ते शरीरात पोहचून आपल्याला आजारी पाडू शकतात. नियमित आणि योग्य प्रकारे हात धुतल्याने डायरिया, सर्दी-पडसे, फ्लू, त्वचा संक्रमण, श्वासाशी संबंधित समस्या आणि कोरोनासारख्या आजारांना रोखता येते.



स्वच्छ हात धुणे हा आजारांपासून बचाव करण्याचा सोपा आणि परिणामकारक मार्ग आहे. परंतू खूप जास्त वेळा हात धुतल्यानेही आपल्याला नुकसान होऊ शकते. जास्त वेळा हात धुतले तर शरीरात काही समस्या निर्माण होऊ शकतात. आपल्या त्वचेवर काही नॅचरल ऑईल आणि गुड बॅक्टेरियात असतात ते आपले रक्षण करत असतात. बाहेरील जंतूशी लढण्यासाठी ते आपली मदत करतात. जेव्हा आपण अधिक वेळा साबण आणि हॅंडवॉशचा वापर करतो तेव्हा त्वचेचे नैसर्गिक संरक्षण हळूहळू निघून जाते. यामुळे त्वचा निष्तेज आणि बेजीव होते, हात लाल होतात, खाज आणि त्वचेला भेगा पडू लागतात. काही लोकात एक्झिमा सारख्या समस्या होतात. त्वचा फाटल्याने बॅक्टेरिया शरीरात सहज प्रवेश करतात. त्यामुळे इंफेक्शनचा धोका वाढतो.

वारंवार हात धुतल्याने शरीरात या समस्या होतात.

त्वचेत जळजळ आणि खाज : वारंवार साबणाने हात धुतल्याने त्वचेचा वरच थर निघून जातो. त्यामुळे त्वचा चुरचुरते,खाज येते, काही वेळा भेगा देखील पडतात.

नॅचरल ऑईलचे नुकसान : आपल्या त्वचेतील नैसर्गिक ऑईल हातांना सॉफ्ट बनवते, जर वारंवार हात धुतले तर ऑईन निघून जाते. त्वचा रुक्ष आणि निर्जिव होते

डर्मेटायटिसः खूप जास्त हात धुतल्याने संपर्क डर्मेटायटिस होऊ शकतो. त्यामुळे स्कीनमध्ये सूज, खाज आणि लालसरपणा होता.

एक्झिमाची समस्या : ज्या लोकांना आधीपासून एक्झिमा आहे, त्यांच्यासाठी वारंवार हात धुण्याने गंभीर समस्या होऊ शकते. हा आजार आणखीन वाढू शकतो. त्यामुळे हाताला सारखे जळजळणे आणि चुरचुरणे सुरु होऊ शकते.

संक्रमणाचा धोका वाढतो : जेव्हा त्वचा फाटते किंवा त्याचे भेगा पडतात. तेव्हा बॅक्टेरिया शरीरात सहज जाऊ शकतात.त्यामुळे संक्रमणाचा धोका आणखीन वाढतो.


**हात केव्हा आणि कसे धुवावेत ?**

हात धुणे गरजेचे आहेत. परंतू आवश्यक असेल तेव्हाच ते धुवावेत. टॉयलेटला जाऊन आल्यानंतर, जेवणापूर्वी, बाहेर घरात आल्यानंतर, आजारी व्यक्तीला स्पर्श केल्यानंतर शिंकणे किंवा खोकल्यानंतर हात धुणे गरजेचे आहे. किमान २० सेंकद वाहत्या पाण्याखाली साबणाने हात धुवावे, बोटांचे मधले भाग, नखांचा खालचा भाग आणि हाताचा भाग नीट चोळून धुवावा.

■ ■ ■

## अशोकायन

प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)



### निवडणूकीचे वारे

वाहू लागले आता
निवडणूकीचे वारे
मेळावे प्रचार यात्रेने
वातावरण ढवळेल सारे ..

नवश्या गवश्यांनाही
दिवसा दिसू लागले तारे
टीकीट मिळवण्यासाठी
फिल्डींग लावती सारे ..

मतदारांना आता
लवून करती मुजरे
तुम्हीच आमचे माय बाप
लक्ष असू द्या बरे ... !

# अभय भुतडा फाउंडेशनतर्फे महाराष्ट्रातील पूरग्रस्तांसाठी सीएम रिलीफ फंडास ५ कोटी रुपयांची देणगी

**मुंबई, १५ ऑक्टोबर :** एकतेचा आणि करुणेचा सामर्थ्यशाली संदेश देत, अभय भुतडा फाउंडेशनने महाराष्ट्रातील पुरग्रस्त भागांना मदत करण्यासाठी ८ कोटींचे योगदान जाहीर केले आहे. यापैकी छ५ कोटींची रक्कम महाराष्ट्र मुख्यमंत्री सहाय्यता निधीस देण्यात आली असून, राज्यभरातील भीषण पुरानंतर तत्काळ मदत आणि पुनर्वसनाच्या कामांसाठी ही मदत उपयोगात आणली जाणार आहे.




उद्योजक, परोपकारी आणि अभय भुतडा फाउंडेशनचे अध्यक्ष सीए अभय भुतडा यांनी स्वत: मुंबईत महाराष्ट्र राज्याचे माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ५ कोटींचा धनादेश सुपूर्द केला. या मदतीबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी मन:पूर्वक कृतज्ञता व्यक्त केली आणि राज्य सरकारच्या पुनर्वसन उपक्रमांना गती देण्यासाठी या योगदानाचे महत्त्व अधोरेखित केले.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीला दिलेल्या मदतीव्यतिरिक्त, या फाउंडेशनतर्फे मराठवाड्यातील पूरग्रस्त भागात कार्यरत असलेल्या स्थानिक संस्थांना ३ कोटींचे योगदान दिले आहे. पुरामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना त्यांचे घर, उपजीविका आणि आशेचा पुनर्निर्माण करण्यासाठी मदत करणे, हे या मदतीचे उद्दिष्ट आहे. 'समाजिक योगदान ही केवळ जबाबदारी नाही, तर ही एक अंत:प्रेरणा आहे.', असे सीए अभय भुतडा म्हणाले. पुराचा सर्वाधिक फटका बसलेल्या लातूरसारख्या जिल्ह्यात जन्म झाल्याने ही आपत्ती म्हणजे माझ्यावरच आपत्ती आल्यासारखी वाटते. आपले शेतकरी आणि समाज सक्षम आहेत, पण त्यांना पुन्हा उभे राहण्यासाठी आपण सगळ्यांनी मिळून पाठींबा देणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक नागरिकाने सोबत यावे आणि मनापासून मदत करावी, अशी मी विनंती करतो.

आरोग्य, शिक्षण, क्रीडा, सांस्कृतिक जतन आणि आपत्ती निवारण या क्षेत्रांतील परिणामकारक उपक्रमांद्वारे जीवनमान उंचावण्यास अभय भुतडा फाउंडेशन कटिबद्ध आहे. सर्वसमावेशक विकास आणि दीर्घकालीन परिवर्तनावर लक्ष केंद्रीत ठेवत, फाउंडेशनने देशभरातील ५ लाखांहून अधिक लोकांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम घडवला आहे.

हे नवीनतम योगदान संकटाच्या काळात समाजासोबत उभे राहण्यासाठी आणि त्यांना अधिक आशादायक उद्यासाठी सक्षम करण्यासाठी फाउंडेशनच्या अटळ वचनबद्धतेला अधोरेखित करते.

# टाटा मोटर्सकडून नवीन एलपीटी ८१२ लाँच, नफ्यामध्ये नवीन मापदंड स्थापित केले

**मुंबई, १५ ऑक्टोबर :** टाटा मोटर्स या भारतातील सर्वात मोठ्या व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनीने आज इंटरमीजीएट, लाइट अँड मेडियम कमर्शियल वेईकल्स (आयएलएमसीव्ही) श्रेणीमधील नवीन टाटा एलपीटी ८१२च्या लाँचची घोषणा केली. ऑपरेशनल कार्यक्षमता आणि एकूण मालकीहक्क खर्चामध्ये नवीन मापदंड स्थापित करत टाटा एलपीटी ८१२ ची उच्च पेलोड क्षमता आहे. हा ट्रक ताफा मालकांना अधिक नफा देण्यासाठी डिझाइन करण्यात आला आहे.



फॅक्टरीमध्ये बसवण्यात आलेल्या एअर-कंडिशनिंगसह सुसज्ज एलपीटी ८१२ भारतातील पहिला ५-टन प्रमाणित पेलोडसह ४ टायर असलेला ट्रक आहे, जो शहरामध्ये सुलभ कार्यसंचालनासह अद्वितीय पेलोड क्षमता देतो. टाटा मोटर्सच्या प्रमाणित एलपीटी प्लॅटफॉर्मवर डिझाइन करण्यात आलेला हा ट्रक ६ टायर असलेल्या वेईकलच्या मजबूतीसह ४ टायर ट्रकची कार्यक्षमता, गतीशीलता आणि कमी देखभाल देतो. विविध लोड बॉडी पर्यायांसह ऑफर करण्यात आलेला हा ट्रक औद्योगिक सामान, बाजारपेठेतील सामान, एफअँडव्ही, कूरिअर अशा विविध उपयोजनांसाठी वापरता येऊ शकतो.

या लाँचबाबत मत व्यक्त करत टाटा मोटर्स कमर्शियल वेईकल्सच्या ट्रक्स विभागाचे उपाध्यक्ष व व्यवसाय प्रमुख राजेश कौल म्हणाले, टाटा एलपीटी ८१२ चे लाँच श्रेणीमध्ये ग्राहकांच्या नफ्यात नवीन मापदंड स्थापित करतो. हा श्रेणीला नव्या उंचीवर घेऊन जाणारा ट्रक सुधारित उत्पादकतेसाठी वाढत्या गरजेची पूर्तता करतो, तसेच उच्च दर्जाची इंधन कार्यक्षमता, सहज कार्यसंचालन आणि अधिकतम अपटाइम देतो. यामधून बाजारपेठेतील बदलत्या गरजांची पूर्तता करण्याप्रती आणि ग्राहकांसाठी दीर्घकालीन व्यवसाय वाढीला चालना देणारे प्रगत सोल्यूशन्स विकसित करण्याप्रती आमची कटिबद्धता दिसून येते.''

टाटा मोटर्स ४ ते १९ टन जीव्हीडब्ल्यू आयएलएमसीव्ही श्रेणीमध्ये उत्पादनांची व्यापक रेंज देते. वेईकल्स प्रबळपणे डिझाइन करण्यात येतात आणि ग्राहकांच्या विविध उपयोजनांमध्ये गरजांची पूर्तता करण्यासाठी प्रखरपणे चाचणी करण्यात येतात. पोर्टफोलिओला पूरक कंपनीच्या संपूर्ण सेवा २.० उपक्रमाच्या माध्यमातून सर्वसमावेशक वेईकल जीवनचक्र व्यवस्थापनासाठी मूल्यवर्धित सेवांची श्रेणी आहे. टाटा मोटर्सचे सानुकूल ताफा व्यवस्थापनासाठी नेक्स्ट जनरेशन डिजिटल सोल्यूशन फ्लीट एजचा फायदा घेत ऑपरेटर्स वेईकल अपटाइम वाढवू शकतात आणि एकूण मालकीहक्क खर्च कमी करू शकतात. भारतातील ३२०० हून अधिक टचपॉइण्ट्सच्या सर्वात मोठ्या सर्विस नेटवर्ककडून २४७ तास पाठिंब्यासह टाटा मोटर्स आपल्या वेईकलससाठी सर्वोच्च अपटाइम देते.




# सॅमसंगने इंडिया मोबाइल काँग्रेस २०२५ मध्ये एआय फॉर ऑल' दृष्टिकोनासह भारताच्या एआय क्रांतीचे नेतृत्व केले

**मुंबई, १५ ऑक्टोबर :** सॅमसंग हा भारतातील सर्वात मोठा ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँड इंडिया मोबाइल काँग्रेस (आयएमसी) २०२५ येथे त्यांच्याएआय फॉर ऑल' दृष्टिकोनाच्या माध्यमातून व्यक्तींच्या जगण्याच्या, कनेक्ट होण्याच्या आणि नाविन्यता आणण्याच्या पद्धतींना नव्या उंचीवर घेऊन जात आहे. थीम इनोव्हेट टू ट्रान्सफॉर्म'शी संलग्न राहत सॅमसंगचे आयएमसी २०२५ मध्ये प्रदर्शन एआय-समर्थित राहणीमान आणि शाश्वत कनेक्टीव्हीटीच्या भविष्याचा अनुभव देते.

सॅमसंगला ग्राहक व मान्यवरांवरून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला, ज्यामध्ये ईशान्य प्रदेशाचे केंद्रीय दळणवळण व विकास मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया, दळणवळण राज्यमंत्री पेम्मासनी चंद्रशेखर आणि दिल्लीच्या मुख्यमंत्री श्रीमती रेखा गुप्ता यांचा समावेश होता. याशिवाय, दूरसंचार विभागाचे सचिव डॉ. नीरज मित्तल आणि उत्तर प्रदेशचे इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्री सुनील कुमार शर्मा यांनी प्रदर्शनात अत्याधुनिक उपायांचा अनुभव घेतला. सॅमसंग साउथवेस्ट आशियाचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी जेबी पार्क यांनी मान्यवरांचे स्वागत केले, ज्यांनी सॅमसंगच्या आधुनिक एआय-नेतृत्वाखालील नवकल्पना प्रदर्शित केल्या.

इंडिया मोबाइल काँग्रेस व्यक्तींच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणण्यासाठी नाविन्यता आणि तंत्रज्ञान क्षमतेचेसाजरीकरण आहे. सॅमसंगमध्ये आम्ही सखोलपणे हा उत्साह शेअर करतो. आमच्या एआय फॉर ऑल' दृष्टिकोनामधून आमचा विश्वास दिसून येतो की आर्टिफिशियल इंटेलिजन्स भारतभरातील प्रत्येक व्यक्तीला, व्यवसायाला आणि समुदायाला सक्षम करेल. आम्ही आयएमसी २०२५ मध्ये आमच्या एआय-नेतृत्वित नाविन्यतांचे प्रदर्शन दाखवत असताना भारतासह सहयोगाने भविष्य घडवण्याप्रती आमची कटिबद्धता अधिक दृढ करत आहोत, जेथे तंत्रज्ञान सर्वसमावेशकतेला चालना देते, नवीन संधी निर्माण करते आणि व्यक्तींना उत्तम, स्मार्ट जीवन जगण्यास मदत करते,'' असे सॅमसंग साऊथवेस्ट आशियाचे अध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी जेबी पार्क म्हणाले.

एआय-संचालित तंत्रज्ञानामधील अग्रणी सॅमसंग डिवाईसेसमध्ये सर्वोत्तमतेला विनासायासपणे एकीकृत करत भविष्याला आकार देत आहे. सॅमसंग एआय होम स्मार्टफोन्स व टीव्हीपासून वेअरेबल्स व अप्लायन्सेसपर्यंत श्रेणींमध्ये सक्रिय, संघटित अनुभव देते. या परिसंस्थेच्या केंद्रस्थानी असलेले स्मार्टथिंग्ज ॲप सॅमसंग उत्पादनांना हजारो सहयोगी डिवाईसेसशी कनेक्ट करते, घरामध्ये असे वातावरण निर्माण करते, जे वापरकर्त्यांसाठी, तसेच त्यांच्यासह देखील काम करते.

# लाईट्स, कॅमेरा, अबू धाबी: दीपिका पदुकोण बनली एक्सपिरियन्स अबू धाबीची नवीन ब्रँड ॲम्बेसेडर

**मुंबई, १५ ऑक्टोबर :** अबू धाबीच्या डिपार्टमेंट ऑफ कल्चर अँड टुरिझम (डीसीटी अबू धाबी) यांच्या एक्सपिरियन्स अबू धाबी या डेस्टिनेशन ब्रँडने दीपिका पदुकोणची नवीन रीजनल ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून घोषणा केली आहे. दीपिका आपल्या पती आणि बॉलीवूड आयकॉन रणवीर सिंगसोबत या मोहिमेत सामील होत आहे. रणवीर सिंग २०२३ पासून एक्सपिरियन्स अबू धाबीचे ब्रँड ॲम्बेसेडर आहेत, आणि दोघे मिळून अबू धाबीचे प्रतिनिधित्व करणारे पहिले बॉलीवूड पॉवर कपल ठरले आहेत. या मोहिमेद्वारे ते अबू धाबीला प्रत्येक प्रवाश्यांशी वैयक्तिक आणि भावनिकरित्या जोडणारे ठिकाण म्हणून सादर करणार आहेत.

बॉलीवूड स्टार रणवीर सिंग म्हणाले अबू धाबी हे सर्वोत्तम कौटुंबिक ठिकाण आहे. इथे संस्कृती, साहस, समुद्रकिनारे, मनोरंजन जे काही तुम्हाला हवे आहे ते सर्व मिळेल. अनेक वर्षांपासून मला ही सिटी जगासमोर सादर करण्याचा अभिमान आहे आणि आता माझी पत्नी दीपिका ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून सहभागी होत असल्याने हा प्रवास तिला सोबत अनुभवता येणार असल्याने मला आणखी आनंद होत आहे. आम्ही अबू धाबीतील कौटुंबिक आकर्षणांपासून ते



अमिराती आदरातिथ्यापर्यंत सर्व खास गोष्टी साजऱ्या करत आहोत. हे असे ठिकाण आहे जिथे लोक आयुष्यभरासाठी आठवणी तयार करतात.

दीपिका पदुकोण म्हणाली, प्रियजनांसोबतचा प्रवास नेहमीच अधिक खास असतो. रणवीरने गेल्या तीन वर्षांत अबू धाबीचा मोठ्या उत्साहाने अनुभव घेतला आहे आणि आता मला त्याच्यासोबत हा प्रवास करण्याची संधी मिळत आहे. या सुंदर शहरातील प्रत्येक अनुभव, त्याची समृद्ध परंपरा, तसेच कुटुंबासारखे स्वागत अनुभवता यावा यासाठी मी खूप उत्सुक आहे. अबू धाबीमध्ये पुढील प्रवासाबद्दल मी अत्यंत आनंदी आहे.

ओळखीच्या चेहऱ्यांद्वारे प्रामाणिक कथा सादर करत, एक्सपिरियन्स अबू धाबी भारतीय प्रेक्षकांना त्यांच्या आवडत्या कपलच्या नजरेतून अबू धाबीचा अनुभव घेण्यासाठी आमंत्रित करत आहे.

दीपिका आणि रणवीरची ही नवीन ब्रँड फिल्म पाहण्यासाठी [https://www.youtube.com/watch?v=7bibLqUrw8M] ला भेट द्या. उत्साहित झाला आहात का? तर आपल्या प्रवासाची योजना तयार करण्यासाठी visitabudhabi.ae वर जा.

# भारतात श्रेणीमधील पहिला ओआयएस कॅमेरा आणि सुधारित टिकाऊपणा असलेल्या सॅमसंग गॅलेक्सी एम१७ ५जी च्या विक्रीला सुरूवात

***मुंबई, १५ ऑक्टोबर :*** *सॅमसंगने आज घोषणा केली की, भारतातील ग्राहक आजपासून नुकतेच लाँच करण्यात आलेला गॅलेक्सी एम१७ ५जी खरेदी करू शकतात. गॅलेक्सी एम१७ ५जी ॲमेझॉन, Samsung.com आणि निवडक रिटेल स्टोअर्सच्या माध्यमातून ४/१२/८ जीबी व्हेरिएण्टसाठी १२४९९ रूपयांपासून उपलब्ध असेल. ६/१२८ जीबी आणि ८/१२८ जीबी व्हेरिएण्ट्स अनुक्रमे १३९९९ रूपये व १५४९९ रूपये या किमतींमध्ये उपलब्ध असतील. ग्राहक सर्व आघाडीच्या बँका/एनबीएफसी सहयोगींच्या माध्यमातून सुलभ ईएमआय ऑफर्सचा म्हणजेच जवळपास ३ महिने नो कॉस्ट ईएमआयचा देखील लाभ घेऊ शकतात.*

*गॅलेक्सी एम१७ ५जी सॅमसंगचा भारतातील सर्वाधिक विक्री होणारा स्मार्टफोन गॅलेक्सी ए१६ ५जीला मिळालेल्या यशाच्या आधारावर डिझाइन करण्यात आला आहे आणि अधिकाधिक ग्राहकांना अत्याधुनिक एआय नाविन्यतांचा अनुभव देण्याचा सॅमसंगचा वारसा पुढे घेऊन जातो.*

*हा डिवाईस १०००० रूपये ते १५००० रूपये श्रेणीमध्ये 'नो शेक कॅमेरा', तसेच ५० मेगापिक्सल ओआयएस ट्रिपल-कॅमेरा सिस्टमसह येतो, जी ब्लर-फ्री फोटो व शेक-फ्री व्हिडिओज कॅप्चर करण्यासाठी डिझाइन करण्यात आली आहे. वैविध्यपूर्ण ट्रिपल-लेन्स सेटअपमध्ये अल्ट्रा-वाइड कॅमेरा आणि मॅक्रो कॅमेरा आहे, जे प्रत्येक सीनसाठी स्थिर फ्रेमिंग देतात. गॅलेक्सी एम१७ ५जी मध्ये श्रेणीमधील अग्रणी १३ मेगापिक्सल हाय रिझॉल्येशन फ्रण्ट कॅमेरा आहे, ज्यामधून आकर्षक सेल्फीज कॅप्चर करता येतात.*

*गॅलेक्सी एम१७ ५जी ओएस अपग्रेड्सच्या सहा जनरेशन्स आणि सहा वर्ष सिक्युरिटी अपडेट्ससह येतो. तसेच या डिवाईसमध्ये ऑन-डिवाईस वॉईल मेल देखील आहे, जे कॉलर्सना कॉल न उचलल्यास संदेश पाठवण्याची सुविधा देते, हे श्रेणीमधील पहिले वैशिष्ट्य आहे.*

*गॅलेक्सी एम१७ ५जी मध्ये सॅमसंगचे सर्वात प्रगत, हार्डवेअर-आधारित सिक्युरिटी इनोव्हेशन 'सॅमसंग नॉक्स वॉल्ट' आहे, जे वापरकर्त्यांच्या डेटाचे हार्डवेअर व सॉफ्टवेअर धोक्यांपासून संरक्षण करते. तसेच, सर्वोत्तम वैशिष्ट्ये आहेत, जसे वॉईस फोकस मागील आवाज कमी करते, सुस्पष्ट व अधिक सर्वोत्तम कॉल क्वॉलिटीची खात्री देते. या डिवाईसमध्ये सॅमसंग वॉलेटसह 'टॅप अँड पे' कार्यक्षमता देखील आहे, ज्यामुळे ग्राहक फक्त एका टॅपसह सहज पेमेंट्स करू शकतात.*

# एनपीसीआयकडून सणासुदीच्या काळात सुरक्षित डिजिटल पेमेंटसाठी ५ महत्त्वाच्या सुरक्षा टिप्स

**नागपूर, १५ ऑक्टोबर :** सण म्हणजे आनंद, भेटवस्तू आणि वाढत्या खरेदीचा काळ. सणासुदीमध्ये ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही माध्यमांमध्ये आकर्षक सवलती, मर्यादित कालावधीसाठी विक्री आणि कॅशबॅक ऑफर्स उपलब्ध असतात, ज्यामुळे ग्राहकांना जलद खरेदीचे निर्णय घ्यायला प्रोत्साहन मिळते. या सणाच्या गडबडीत, अनेक जण अवघड वाटणारी पण चांगली संधी मिळवण्यासाठी उतावळेपणाने कृती करतात. घोटाळेबाजांना या वर्तनात्मक पद्धतींची जाणीव असते आणि ते अनेकदा सोशल इंजिनिअरिंगद्वारे त्यांचा गैरफायदा घेतात. तंत्रज्ञानासोबत घोटाळे होत असताना, जागरूकता आणि काही जागरूक पावले वापरकर्त्यांना सुरक्षित आणि अखंड अनुभव घेण्यास मदत करू शकतात.

फक्त अधिकृत ॲप्स आणि वेबसाइट्सवरच खरेदी करा: फसवे लोक विशेषत: सणासुदीच्या सेलच्या काळात बनावट वेबसाइट्स आणि लिंक्स तयार करतात, ज्याद्वारे ते वैयक्तिक व पेमेंटसंबंधी माहिती चोरतात. नेहमी वेबसाइटचा पत्ता स्वत: टाइप करा किंवा अधिकृत ॲप वापरा. प्रचारात्मक ई-मेल्स, एसएमएस किंवा फॉरवर्ड केलेल्या संदेशांमधील लिंक्सवर क्लिक करण्याचे टाळा. अज्ञात स्रोतांमधून आलेल्या फाइल्स डाउनलोड करू नका किंवा लिंक्सवर क्लिक करू नका, कारण त्यामध्ये हानिकारक सॉफ्टवेअर असू शकते आणि ते तुमच्या डिव्हाइसचा प्रवेश मिळवू शकतात.

फक्त प्लॅटफॉर्मच्या आतच पेमेंट पूर्ण करा: काही फसवणूक करणारे लोक वापरकर्त्यांना शॉपिंग ॲप किंवा वेबसाइटच्या बाहेरील यूआयडी (यूपीआय आयडी) किंवा लिंक्सवर पेमेंट करण्यास प्रवृत्त करतात, ज्यामुळे सुरक्षा तपासणी टाळली जाते. नेहमी अधिकृत चेकआउट पेजवरच व्यवहार पूर्ण करा आणि विक्रेत्याच्या तपशीलांची खात्री करून घ्या.

फ्री व्हाउचर आणि कॅशबॅकच्या आश्वासनांपासून सावध राहा: रिवॉर्ड्स, कॅशबॅक किंवा सणासुदीच्या भेटवस्तूंचे संदेश अनेकदा ओटीपी, खात्याची माहिती किंवा लहान फी मागतात. खरी ऑफर्स कधीही संवेदनशील माहिती किंवा आगाऊ पैसे मागत नाहीत. कोणतीही कृती करण्यापूर्वी थोडा थांबा आणि खात्री करून घ्या.

अनपेक्षित ओटीपी विनंत्यांकडे इशाऱ्यासारखे पाहा: काही संदेशांमध्ये पेमेंट अयशस्वी झाले किंवा खाते ब्लॉक झाले असा दावा करून समस्या सुधारण्यासाठी ओटीपी मागितले जातात. ओटीपी हे फक्त वापरकर्त्यांनी सुरू केलेल्या व्यवहाराची पुष्टी करण्यासाठी असतात. बँका किंवा पेमेंट ॲप्स कधीही फोन किंवा संदेशाद्वारे ओटीपी विचारत नाहीत.

दडपणाखाली कृती करू नका: फसवणूक करणारे लोक ऑफर लवकरच संपणार आहे किंवा तुमचे खाते ब्लॉक होईल असे सांगून घाई निर्माण करतात. खरे प्लॅटफॉर्म भीती किंवा दडपण निर्माण करणाऱ्या पद्धतींचा वापर करत नाहीत. प्रतिसाद देण्यापूर्वी थोडा वेळ घेऊन माहितीची पडताळणी करा.

सुरक्षित व्यवहाराचा अनुभव मिळवण्यासाठी वापरकर्त्यांनी थांबा, विचार करा आणि कृती करा हा सिद्धांत अवलंबावा. अनपेक्षित विनंती आल्यास थांबणे, मिळालेल्या माहितीकडे विचारपूर्वक पाहून तिची पडताळणी करणे आणि शहाणपणाने कृती करणे या तीन टप्प्यांद्वारे वापरकर्ते आपले व्यवहार सुरक्षित ठेवू शकतात आणि संवेदनशील माहितीचे संरक्षण करू शकतात, ज्यामुळे सुरक्षित आणि विश्वासार्ह डिजिटल अनुभव सुनिश्चित होतो.



## आज का अंदाज

गुरूवार १६ ऑक्टोबर २०२५

### पत्थर फोड एकच

| कल्याण बाजार | | | | मुंबई बाजार | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ० | १ | ४ | ७ | ३ | ५ | ६ | ९ |
| २८० | २९० | ४४६ | १७९ | १२० | ६१० | १५० | १८० |
| ३७० | ३८० | २४८ | २५० | ३०० | ७८० | २६८ | ३७९ |
| ४६० | ४७० | ३४७ | ३४० | ४१० | ५०० | ७१० | २७० |
| ०२ | १२ | ४३ | ७३ | ३१ | ५१ | ६२ | ९२ |
| ०५ | १५ | ४६ | ७६ | ३८ | ५८ | ६४ | ९४ |
| ०८ | १८ | ४९ | ७९ | ३७ | ५७ | ६० | ९० |

### १६ ऑक्टोबर : सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| २१ | ५१ | ६७ | ९७ |
| २० | ५० | ६३ | ९३ |
| २८ | ५८ | ६४ | ९५ |
| ३४५ | २३० | २४० | १९९ |
| ६७९ | ३५७ | ३६७ | २८९ |
| ४८० | १२२ | १७८ | ३७९ |

कल्याण व मुंबई करिता तसेच सर्व बाजारासाठी जबरदस्त पास होणारे चान्सेस मिळतील.

प्रो. बालाजी कुमार ९८२२४८६०३४


# प्राईड हॉटेल्स लिमिटेडने आयपीओसाठी सेबीकडे दाखल केले डीआरएचपी

**मुंबई, १५ ऑक्टोबर :** प्राईड हॉटेल्स लिमिटेड, ज्याचे मुख्यालय नवी दिल्ली येथे आहे, यांनी आपला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस सेबीकडे इनिशिअल पब्लिक ऑफरिंग साठी दाखल केला आहे. ही कंपनी अपस्केल, अपर मिडस्केल आणि मिडस्केल सेगमेंटमध्ये चेन-ओन्ड इन्व्हेंटरीच्या दृष्टीने भारतातील सहाव्या क्रमांकाची हॉटेल चेन आहे (स्रोत : हॉर्वाथ रिपोर्ट).

या ऑफरमध्ये २६० कोटी इतक्या रकमेचे नव्या इक्विटी शेअर्सचे फ्रेश इश्यू आणि एकूण ३९,२३९,४४६ इक्विटी शेअर्सचा (फेस व्हॅल्यू ५ प्रत्येकी) ऑफर फॉर सेल समाविष्ट आहे.

ऑफर फॉर सेलमध्ये सुरेशचंद प्रेमचंद जैन यांच्याकडून ५,९६३,९७८ शेअर्स, मिना सुरेशचंद जैन यांच्याकडून २,२०५,०३० शेअर्स, सत्येन सुरेश जैन यांच्याकडून ५,३४४,७४० शेअर्स, एएसपी एंटरप्रायझेस प्रायव्हेट लिमिटेडकडून ४,९६४,३५० शेअर्स, दएक्झिक्युटिव्ह इन लिमिटेडकडून २,३९४,१३६ शेअर्स, कोप्रा इस्टेट प्रायव्हेट लिमिटेडकडून ३,०४९,०१० शेअर्स आणि प्राईड प्लाझा (इ) प्रायव्हेट लिमिटेडकडून २,६५१,३१३ शेअर्सचा समावेश आहे.

या विक्रीत नम्रता गर्ग यांच्या ९८,५०० शेअर्सचा, एक्झिक्युटिव्ह हाऊसिंग फायनान्स कंपनी लिमिटेड च्या २,३८६,१८३ शेअर्सचा, प्राईड पॅराडाईज अँड डेव्हलपमेंट प्रायव्हेट लिमिटेडच्या ६८३,७२० शेअर्सचा, प्राईड सेंटर अँड डेव्हलपमेंट प्रायव्हेट लिमिटेड च्या १,१९३,०९१ शेअर्सचा, प्राईड ऑर्चर्ड्स प्रायव्हेट लिमिटेड च्या ६६२,८२८ शेअर्सचा, एसपी रियल्टर्स प्रायव्हेट लिमिटेड च्या २,५१८,७४८ शेअर्सचा, एसपी कॅपिटल कन्सल्टंट्स प्रायव्हेट लिमिटेड च्या १,८५५,९१९ शेअर्सचा आणि एसपी कॅपिटल फायनान्सिंग लिमिटेड च्या ३,२६७,९०० शेअर्सचा समावेश आहे. याचा तपशील ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (प्रवर्तक गटातील विक्री करणारे शेअरहोल्डर्स) मध्ये दिला आहे.

## राशीभविष्य

**मेष :** आज पालकांच्या आरोग्याबद्दल काळजी वाटू शकते. खर्चात जास्त उदारता दाखवू नका किंवा इतरांच्या कामात हस्तक्षेप करू नका; यामुळे तुमच्या आयुष्यात शांती येईल.

**वृषभ :** आज सावधगिरी बाळगा, जास्त विचार केल्याने वेळ वाया जाऊ शकतो, म्हणून जर तुम्ही काही साध्य केले तर लगेच त्यावर काम करायला सुरुवात करा. तुमचा राग नियंत्रित करा.

**मिथुन :** घरातील वातावरण अनुकूल असेल आणि तुमचा कामाचा ताण कमी असेल. सामाजिक कार्यात तुमची कार्यक्षमता आणि कौशल्याचे कौतुक केले जाईल. आवडत्या कामात मन गुंतवा, मन:शांति मिळवा.

**कर्क :** आज, बहुतेक बाबतीत तुम्ही भाग्यवान असाल. तुम्ही कुटुंबातील सदस्यांसोबत खरेदी करण्यात व्यस्त असाल. तुमच्या भावांसोबत सुरू असलेले वाद मिटतील आणि नातं अधिक सौहार्दपूर्ण होईल.

**सिंह :** आज तुम्ही काही ठोस निर्णय घ्याल जे पूर्णपणे योग्य ठरतील. मार्केटिंगशी संबंधित कामांकडे विशेष लक्ष द्या. वरिष्ठांच्या मदतीने कामाशी संबंधित कोणत्याही समस्या सोडवल्या जातील.

**कन्या :** कोणालाही मदत करण्यापूर्वी, तुमच्या आर्थिक परिस्थितीचे मूल्यांकन करा. नकारात्मक विचार मनात येऊ देऊ नका. आजचा दिवस चढ-उतारांनी भरलेला असेल. तुम्हाला मित्राकडून आर्थिक मदत मिळेल.

**तुळ :** भविष्यात सर्व काही ठीक होईल. आज, कामे हळूहळू पूर्ण होतील, पण फायदेशीर ठरतील. तुमची मुले आज तुमचे विचार तुमच्यासोबत शेअर करू शकतात ज्यामुळे सुसंवाद निर्माण होईल.

**वृश्चिक :** अनावश्यक खर्च टाळा आणि योग्य बजेट ठेवा. नवं काम सुरू करण्यासाठी घाई नको, योग्य वेळेची वाट पहा. तुमच्या व्यवसाय योजना आणि कार्यपद्धती कोणालाही सांगू नका.


**धनु :** आज तुमच्या आयुष्यात सकारात्मक ऊर्जा येईल, इतरांना प्रेरणा देण्याची तुमची क्षमता आज तुमचे नाते आणखी गोड करेल. सर्जनशील कार्यात सहभागी होण्याने तुम्हाला केवळ आनंदच मिळेल.

**मकर :** काळानुरूप तुमचा स्वभाव बदला. तुम्ही तुमच्या मनात काहीतरी विचार करत असाल, अतिविचार करू नका. आर्थिक बाबींमध्ये तुम्हाला अत्यंत सावधगिरी बाळगण्याची आवश्यकता आहे.

**कुंभ :** आजचा दिवस आत्मविश्वास आणि आशेचा आहे. कोणत्याही परिस्थितीत घरातील वडीलधाजयांचा सल्ला घ्या. भावनांच्या प्रभावाखाली कोणालाही कोणतेही आश्वासन देऊ नका.

**मीन :** सकारात्मकता आणि प्रेमाचे हे वातावरण तुमचा आत्मविश्वास वाढवेल. तुमच्या सभोवतालच्या लोकांमध्ये तुमची एक सकारात्मक प्रतिमा निर्माण होईल. तुमचे आरोग्य चांगले राहील.

## शब्दकोडे क्रमांक २२४१



**आडवे शब्द:-**


१) जयप्रकाश नारायण यांना लोकांनी दिलेली पदवी
५) एकादे काम करण्यासाठी समर्थ असलेला
७) पक्षांना फाशात पकडून शिकार करणारा
११) कापडाचा एक हलका प्रकार
१२) थापा मारणारा
१४) चाकर
१६) मान, प्रतिष्ठा
१७) बारीक खडा
१८) विहीरीतून पाणी काढण्याचे एक विशिष्ठ प्रकारचे भांडे
१९) बागेतील वृक्षांची निगा राखणारा
२०) पाणकोंबडा
२३) रम्य
२५) मनाचा ओढा
२६) सन्मानाची अल्प रक्कम
२७) घाई, त्वरा
२८) सावधगिरी
२९) मत्स्य
३१) दुष्ट, भांडखोर
३३) हिंदीत क्षण
३४) ढोंग उघडकीस येणे
३८) गाढव
३९) एक तारवाद्य
४०) हाक, प्रतिसाद
४१) सेवक
४२) गणितातील अधिक
४४) धनुष्यबाण
४७) सवाद्य मिरवणूक
५१) जुनीच्या विरुद्ध
५२) वस्त्राचा शेवटचा भाग
५३) फुरसत
५४) वरपांगी
५५) अंत:करण
५६) गुणांची कदर करणारा
५८) देणारा
५९) यात्रेस जाणे
६०) पोलिस
६२) कसदार
६४) ✽✽✽ माकत
६५) हिंदीत ढग
६६) जनक राजाची मुलगी, सीता
६७) तिबेटी धर्मगुरु
६८) हाकेला दिलेले उत्तर

**उभे शब्द :-**

१) लोखंडाला चिकटणारा
२) हस्त
३) श्वासोच्छ्वासाचा अवयव
४) गोष्टी सांगणे
५) सुताराकडचे एक हत्यार
६) रम्य
७) पुष्कळ
८) फुलाचा एक भाग
९) दात
१०) धैर्य
१३) चबुतरा, कट्टा
१५) युक्ती
१९) आई ✽✽ मरो मावशी जगो
२१) चिखलाची भुसभुशीत जमीन
२२) गप्प बसण्याचे व्रत
२४) हद्दपार एक शिक्षा
२६) आई-वडील
२७) एक तंतूमय वनस्पती
२९) एक मराठी महिना
३०) शनीचा त्रासदायक फेरा
३१) काठ बाजू
३२) गमन करणे
३३) परत करणे, परतफेड
३५) निष्णांत, वाकबगार
३६) छाती, वक्ष
३७) दुसऱ्याकरिता केलेला खर्च
३८) वाळा-एक अत्तर
३९) सपाट
४१) दानी, दानशूर
४३) पद्धतीनुसार.
४५) माणूसकी
४६) पळसाचा डिंक
४८) उगवत्या सूर्याचा देश
४९) गावातील सहवासी
५०) उसनवार
५५) मोठा राजा
५७) उष्णता, जळजळीतपणा
५८) दरवाजा
५९) वाद्य वाजविणारा
६१) पती, यजमान
६२) अनर्थ, धक्का
६३) हिंदीत उद्या
६५) लहान मुलगी

(उत्तर उद्याच्या अंकात)

### मागील शब्दकोड्याचे उत्तर



# आंतरजिल्ह्यातील दुचाकी चोर जेरबंद

■ महासागर प्रतिनिधी
**रिसोड, दि. १५ :**
गेल्या काही दिवसांपासून पोलीस स्टेशन रिसोड हद्दीतून मोटार सायकल चोरी जाण्याच्या घटना घडल्याने पोलीस स्टेशन रिसोडचे ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी डी.बी. पथकास मार्गदर्शन करून चोरांचा शोध घेऊन मोटारसायकल हस्तगत करण्याबाबत सूचना दिल्या होत्या. त्यावरून डी. बी. पथकाने तपास करून व १२ ऑक्टोबर रोजी संशयित सचिन उर्फ मिठ्ठू अशोक मानकर (रा. रामनगर ता. रिसोड) यास ताब्यात घेऊन त्यास चोरी गेलेल्या मोटार सायकलीबाबत विचारपूस केली असता त्याने

९ मोटार सायकली जप्त



वाशीम व हिंगोली जिल्ह्यातून मोटारसायकल चोरी केल्याची कबूली दिली. त्यानंतर नमूद आरोपीकडून पोलीस स्टेशन रिसोड व वाशिम शहर इत्यादी ठिकाणच्या एकूण ९ मोटारसायकली किंमत ८ लाख २४ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ही कामगिरी पोलीस अधीक्षक अनुज तारे, अपर पोलीस अधीक्षक लता फड, सहायक पोलीस अधीक्षक नवदिप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली व पोलिस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांचे नेतृत्वाखाली डी. बी. पथकाचे पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले, पोलिस हवालदार प्रशांत राजगुरू, महादेव चव्हाण, आशिष पाठक, पोलिस अंमलदार रवी अढागळे, विनोद घनवट, परमेश्वर भोणे, सुनील तिवाले, अमोल ठाकरे, विश्वास चव्हाण, संदीप वाकुडकर यांनी केली आहे.

# अमरावती विद्यापीठाचे अकोल्यात उपकेंद्र

+ ३अधिकाऱ्यांची समिती देणार आराखडा + उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचा आदेश

■ महासागर प्रतिनिधी
**अकोला, दि. १५ :**
'संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र अकोला येथे सुरु करण्याच्या कार्यवाहीसाठी तीन सदस्यीय समिती नेमण्यात येणार आहे. समितीने उपकेंद्रासाठी योग्य जागेची पाहणी करून सविस्तर आराखडा सादर करावा,' असे निर्देश वजा सूचना उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या आहेत. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे उप केंद्र अकोला येथे सुरू करण्याबाबत मंत्रालयात बैठक झाली. श्री. पाटील यांनी आराखडा व अन्य कार्यवाहीच्या अनुषंगाने तीन अधिकाऱ्यांच्या समितीकडून अहवाल मागितला आहे. पश्चिम विदर्भात अकोल्यात विद्यापीठाचे उपकेंद्र सुरू होणे सोयीचे असल्याचे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे. यापूर्वीही केंद्रासाठी प्रयत्न करण्यात आले. मात्र उपकेंद्र सुरु झाले नाही.



दरम्यान भाजपचे आमदार रणधीर सावरकर यांनी उपकेंद्र सुरू करण्याच्या निर्णयासाठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री पाटील यांच्याकडे बैठक घेण्याची मागणी केली. त्यानुसार बैठक झाली. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे क्षेत्र व प्रशासनाचा व्याप लक्षात घेता या विद्यापीठाचे उपकेंद्र अकोला येथे सुरु होणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. पाटील यांनी विद्यापीठाचे कुलगुरू यांना हा प्रस्ताव शासनास सादर करावा, अशी सूचना केली. बैठकीत विद्यापीठाअंतर्गत उपकेंद्र येथे का हवा, आमदार सावरकरांनी सांगितले. विद्यापीठा अंतर्गत ४४१ पैकी २२१ (५० टक्के) महाविद्यालये ४५% विद्यार्थी संख्या या ३ जिल्ह्यांत आहे. देऊळगाव राजा तालुक्यातील महाविद्यालयाचे अमरावती पर्यंतचे अंतर २०० की.मी. पेक्षा जास्त आहे. ३ जिल्ह्यातील महाविद्यालयाची संख्या, ते अंतर लक्षात घेता वेळ खाऊ ठरत असल्याने महाविद्यालय, विद्यार्थी, पालकांना गैरसोयीचे आहे. हे लक्षात घेता श्री. पाटील यांनी येथे उपकेंद्रासाठी जागा शोधण्याचे निर्देश दिले. हे उपकेंद्र सुरू करण्यासाठी महाविद्यालयांचा शोध घेण्यासाठी सांगितले.

# गोपाळकाल्याचे कीर्तन म्हणजे परिवर्तनाची नांदी : विशाल खोले



■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. १५ :**
संत साहित्याचा अभ्यास करून भाविकांनी स्वतःला परिवर्तित करणे हाच खरा गोपालकाला आहे, असे प्रतिपादन विशाल महाराज खोले यांनी गुरुकुंज मोझरी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५७ व्या पुण्यतिथी महोत्सवातील गोपाल काल्याच्या कीर्तनातून केले. ते म्हणाले की, महाराष्ट्राच्या बाहेर कोठेही गोपाल काला होत नसून, गोपाल काल्याची सुरुवात संत ज्ञानेश्वरांनी केली व तुकारामांनी गोपालकाल्याची सांगता केली. त्याचे आचरण राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी करून सर्वांना आणणारा ग्रामगीता ग्रंथ समाजाला गोपालकाल्यातील प्रसाद म्हणून दिला आहे.
प्रसादाची जागा म्हणजे संत. वेळोवेळी वेगवेगळ्या संतांनी समाजाला हा प्रसाद घेऊन जगवले आहे. समाजात रोगी, भोगी, जोगी तसेच सत्वगुणी, रजगुणी व तमगुणी इत्यादी प्रकारचे माणसे असतात. या सगळ्यांना संतांनी भक्ती साधनेचा प्रसाद देऊन त्यांच्यात परिवर्तन घडून आणते. संत ज्ञानोबा, संत तुकारामाला प्रमाण मानून राष्ट्रसंतांनी जगाला पुरस्कृत केले. मर्यादा व क्षमता याचा अंदाज ज्याला येतो त्याला कुणी परास्त करू शकत नाही. राष्ट्रसंतांनी त्यांच्या वाङ्मयात या दोन्ही बाबी शिकवलेल्या आहेत. खोले महाराजांनी त्यांच्या राष्ट्रसंतांचे अभंग व अनेक भजनांचे प्रमाण सादर केले.
दरम्यान गुरुकुंज आश्रम येथे आठ दिवस चाललेल्या या पुण्यतिथी महोत्सवात सामुदायिक ध्यान व प्रार्थना त्यावरील चिंतन ग्रामगीता प्रवचन, आरोग्य व योग शिबिर, रक्तदान शिबिर, ग्रामगीताचार्य पदवीदान समारंभ, कार्यकर्ता संमेलन, महिला संमेलन, खंजिरी भजन, राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धा, कीर्तन संमेलन (गुरुकुंज वारी), अभंग गायन, नाटक इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले. पुण्यतिथी महोत्सवाच्या समारोपीय कार्यक्रमाला संचालक मंडळाच्या अध्यक्ष पुष्पा बोंडे, सुरेंद्र भुयार, कीर्तिकुमार भांगडीया, लक्ष्मण गमे, दामोदर पाटील, जनार्दन बोथे, प्रकाश वाघ, रामदास देशमुख, अॅड. दिलीप कोहळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लक्ष्मण गमे यांनी केले, प्रमुख मार्गदर्शन रवींद्र शिंदे, लक्ष्मणदास काळे यांनी केले. सूत्रसंचालन गोपाल कडू यांनी केले, तर आभार अमोल बांबल यांनी केले. गोपालकाला तयार करण्यासाठी प्रा. सुहास टप्पे, डॉ. एकनाथ मोहोड, विवेक दिघडे यांच्यासह श्रीगुरुदेव आयुर्वेद कॉलेजचे विद्यार्थी, श्रीगुरुदेव मानवसेवा छात्रालयाचे विद्यार्थी, श्रीगुरुदेव विद्यामंदिर शिक्षक व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.
अमरावती राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ५७ व्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त रविवारी गुरुकुंज आश्रमातील महा समाधीपासून पालखी पदयात्रेला सुरुवात झाली. ही पालखी पदयात्रा गुरुकुंज मोझरी-गुरुदेवनगर-दासटेकडी मार्गे टाळ मृदंगाच्या गजरात श्री गुरु देवाच्या जयघोषात निघाली. याचे स्वागत करण्यासाठी मोझरी व गुरुदेव नगरवासीयांनी गावाची साफसफाई केली होती.
मुख्य चौकाचौकात आकर्षक रोषणाई करून व रांगोळी टाकली. या पालखी पदयात्रेत अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाच्या राज्यातील शेकडो शाखांमधून आपल्या गुरु माऊलीची पालखी खांद्यावर घेऊन ही पदयात्रा परिक्रमा उत्साहात पार केली. विविध पुस्तकांचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन श्री गुरुदेव मासिकाचा पुण्यतिथी व दिवाळी विशेषांक आणि रामकृष्ण बेलूरकर लिखित श्री गुरुदेव दिनदर्शिका तसेच मंजुलामाता आणि विश्वयोगी. स्वामी सीतारामदास महाराज, गंगाधर टप्पे लिखित श्रीगुरुदेव विविध पैलू दर्शन या पुस्तकांचे यावेळी प्रकाशन करण्यात आले.

# दिव्य ज्योतीच्या नारी शक्तीचा सांस्कृतिक कार्यक्रम थाटात



■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. १५ :**
दिव्य ज्योती जागृती संस्थान अमरावती द्वारा आयोजित 'संतुलन' (लिंग समानता कार्यक्रम) या सामाजिक उपक्रमांतर्गत नारी शक्तीद्वारे सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन नेरंजबाबू लॉन, बडनेरा रोड येथे करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने झाली. याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सीजीएसटीच्या उपायुक्त वैशाली धांडे, मागासवर्गीय विभागाच्या सहायक आयुक्त वैशाली पाथरे, क्राइम ब्रँचच्या पीआय सीमा दातारकर, उद्योजिका रजनी राठी, महिला काँग्रेस कमिटीच्या शहर अध्यक्ष जयश्री वानखडे, माजी महापौर रिना नंदा उपस्थित होत्या. याप्रसंगी उपस्थित तसेच मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात महिला विंगद्वारे नृत्य, नाटिका, टॉक शो असे सांस्कृतिक कार्यक्रम तसेच पाहुण्यांनी मार्गदर्शन केले. संस्थानद्वारे 'आरोग्य' या सामाजिक उपक्रमांतर्गत महिलांची नि:शुल्क दंत तपासणी करण्यात आली.

# रेल्वेतून २ कोटी रुपयांचे सव्वादोन किलो सोने चोरीला

■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. १५ :**
अमरावतीत सोने विक्री करून उरलेले सोने घेऊन रेल्वेने परत निघालेल्या जळगावचे व्यापारी किशोर ओमप्रकाश वर्मा (४४) यांचे तब्बल २ किलो ३०० ग्रॅम सोने रेल्वेच्या जनरल कोचमधून चोरी झाले. ही घटना १२ ऑक्टोबरला सायंकाळी बडनेरा रेल्वे स्थानकावर घडली. या प्रकरणी बडनेरा रेल्वे पोलिसांनी सोमवारी १३ ऑक्टोबरला सायंकाळी अज्ञात चोरट्यांविरुद्ध २ कोटी ११ लाख ८२,७०५ रुपयांचे सोने चोरीचा गुन्हा दाखल केला. चोरट्यांचा शोध घेण्यासाठी सीसीटीव्ही फुटेज व इतर मार्गाने माहिती घेत असून चोरट्यांच्या शोधात चार पथके विविध ठिकाणी रवाना केले आहेत, असे बडनेरा जीआरपीचे ठाणेदार उमेश मुंढे यांनी सांगितले. किशोर वर्मा हे रविवारी सकाळी जळगाववरून अमरावतीला सोने विक्रीसाठी आले होते. या वेळी त्यांनी अडीच किलो सोने सोबत आणले होते. शहरातील काही व्यापाऱ्यांना त्यांना सोने विकायचे होते. दरम्यान, अमरावतीत त्यांनी एका सुवर्ण विक्रेत्याला १९८ ग्रॅम सोने विक्री केले. त्यानंतर अन्य दोन ते तीन सुवर्ण व्यावसायिकाकडे ते गेले. मात्र त्या ठिकाणी त्यांची भेट न झाल्यामुळे सोने परत घेऊन ते रविवारी सायंकाळी जळगावला परत निघाले. त्यासाठी त्यांनी अमरावतीवरून बडनेरा रेल्वे स्टेशन गाठले.

# न्यू इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालयाची राज्यस्तरावर निवड

■ महासागर प्रतिनिधी
**अकोला, दि. १५ :**
विभागीय शालेय बास्केटबॉल स्पर्धेत न्यू इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाची राज्यस्तरावर निवड करण्यात आली आहे. शालेय शिक्षण विभाग व क्रीडा विभाग, जिल्हा क्रीडा अधिकारी अकोला आणि क्रीडा परिषद यांच्या अंतर्गत आयोजन अमरावती विभागीय शालेय क्रीडा बास्केटबॉल स्पर्धेत संघांनी प्रतिस्पर्धी संघाला एकतर्फी मात देत अजिंक्यपद प्राप्त केले. संघाला मार्गदर्शक म्हणून शा.शि.संजय पांडे, प्रा.नंदकीशोर थुटे, खंडारे, सह क्रीडा शिक्षक तथा शाळेचे उपमुख्याध्यापक उदय हातवळणे यांचे मार्गदर्शन लाभले. अमरावती विभागीय बास्केटबॉल स्पर्धा दिनांक विवेकानंद हायस्कूल यवतमाळ येथे आयोजित करण्यात आल्या होत्या. त्यात एकूण ६ संघ सहभागी झाले होते. न्यू इंग्लिश



हायस्कूल अकोलाच्या संघाने मनपाचे प्रतिनिधित्व करत अजिंक्यपद प्राप्त केले. विभागीय बास्केटबॉल स्पर्धेत न्यू इंग्लिश हायस्कूल संघाने प्रथम यवतमाळ जिल्ह्याचा संघाला एकतर्फी मात देत. अंतिम सामन्यात प्रवेश निश्चित केला.
अंतिम सामन्यात अमरावती मनपा हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या संघाला ५८-२२अशी मात देत विभागीय स्पर्धेत अजिंक्यपद पटकावले आणि राज्यस्तरीय स्पर्धेत आपले स्थान निश्चित केले. राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत अमरावती विभागाचे प्रतिनिधित्व न्यू इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालय करणार आहे. विजयी संघामध्ये निर्भय बोलवे (संघ प्रमुख) नवसाद शेख, श्रवन इनरकर, सुमित यादव, यश अंभोरे, करण यादव, यशपाल, पियुष दिवेकर, जय, काव्ही संघात सहभागी होते.
विजयी संघाचा अकोला एज्युकेशन सोसायटी अकोलाचे कार्याध्यक्ष अॅड. राजेश्वर देशपांडे, उपाध्यक्ष विनोद देव, विलास देशपांडे, सचिव श्रीकृष्ण अमरावतीकर, शार्दुल दिंगबर, न्यू इंग्लिश कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य माधव मुनशी, प्रभारी अमोल बुटे यांनी सत्कार केला.

# नेहरू मैदानात प्रशासकीय इमारत बांधकाम प्रस्तावास युकाँचा विरोध

■ महासागर प्रतिनिधी
**अमरावती, दि. १५ :**
महापालिकेच्या बैठकीत नेहरू मैदानाच्या परिसरात नवीन प्रशासकीय इमारत उभारण्याचा प्रस्ताव मांडण्यात आल्याचे समोर आल्यानंतर शहरातील



नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या पार्श्वभूमीवर युवक काँग्रेसतर्फे मनपा आयुक्तांना निवेदन देऊन या प्रस्तावाला जोरदार विरोध नोंदवण्यात आला. तसेच मैदान संरक्षित सार्वजनिक क्षेत्र घोषित करण्याची मागणी या वेळी करण्यात आली आहे. नेहरू मैदान हे केवळ मोकळे मैदान नसून अमरावतीच्या सामाजिक, सांस्कृतिक, क्रीडा आणि ऐतिहासिक जीवनाचे केंद्रस्थान आहे. या मैदानावर अनेक ऐतिहासिक सभा, जनसंवाद, क्रीडा स्पर्धा, महापौर चषक, दिवाळी फटाका बाजार, बैलपोळा मेळा, नवरात्र काळातील पार्किंग सुविधा आणि इतर विविध उपक्रम पार पडले आहेत. अशा बहुउपयोगी आणि जनतेशी निगडित असलेल्या ठिकाणी प्रशासकीय इमारत उभारण्याचा निर्णय म्हणजे शहराच्या जनभावनांचा अपमान व सार्वजनिक हिताशी संघर्ष असल्याचे युवक काँग्रेसने म्हटले आहे. ही योजना काही लोकप्रतिनिधींच्या टक्केवारीच्या हव्यासातून आणि प्रशासनाच्या मौन संमतीने पुढे रेटली जात असल्याची जनतेत भावना निर्माण झाली आहे, जी लोकशाहीविरोधी आहे, असा थेट आरोप युवक काँग्रेसने केला आहे. मनपा प्रशासनाने हा प्रस्ताव मागे घेतला गेला नाही, तर मनपा प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशारा युवक काँग्रेसच्या वतीने देण्यात आला आहे. या वेळी नेहरू मैदानाची जागा ही मनपाच्या मालकीची नसून जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारीत येत असल्यामुळे सध्यातरी याबाबतीत कुठलाही प्रस्ताव किंवा चर्चा झाली नसल्याचे मनपा आयुक्त सौम्या शर्मा यांनी युवक काँग्रेस पदाधिकाऱ्यांशी झालेल्या चर्चेत सांगितले.


**जाहीर सुचना**

मेरे पक्षकार नामे १) सईदा बानो वि सय्यद याकूब २२/ए गल्ली नं. ४. चॉक्स कॉलोनी, डॉ. आंबेडकर मार्ग, नागपूर- १७, २) रशीदा परविन नासीर बेग, रहना- आशीनगर, गौसीय मस्जीद के पास, टेका नाका, नागपूर- ४४००१७, इन्होने दी हुई जानकारी, निर्देश एवं अधिकार अनुसार आम जनता को सुचित किया जाता है की, मेरे पक्षकार की सास एवं मा नामे मृतक नामे हनीफा बी सय्यद मिरन इनके नाम से सिटी सर्व्हे नं १०५१, प्लॉट नं. ७८३, नझुल प्लॉट गोसीया मस्जीद के पास, नागपूर स्थित घर की मालकीन थी। तथा हनीफा बी सय्यद मिरन इनका देहांत सन ०८.१२.२०१८ को हुआ है। तथा उनका बेटा नामे सय्यद हमीद इसने बिना किसी के सहमती से हिबा नामा तयार किया है। एवं वह खुद को उपरोक्त मालमत्ता का एकमेव वारिस है ऐसा दर्शाता है। लेकीन मेरे पक्षकार यह उपरोक्त संपत्ती मे उनका वारिसाना हक है। इसलिए उपरोक्त संपत्ती बाबत किसी भी प्रकार का व्यवहार सय्यद हमीद से उपरोक्त संपत्ती का सौदा ना किया जाय। अन्यथा कानुनन कारवाई की जायेंगी। यदी उपरोक्त संपत्ती बाबत किसी को कोई आपत्ती हो तो ७ दिन के भितर निचे दिये हुये अधिवक्ता से संपर्क किया जाये।
नागपूर
दिनांक: १४.१०.२०२५
शिल्पा एस. श्रीवास
अधिवक्ता
पत्ता: प्लॉट नं. ३६५, सतराम धाम रोड, जरिपटका, नागपूर-४४००१४
मो.नं. ०९३७२६९३९१५ / ०८६६८३७३४५३


# खाद्यपुर्तीसाठी अन्नाचा एकेक कण वाचविण्याची गरज




रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.


**विश्व** खाद्य दिवस कृतीत बदलायला पाहिजे तेव्हाच जगातील उपासमारी संपुष्टात येईल. खाद्यांन्नाची समस्या पहाता संयुक्त राष्ट्रसंघाने १६ आक्टोंबर १९४५ ला खाद्य व कृषि संघटन (एफएओ ची स्थापना केली. कॉफ्रेस ऑफ द फूड एंड एग्रीकल्चर ऑर्गनाइजेशने १६ आक्टोंबर १९७९ पासून विश्व खाद्य दिवस'साजरा करण्याची घोषणा केली. तेव्हापासुन जगात आंतरराष्ट्रीय विश्व खाद्य दिवस साजरा केला जातो.
उपासमारीच्या समस्येने संपूर्ण जग संघर्ष करीत आहे. भारताची अर्थव्यवस्था विकासाच्या मार्गावर वेगाने वाटचाल करीत आहे. परंतु आजही कोट्यवधी भारतीयांची भूक भागत नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. भारताचे एक चित्र असेही आहे की गोडाऊनमध्ये करोडो टन धान्य सडत आहे. विश्व खाद्य दिवस साजरा करण्याचा उद्देश म्हणजे जगातील उपासमारी (भुकमरी) संपुष्टात आणणे. परंतु इतके वर्षांनंतर आजही जगातील करोडो लोकांना आम्ही दोन वेळचे जेवण देवु शकत नाही हे जगाचे दुर्भाग्यच. अन्न हे पुर्ण ब्रम्ह म्हटल्या जाते. अन्नाशिवाय कोणीही जगु शकत नाही. त्यामुळे अन्नाच्या नासाडीबाबत जागरूकता आवश्यक आहे. १६ आक्टोंबर संपूर्ण जग विश्व खाद्य दिवस म्हणुन साजरा करतात.कारण खाद्यानाची जोपासना करणे अत्यंत गरजेचे आहे. आज जगातील प्रत्येक व्यक्ती रोजगार मिळवीण्यासाठी का धावपळ करतो ?, मोल-मजुरकामगारांना काम मिळावे म्हणून का धावपळ करतो ? यामागे एकच उद्देश असतो वितभर पोटाची खळगी भरणे न्न करोना काळात जगातील अनेक देशांमध्ये मोठ्या प्रमाणात उपासमारीची समस्या ओढावली होती. या काळात करोडो लोकांचा रोजगार हिरावल्या गेला होता. भारतासह अनेक देशांमध्ये उपासमारीची समस्या दिसून आली होती. या उपासमारीच्या संकटात अनेकांना आपले प्राणसुध्दा गमवावे लागले. शेतकरी घाम गाळतो व शेती पिकवितो तेव्हाच देशासह जगातील लोकांच्या पोटाची खळगी भरते. १६ आक्टोंबर विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने संपूर्ण शेतकरी बांधवांना प्रणाम. परंतु गेल्या ७८ वर्षांपासून आजही भारतीय शेतकरी अत्यंत दु:खी असल्याचे दिसून येते. आजही शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला सरकारकडून योग्य भाव मिळत नाही. सरकारकडुन बाजार समिती किंवा मंडीमध्ये योग्य भावाची घोषणा केली जात नाही. त्यामुळे भारतीय शेतकरी नाराज असल्याचे दिसून येते. शेतकऱ्यांनी जनतेला अन्न-धान्याची कमतरता पडू दिली नाही.
चीनमध्ये १९७० मध्ये भुकमरीची महाभयानक लाट आली अशा परीस्थितीत चीनजवळ खायला अन्न-धान्य नव्हते. आज चीनचे चित्र पालटले आहे न्न आजही भारतात मेळघाट सारख्या व अतिदुर्गम भागात भुकमरी व कुपोषणाची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते असे का ? याचा अभ्यास राजकीय पुढाऱ्यांनी करण्याची गरज आहे.
आतातर वाढते प्रदुषण व ग्लोबल वॉर्मिगमुळे मोठ्या प्रमाणात हवामानात बदल झाल्याने शेतकऱ्यांना अत्यंत कठीण परिस्थितीतून जावे लागत आहे न्न आंतरराष्ट्रीय माहिती नुसार जगात उपाश्यापोटी झोपणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे सांगण्यात येते. संयुक्तराष्ट्र खाद्य आणि कृषिसंघटना नुसार २००२ च्या तुलनेत खाद्यान्नवस्तुच्या किंमतीत १४० टक्याने वाढ झाली आहे. भारतीय खाद्य निगमने स्वत: कबुल केले आहे की दरवर्षी गोदामातील ५० करोड रुपयांचे धान्य म्हणजे १०.४० लाख मॅट्रिक टन पर्यंत धान्य सडते किंवा खराब होते. हीबाब कृषी प्रधान देशाच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर, दु:खद व चिंताजनक आहे. खराब होणारे धान्य प्रत्येक वर्षी सव्वा करोड लोकांची भुक मिटवु शकते. भारतात सहा वर्षाखालील ४७ टक्के मुले कुपोषणाची शिकार होत आहेत. एफएओच्या माहिती नुसार भारतात २००८ मध्ये २० करोड १० लाख लोक भुकमरीचा सामना करीत होते.ग्लोबल हंगरच्या इंडेक्सने जारी केलेल्या २०२३ च्या आकडेवारीनुसार भारताचा विश्व भुकमरी सुचकांकमध्ये १२५ देशांच्या तुलनेत १११ वा नंबर लागतो ही बाब भारताच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे. लग्नसमारंभ, महाप्रसाद व अन्य जेवणाच्या कार्यक्रमात हजारो टन खाद्यान्न वाया जाते.
आजच्या परीस्थितीत अन्नाचा प्रत्येक कण वाचवण्याची गरज आहे. अन्नाचा प्रत्येक कण वाचवुन देशातील उपासमारी व कुपोषण यावर अंकुश लावला पाहिजे. विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने मी १४० कोटी जनतेला विनंती करतो की अन्नाचा एक-एक्कण वाचवीण्याची नीतांत गरज आहे. अन्न-धान्याचा काळाबाजार रोखला पाहिजे व जमाखोरांच्या प्रती कठोर पाऊल उचलुन त्यांच्या मुसक्या आवळल्या पाहिजे. प्रत्येक देशांनी तत्परता दाखवुन उपासमारी, कुपोषण, याला पुर्णविराम लावण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न केले पाहिजे यातच जगाचे कल्याण आहे.


**Change Of Name**

MY OLD NAME WAS **PRAVIN-KUMAR SAKARDE.** NOW MY NEW NAME IS **PRAVEEN BHIMRAO SAKARDE.**
**ADD :** PLOT NO: A-559, HAKUNTALA BHAVAN, NEAR SHAM-DHAM TEMPLE, NEW NANDANVAN, NAGPUR 440009

MY OLD NAME WAS **RAKESH INDERJEET AGGARWAL.** NOW MY NEW NAME IS **RAKESHKUMAR INDERJEET AGRAWAL.**
**ADD :** PLOT:71, FLAT: F-1, VITTHAL KUNJ APARTMENT, KHADGAON ROAD, WADI, NAGPUR - 440023

MY OLD NAME WAS **MOHAMMAD ALI.** NOW MY NEW NAME IS **MOHD ALI.**
**ADD :** PLOT NO. 736/D NELSON SQUARE CHHAONI NAGPUR - 440013

MY PREVIOUS NAME AS IN SERVICE BOOK **SANJAY KUMAR VIKEY (UIKEY)** WHICH IS NOW CHANGE TO OFFICIAL RECORD IN SER-VICE BOOK **SANJAYKUMAR ANANDRAO UIKEY.**
**ADD:** PLOT NO 26 BEL-TORODI ROAD NEAR AATA CHAKI DULABAI KACHORE LAYOUT MANISH NAGAR NAGPUR-440015

MY OLD NAME WAS **FARIN NAAZ SHEIKH.** NOW MY NEW NAME IS **FARIN NAAZ MOHAMMAD SADIK SHEIKH.**
**ADD :** P. NO. 143 AMNA TOWN TAMIR HOUSING SOCIETY BHILGAON NEAR TAJ NIIYAJI MASJID NAGPUR - 440026

MY OLD NAME WAS **MOHAMMAD SAIDK SHEIKH.** NOW MY NEW NAME IS **MOHAMMAD SADIK SHEIKH.**
**ADD :** P. NO. 143 AMNA TOWN TAMIR HOUSING SOCIETY BHILGAON NEAR TAJ NIIYAJI MASJID NAGPUR - 440026

MY OLD NAME WAS **MOHD AAYAN MOHD ASHRAF HADA.** NOW MY NEW NAME IS **AAYAN ASHRAF HADA.**
**ADD :** PLOT NO 1 OLD KAMTHI ROAD NEAR DADIMA MASJID MEMON COLONY NAGPUR 440026

MY OLD NAME WAS **MOHD ASHRAF HADA.** NOW MY NEW NAME IS **ASHRAF HADA.**
**ADD :** PLOT NO 1 OLD KAMTHI ROAD NEAR DADIMA MASJID MEMON COLONY NAGPUR 440026

MY OLD PASSPORT NO. **F9395984.** MY OLD NAME WAS **VANDNA SHIVRAJ MESHRAM.** NOW MY NEW NAME IS **VANDANA SHIVRAJ MESHRAM.**
**ADD :** PLOT NO.480, SAMRTHA NAGAR NARI ROAD NAGPUR - 440017

MY OLD NAME WAS **SWETABAI JAWAHARLAL CHAURASIYA.** NOW MY NEW NAME IS **SWETA PRAVINKUMAR CHOURASIA .**
**ADD :** NEAR 888 BIDI COMPANY, RAIL TOLI, GONDIA-441614

I **PRAVINKUMAR GYANKUMAR CHOURASIA** HEREBY DECLARE THAT IN MY DAUGHTER MARKSHEET MY NAME WAS MENTIONED AS **PRAVIN CHOURASIA** BUT I WANT MY NAME AS **PRAVINKUMAR GYANKUMAR CHOURASIA** IN HER PASSPORT.
**ADD:** NEAR 888 BIDI COMPANY, RAIL TOLI, GONDIA-441614

MY OLD PASSPORT NO. **U3326545.** MY OLD NAME WAS **SANJIWANI WASEKAR.** NOW MY NEW NAME IS **SANJIWANI SHALIKRAO WASEKAR.**
**ADD :** AT. POST. KORA TA. SAMUDRAPUR WARDHA - 442305

MY OLD NAME WAS **JABEEN BEGUM ABDUL MOIZ.** NOW MY NEW NAME IS **MAHAJABIN RIYAZ AHEMAD.**
**ADD :** PALTAN HINGOLI 431513

MY OLD NAME WAS **KAILASH NARENDRA VIDHATE.** NOW MY NEW NAME IS **KAILAS NARENDRA VIDHATE.** D.O.B-**31/10/1985**
**ADD :** PLOT NO 05,UJJWAL CREDIT SOCIETY, NEW NARSALA ROAD, NEAR KRISHNAM NAGARI NAGPUR-440034

MY OLD NAME WAS **SAURABH SURESH SONKUSRE.** NOW MY NEW NAME IS **SAURABH SURESH SONKUSARE**
**ADD :** PLOT NO.342 GALLI NO.24 YADAV NAGAR BINAKI LAYOUT NAGPUR 440026

MY PASSPORT NO. **K1737291** IS MY INCORRECT NAME WAS **TABASSUM SHAIKH.** NOW NEW CORRECT NAME IS **QADRI TABASSUM SULTANA SYED IBRAHEEM.**
**ADD:** AZAD NAGAR, JALKOT ROAD, UDGIR, DISTT. LATUR 413517 MS

I **QADRI TABASSUM SULTANA SYED IBRAHEEM** DECLARED THAT MY HUSBAND PASSPORT NO. **K1737290** IS MY INCORRECT NAME WAS **SHAIKH TABASSUM.** NOW NEW CORRECT NAME IS **QADRI TABASSUM SULTANA SYED IBRAHEEM.**
**ADD:** AZAD NAGAR, JALKOT ROAD, UDGIR, DISTT. LATUR 413517 MS

MY PASSPORT NO. **K1737290** IS MY INCORRECT NAME WAS **MOHD MUNTAJEEBODDIN SHAIKH.** NOW NEW CORRECT NAME IS **SHAIKH MD MUNTAJIBODDIN MD MOHIUDDIN.**
**ADD:** AZAD NAGAR, JALKOT ROAD, UDGIR, DISTT. LATUR 413517 MS

I **SHAIKH MD MUNTAJIBODDIN MD MOHIUDDIN** DECLARED THAT MY WIFE PASSPORT NO. **K1737291** IS MY INCORRECT NAME WAS **SHAIKH MOHD MUNTAJEEBODDIN.** NOW NEW CORRECT NAME IS **SHAIKH MD MUNTAJIBODDIN MD MOHIUDDIN.**
**ADD:** AZAD NAGAR,JALKOT ROAD, UDGIR, DISTT. LATUR 413517 MS


RNINo-20789/71 महासागर नागपूर
मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस,कॉटन मार्केट,नागपूर१८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय,टेकडी रोड,सिताबर्डी,नागपूर येथे प्रकाशित केले. संपादकश्रीकृष्ण तनसुखदास चांडक
मुख्य कार्यालय फोन७४४७७३५८५१/९९२२९७००२३/७४४७७३५८५३

# सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेत विराटची भूमिका करणारा रजत वर्मा म्हणतो, माझी व्यक्तिरेखा मोहक आणि सहृदय आहे पण त्यासोबत एक रहस्यमय भूतकाळ आहे

**मुंबई, १५ ऑक्टोबर :** सोनी सबवरील इत्ती सी खुशी मालिकेतील अन्विता (सुंबुल तौकीर खान)च्या हृदयस्पर्शी कथानकाने प्रेक्षकांना खिळवून ठेवले आहे. अन्विता एक तरुणी आहे, जी आपल्या विस्कळीत झालेल्या कुटुंबाला सावरण्याचा, आपल्या धाकट्या भावंडांचा सांभाळ करण्याचा प्रयत्न करत आहे. या कथानकात एक महत्त्वाचे पात्र आहे विराटचे, जे साकारले आहे रजत वर्माने. विराट एक मोहक आणि आकर्षक तरुण आहे. अन्विताचा प्रियकर या नात्याने तो अन्विताच्या जीवनात आपुलकी, आशा आणि उत्कटता घेऊन येतो. प्रेम आणि अपराधी भावना यांचे मिश्रण असलेले विराटचे व्यक्तिमत्व या मालिकेच्या भावनिक गाभ्याला आणखी एक स्तर देते आणि त्याला या मालिकेतील एक आकर्षक आणि महत्त्वाचे पात्र बनवते.

आपल्या व्यक्तिरेखेविषयी आणि या प्रवासाविषयी बोलताना रजत वर्माने विराट साकारण्याचा अनुभव, विराटच्या व्यक्तिरेखेतील बारकावे, सह-कलाकारांशी असलेली त्याची केमिस्ट्री, आणि प्रेक्षककडून मिळत असलेला प्रतिसाद याविषयी सांगितले.

१. इत्ती सी खुशी मधील विराट आणि तुझ्यात काय साम्य आहे? आणि ही व्यक्तिरेखा साकारण्यातील सर्वात मोठे आव्हान आणि समाधानकारक बाब कोणती?

विराट अशी व्यक्तिरेखा आहे, जी अन्विताच्या जीवनात स्नेह आणि आशा घेऊन आली आहे. तो मोहक आणि सहृदय आहे, पण त्याचा एक गूढ भूतकाळ आहे. त्याच्या बहुस्तरीय भावना उलगडताना खूप समाधान वाटते आणि त्याच्यातील सहज आत्मविश्वास आणि स्वभावातील भावनिक सखोलता दाखवणे आव्हानात्मक वाटते, कारण, मी स्वतः खूप अंतर्मुख आहे. विराटचा प्रवास दाखवताना माझ्या कम्फर्ट झोनच्या बाहेर पडून नवीन शिकण्याचा अनुभव खूप छान आहे.

२. विराट एका भावनिक टप्प्यातून जात आहे- वीर म्हणून आपली ओळख उघड करण्यापासून ते अन्विताच्या कुटुंबाला मदत करण्यापर्यंत. त्याच्या प्रवासाविषयी तू काय सांगशील?

विराटचा प्रवास म्हणजे प्रेमाने प्रेरित बदलाचा प्रवास आहे. तो अन्विताच्या जीवनात आशेचा किरण बनून येतो, तिला आधार देतो, तिच्या संघर्षापासून सुटकेची भावना देतो. जेव्हा त्याची खरी ओळख उघड होते, तेव्हा त्याला त्याच्या भूतकाळाचे परिणाम भोगणे भाग आहे. त्याच्यापाठोपाठ आलेली भावनिक आव्हाने देखील त्याला पेलावीच लागणार. अन्विताच्या कुटुंबाला तो दृढतेने मदत करतो, त्यामधून त्याची सखोलता दिसते, कठीण प्रसंगांमध्ये देखील जबाबदारी स्वीकारण्याची आणि त्यांच्या पाठीशी उभे राहण्याची तयारी दिसते.

३. पडद्यावर ती केमिस्ट्री जिवंत करण्यासाठी तू आणि सुंबुल काय प्रयत्न करता?

सुंबुल एक अद्भुत कलाकार आहे. आमच्यात एक सहज सख्य आहे, जे पडद्यावर दिसतं. आम्ही आधी दृश्यांविषयी चर्चा करतो, आमच्या व्यक्तिरेखांचे दृष्टिकोन आणि त्यांच्या भावना समजून घेतो. दृश्याला आवश्यक ते परिमाण देताना एकमेकांवर विश्वास ठेवतो, मग ते दृश्य तणावाचे असो, आपुलकीचे असो किंवा दोन्हीचे मिश्रण करणारे असो. आमचे नाते अस्सल आणि प्रभावी दाखवण्यामागे आम्हा दोघांचे एकत्रित प्रयत्न आहेत.

४. कोणत्या बाल कलाकाराशी तुझी गट्टी सगळ्यात छान जमली आहे? आणि शूटिंगदरम्यान पडद्यामागच्या काही गंमती-जमती आहेत का?

सेटवरील सर्व बालकलाकारांशी माझी छान गट्टी आहे. ही मुले प्रत्येक दृश्यात अद्भुत ऊर्जा, आनंद आणि अस्सलता घेऊन येतात. सेटवर नेहमी प्रसन्न आणि ऊर्जावान वाटते. त्यांच्या उत्साहामुळे आम्ही एकत्र चित्रित केलेले दृश्य उंचावते. त्यांची निष्ठा आणि कौशल्य पाहून तर मी चकित होतो. इतक्या लहान वयातही ज्या प्रगल्भतेने आणि कौशल्याने ते परफॉर्म करतात ते पाहून मी थक्क होतो. त्यांना काम करताना बघताना कधीकधी आपल्याला त्यांच्या वयाचा विसर पडतो. त्यांचा फोकस, टायमिंग आणि नैसर्गिक प्रतिभा खरोखर प्रेरणादायक आहे. त्यांच्या उपस्थितीमुळे मालिकेत एक ताजेपणा तर येतोच शिवाय इतरांना देखील ते उत्तम परफॉर्म करण्याची प्रेरणा देतात.

५. अपराधी भावना, प्रेम, गुपितं आणि जबाबदारी या भावना दर्शविणारा विराट साकारण्यासाठी तू काय तयारी केलीस?

विराटच्या गुंतागुंतीच्या भावना साकारण्यासाठी त्याला खोलात शिरून समजून घेणे आवश्यक होते. मी त्याच्या कृतींमागच्या प्रेरणा, त्याच्यावरील गुपितांचे ओझे, आणि त्यामुळे अन्विता आणि इतर व्यक्तिरेखांशी असलेल्या त्याच्या नात्यात पडणारा फरक समजून घेण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी मी पटकथा बारकाईने वाचली, दिग्दर्शकाशी त्याविषयी बोललो आणि स्वतः देखील त्याच्या प्रवासाचा सखोल विचार केला. निरीक्षण, विचार आणि भावना या तिन्हीच्या मिश्रणामुळे मला विराटची व्यक्तिरेखा जिवंत करण्यात मदत मिळाली.

६. दिवेकर कुटुंबाला विराट ज्या मूकपणे मदत करतो, ते चाहत्यांना आवडते. तुला कशा प्रकारचे सोशल मीडिया प्रतिसाद मिळत आहेत?

चाहत्यांनी विराटची व्यक्तिरेखा डोक्यावर उचलून धरली आहे. खास करून अन्विता आणि तिच्या कुटुंबाला तो ज्या शांतपणे मदत करतो, ते प्रेक्षकांना आवडले आहे. सोशल मीडियावर मला खूप सकारात्मक प्रतिक्रिया मिळतात. अन्विताला मदत करण्यासाठी तो जे विशेष प्रयत्न घेतो, त्याचा इतरांचा विचार करणारा स्वभाव आणि



त्याच्यातील मोहकता याची प्रशंसा प्रेक्षक करतात. लोकांनी विराटचा प्रवास ज्या आपलेपणाने स्वीकारला आहे आणि या कथानकातील त्याचे महत्त्व जाणले आहे, ते मनाला आनंद देते.

# जागतिक आयोडीन कमतरता दिनाच्या पूर्वसंध्येला आयोडीनबाबत जनजागृतीचे नेतृत्व टाटा सॉल्टकडे

**मुंबई, १५ ऑक्टोबर:** यंदाच्या जागतिक आयोडीन कमतरता दिनाच्या निमित्ताने, भारतातील आयोडीनयुक्त मिठाचा अग्रदूत आणि बाजारातील आघाडीचा ब्रँड टाटा सॉल्टने देशभरातील मुलांमधील आयोडीनच्या कमतरतेमुळे उद्भवणाऱ्या आजारांविरुद्ध (आयडीडी) लढा देण्याची आपली कटिबद्धता पुन्हा एकदा व्यक्त केली आहे. देशातील पहिले राष्ट्रीय पातळीवरचे आयोडीनयुक्त मीठ म्हणून, टाटा सॉल्ट हा ब्रँड लोकांमध्ये आयोडीन या सूक्ष्म पण अत्यावश्यक पोषक घटकाबद्दल जागरूकता निर्माण करण्याचे कार्य सातत्याने करीत आहे. विशेषतः बाल्यावस्थेतील बौद्धिक विकासासाठी आयोडीन हा अत्यंत महत्त्वाचा घटक असल्याने टाटा सॉल्टचे कार्य महत्त्वपूर्ण आहे.

आयोडीनयुक्त मीठ हे फक्त सरकारने अनिवार्य केलेला पूरक आहार नसून, तो आपल्या स्वयंपाकघरातील एक साधा घटक आहे. मीठ आपल्या अन्नाला केवळ चव देत नाही, तर आपल्या आरोग्याचेही अनेक प्रकारे संरक्षण करते. मीठ हे सर्वत्र वापरले जाणारे उत्पादन असल्यामुळे, त्याद्वारे आयोडीनचा पुरवठा करणे ही सर्वात प्रभावी पद्धत ठरली आहे. युनिव्हर्सल सॉल्ट आयोडायझेशन या कार्यक्रमाद्वारे जगभर आयोडीन अभावजन्य आजार (आयडीडी) रोखण्यासाठी यशस्वी प्रयत्न झाले आहेत. गेल्या अनेक दशकांपासून मीठ हे सार्वजनिक आरोग्य मोहिमेचे प्रमुख साधन राहिले आहे. त्यामुळे आयोडीनच्या कमतरतेमुळे होणारे गंभीर परिणाम मोठ्या प्रमाणावर कमी झाले आहेत.

भारतानेही या क्षेत्रात मोठी प्रगती साधली आहे. २०१८१९ मध्ये घेण्यात आलेल्या इंडिया आयोडीन सर्व्हेनुसार, देशातील सुमारे ७६.३ टक्के घरांमध्ये किमान १५ पार्ट्स पर मिलियन (पीपीएम) आयोडीन असलेले पुरेसे आयोडीनयुक्त मीठ वापरले जाते. मात्र, या सर्वेक्षणात हेही आढळले की फक्त २२.४ टक्के लोकांना आयोडीनयुक्त मीठाचे फायदे अचूकपणे माहीत आहेत, तर ६१.४ टक्के लोकांना इतकेच ठाऊक आहे की योग्य प्रमाणातील आयोडीन सेवनामुळे गॉईटर हा आजार टाळता येतो.

टाटा सॉल्टचा नमक हो टाटा का टाटा नमक हा ऑडिओ-आधारित प्रचार आता भारताच्या हृदयात अधिक खोलवर पोहोचतो आहे. डिजिटल आणि टेलिव्हिजन माध्यमांमधील यशस्वी उपस्थितीनंतर, या ब्रँडने आता ग्रामीण आणि निमशहरी भारतात आपला विस्तार सुरू केला आहे. प्रमुख वाहतूक केंद्रांवर वारंवार ऑडिओ संदेश प्रसारित करून हा उपक्रम राबवला जात आहे. संस्कृतीशी असलेली जवळीक आणि राष्ट्रीय उद्दिष्टांची भावना या जाहिरात मोहिमेच्या केंद्रस्थानी आहे. या जाहिरात मोहिमेद्वारे मुलांच्या बौद्धिक विकासात पुरेशा आयोडीनच्या सेवनाची भूमिका किती महत्त्वाची आहे, आणि त्याचा परिणाम देशाच्या दीर्घकालीन प्रगतीवर कसा होतो, हे अधोरेखित केले जात आहे.

जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी, या मोहिमेतील आकर्षक जिंगल गाझियाबाद, नागपूर, दिल्ली जंक्शन यांसारख्या रेल्वे स्थानकांवर, बसस्थानकांवर, तसेच फिरत्या व्हॅनद्वारे सतत प्रसारित केली जात आहे. आता हा प्रचार पुढे मुजफ्फरपूर, पाटणा जंक्शन, हाजीपूर, आग्रा, प्रयागराज, वाराणसी, लखनौ चारबाग, इंदौर, भोपाळ, इटारसी, कटनी, सतना, नाशिक रोड, सोलापूर, खडगपूर, सानत्रागाछी, मेचेदा अशा अनेक महत्त्वाच्या ठिकाणी केला जात आहे. ग्रामीण भागात व्यापक प्रमाणात पोहोचण्यासाठी, टाटा सॉल्टने महाराष्ट्र आणि राजस्थानातील प्रमुख बसस्थानकांवरदेखील ऑडिओ स्वरूपात जाहिरात मोहिमा सुरू केल्या आहेत. पारंपरिक माध्यमांना जिथे पोहोचण्यात अडचण येते, तिथेही दररोज प्रवास करणाऱ्या सामान्य नागरिकांपर्यंत ब्रँडचा हा संदेश थेट पोहोचत आहे.

टाटा सॉल्ट देशभरातील लोकांच्या आरोग्यवर्धनासाठी कटिबद्ध आहे. विशेषतः आयोडीनच्या कमतरतेवर मात करून आणि आयोडीनयुक्त मीठ प्रत्येक घरापर्यंत पोहोचवून भारत अधिक निरोगी करण्यासाठी हा ब्रँड सातत्याने प्रयत्नशील आहे.

# स्थिर उत्पन्नाची उभारणी: अमरावती येथे दुग्धव्यवसायामुळे शेतीमध्ये परिवर्तन

**अमरावती, १५ ऑक्टोबर :** शेतकऱ्यांच्या मालकीचे एक कृषी स्टार्ट-अप दुग्धव्यवसायाकडे ग्रामीण कुटुंबासाठी एक स्थिर, वर्षभर उत्पन्नाचे साधन म्हणून बघत आहे. अमरावती अन्नक्षेत्र प्रायव्हेट लिमिटेड (एएपीएल) हा पाच कृषी उत्पादक कंपन्यांचा (एफपीसी) आणि द्वारा ई-रजिस्ट्री (डीईआर) यांचा एक संयुक्त उपक्रम आहे. हा उपक्रम बाजारपेठेच्या मर्यादित ॲक्सेस, महाग आणि सहज न मिळणारे कर्ज, प्रमुख पुरवठ्याचे सातत्य नसणे आणि व्यावहारिक प्रशिक्षणाचा अभाव अशा ज्या दैनंदिन अडथळ्यांमुळे छोटे शेतकरी मागे राहतात त्या अडचणींवर उपाययोजना करतो.

या संरचनेअंतर्गत, या पाच एफपीसी कडे एएपीएल च्या ७४% भागाची मालकी आहे, म्हणजे त्यात शेतकऱ्यांचे बहुमत आहे. या एफपीसी या संघटनेच्या शेतकऱ्यांच्या बेसचा विस्तार वाढवण्याचे नेतृत्व करतात. तर, डीईआर कडे २६% वाटा आहे आणि व्यावसायिक व्यवस्थापन, आर्थिक संपर्क, डिजिटल नैपुण्य पुरविण्याचे काम डीईआर करते. ग्रामीण स्तरावर दुधाची तपासणी आणि शीतकरण, स्पष्ट मूल्य निर्धारण आणि वेळेवर पेमेंट आणि कर्ज सुविधेसाठी दुधाच्या विक्रीच्या डिजिटल रेकॉर्डसह एएपीएल ने एकेकाळी जेमतेम चालणाऱ्या या क्रियाकलापाला एका विश्वसनीय, सर्व मोसमांत चालणाऱ्या उद्योगात परिवर्तित केले आहे- असा उद्योग जो शेतकऱ्यांद्वारा शेतकऱ्यांसाठी चालवण्यात येतो.

या प्रकल्पाचा शेतकऱ्यांवर थेट आणि सकारात्मक प्रभाव पडला आहे. सुरेश गंजरे या एका शेतकऱ्याने नमूद केले की, स्थानिक संकलन केंद्रे असल्यामुळे त्याचा वेळ वाचतो आणि त्या वेळेचा उपयोग तो शेतकामासाठी करू शकतो. पारदर्शक दूध तपासणीचे लाभ देखील त्याने अधोरेखित केले आहेत. उचित मूल्य निर्धारण हा त्याचा मोठा फायदा आहे. अनिकेत नंदकिशोर गोमाशे नामक अन्य शेतकऱ्याने सांगितले की, या प्रकल्पामुळे त्याला विश्वासार्ह उत्पन्न आणि समर्थन मिळाले. यामुळे आपल्या गाई-म्हशींची संख्या वाढवण्याचे प्रोत्साहन त्याला मिळाले. या उपक्रमाने महिलांचा सहभाग देखील वाढवला आहे. आता मोठ्या संख्येने महिला आपल्या कुटुंबाच्या दुग्धव्यवसायात निर्णय घेण्याची भूमिका बजावत आहेत.

# नुकसानापासून निर्मितीपर्यंत: सोनी सबवरील 'गणेश कार्तिकेय' मालिकेत देवी पार्वतीच्या प्रेमाने गणेशाला कसे जिवंत केले

**मुंबई, १५ ऑक्टोबर :** सोनी सबवरील अलीकडेच सुरू झालेल्या गाथा शिव परिवार की गणेश कार्तिकेय मालिकेत भगवान शिव (मोहित मलिक), देवी पार्वती (श्रेनु परीख) आणि त्यांची मुलं गणेश (एकांश कथुरिया) आणि कार्तिकेय (सुभान खान) यांची दिव्य आणि भावनिक कथा सांगितली आहे. ही भव्य कथा केवळ पुराणकथा नाही. शिव परिवारातील अज्ञात अध्याय, त्यांच्यातील नाती, संघर्ष आणि ते सर्व जण एकत्र येण्यामागचा दिव्य संकेत याचे चित्रण मालिकेत बघायला मिळेल. अलीकडच्या भागांमध्ये, आपला मुलगा कार्तिकेय याची आपल्याशी पुन्हा दिलजमाई करवून देण्यासाठी पार्वती दंडपाणीची निर्मिती करते, ज्याचा अखेरीस कार्तिकेयाशी सामना होतो. पण, कार्तिकेय दंडपाणीला स्वतःचा भाऊ मानण्यास नकार देतो. दंडपाणीच्या निर्मितीमागील दैवी संकेताबाबत कार्तिकेय अनभिज्ञ आहे.

कथा पुढे उलगडत आहे आणि आता भगवान गणेशाच्या जन्माची वेळ आली आहे. भगवान शिव कोण आहे, हे न जाणणारा दंडपाणी त्याच्या रूपावरून शंकराची थट्टा करतो. हा कैलासपती असेल असे त्याच्या मनातच येत नाही. त्याच्याकडून झालेला अपमान सहन न होऊन शंकर संतापाच्या भरात दंडपाणीचा शिरच्छेद करतात. हे समजल्यानंतर, पार्वती उद्ध्वस्त होते



तिची निर्मिती, प्रेमातून आणि आशेतून केलेली निर्मिती नष्ट होते. दुःखाच्या भरात ती मागणी करते की तिचा मुलगा परत जिवंत व्हावा. तिची इच्छा पूर्ण करण्यासाठी, शंकर मार्गात दिसलेल्या पहिल्या प्राण्याचे (हत्ती) मस्तक दंडपाणीच्या धडावर ठेवून त्याला पुन्हा जिवंत करतात. या दिव्य कृतीमधून गणेशाचा जन्म होतो. गणेश हा बुद्धिमत्ता, मांगल्य आणि शुभारंभाचे प्रतीक आहे. शंकर आणि पार्वती यांच्या लाडक्या मुलाच्या आगमनामुळे समस्त कैलास आनंदित होतो.

या भावपूर्ण दृश्याच्या शूटिंगचा अनुभव सांगताना श्रेनु परीख म्हणते, या व्यक्तिरेखेसोबत एक शांत पण जबरदस्त ताकद येते. तिच्यात अत्यंत विशुद्ध रूपात प्रेम, सर्जन आणि मातृत्व आहे. पार्वतीला जेव्हा समजते की शंकराने दंडपाणीचा शिरच्छेद केला आहे, तेव्हाचे दृश्य अत्यंत भावनिक होते आणि माझ्यासाठी ते करायला कठीणही होते. आम्ही बऱ्याच वेळा तालिम केली कारण, या दृश्यात फक्त दुःख दाखवायचे नव्हते, तर वेदना आणि ताकद यांच्यातील दिव्य संतुलन देखील व्यक्त होणे गरजेचे होते. मला या मालिकेची हीच गोष्ट विशेष आवडते की ही मालिका फक्त पुराणकथा सांगत नाही, तर दिव्यत्वामधील मानवीयता दाखवते. देवांना तुम्ही एका कुटुंबाच्या रूपात पाहू शकता, त्यांच्या भावना, संघर्ष आणि प्रेम अनुभवू शकता. यामुळेच ही मालिका खास आहे.




## आता मला बाईक चालवणे खूप आवडते आणि मी कदाचित लवकरच माझी स्वतःची बाईक घेईन

**मुंबई, १५ ऑक्टोबर :** झी टीव्हीवर नुकत्याच सुरू झालेल्या गंगा माई की बेटियाँ या मालिकेत स्नेहा ही भूमिका साकारणाऱ्या अमनदीप सिधूसाठी बाईक चालवायला शिकणे हे फक्त एक नवीन कौशल्य शिकणे नव्हते तर ते तिच्यासाठी स्वतःच्या मर्यादांच्या पलीकडे जाण्याचे आणि प्रक्रियेवर विश्वास ठेवण्याचे एक प्रतीकही बनले. बाईक चालवणे अमनदीपसाठी पूर्णपणे नवीन नव्हते. तेरी मेरी इक जिंदड़ी या मालिकेत माहीच्या भूमिकेत असताना तिने अमृतसरच्या सकाळच्या ट्रॅफिकमध्ये एक जड बाईक चालवली होती पण ते फक्त काही दृश्यांपुरतेच मर्यादित होते. या वेळेस आव्हान खूप मोठे होते. दिग्दर्शकाने तिला स्टंट डबलवर अवलंबून न राहता स्वतः बाईक चालवण्यास प्रोत्साहित केले आणि अमनदीपनेही कोणतीही भीती न बाळगता हे आव्हान स्वीकारले.

अमनदीप सिधू म्हणाली, काही वर्षांपूर्वी तेरी मेरी इक जिंदडी मध्ये माही म्हणूनही बाईक चालवली होती आणि आता गंगा माई की बेटियाँ मध्ये स्नेहा म्हणून, हे दोन्ही अनुभव अगदी वेगळे आणि आपल्या आपल्या पद्धतीने अविस्मरणीय आहेत. सुरुवातीला बाईकवर बसणे, गिअर समजून घेणे आणि समतोल राखणे हे सगळेच थोडे अवघड आणि अनिश्चित वाटत होते. पण शेवटी मी देवावर विश्वास ठेवला आणि धाडसाने पुढे गेले. मी कितीही वेळा सांगितले तरी कमीच आहे, आता मला बाईक चालवणे खूप आवडते! लवकरच मी स्वतःची एक बाईकही घेणार आहे!

अमनदीपने स्नेहा या भूमिकेत स्वतःला अगदी सहजपणे उतरवले आहे. ती एक अशी तरुण मुलगी आहे जी समाजाच्या ठराविक चौकटी मोडून स्वतःचा मार्ग तयार करण्याचे धाडस करते. पण आता प्रश्न असा आहे की काय ती आपला हा स्वातंत्र्याचा आत्मा टिकवू शकेल का? की आयुष्यातील परिस्थिती तिला समाजाच्या कठोर अपेक्षांसमोर झुकायला भाग पाडेल?

## सानंद वर्मा यांनी यशाचे श्रेय सोशल मीडियापेक्षा कला व सकारात्मकतेला दिले!



**मुंबई, १५ ऑक्टोबर :** आजच्या धावपळीच्या युगामध्ये अनेक व्यक्ती सतत त्याच्या फोनमध्ये व्यस्त असतात, लाइक्स, फॉलोअर्स आणि क्षणभुंगर क्षणांचा पाठलाग यांमध्ये गुंतून जातात. पण सानंद वर्मा त्यांच्यापेक्षा वेगळे आहेत. ते एण्ड टीव्हीवरील मालिका 'भाबीजी घर पर है'मध्ये विलक्षण भूमिकेसाठी लोकप्रिय आहेत. विविध चित्रपटांमधील प्रभावी अभिनयासाठी त्यांचे कौतुक करण्यात आले आहे, ज्यासह त्यांना त्यांचा स्वतःचा मार्ग मिळाला आहे, ज्यामध्ये साधेपणा, सर्जनशीलता आणि मनःशांती सामावलेली आहे. त्यांचा प्रवास आठवण करून देतो की, खरे यश डिजिटल युगामध्ये नाही तर अर्थपूर्ण काम आणि वैयक्तिक विकासामध्ये सामावलेले आहे. सानंद वर्मा ऊर्फ अनोखेलाल सक्सेना म्हणाले, ''माझा दृष्टिकोन अत्यंत वेगळा आहे. मी सोशल मीडियावर स्क्रॉलिंग करण्यामध्ये वेळ व्यतित करत नाही. मला इतर व्यक्तींचे व्हिडिओ पाहण्यामध्ये कोणतीच रूची नाही. मी फक्त मला आवडणाऱ्या गोष्टी करतो, ते म्हणजे गायन, अभिनय आणि माझे स्वतःचे व्हिडिओ बनवणे. माझ्यासाठी कला फक्त व्यवसाय नाही तर जीवनाचा मार्ग आहे, कोणत्याही व्यत्ययाशिवाय स्वतःशी व इतरांशी जुडले जाण्याचा मार्ग आहे. मी नेहमी सहज व सर्जनशील राहण्याला प्राधान्य देतो. शक्यतो सकारात्मक काम करा. आरोग्य, योगा, चिंतन, व्यायाम, खेळावर लक्ष केंद्रित करा. पुस्तके वाचा, तुमच्या कलेचा सराव करा, तुमची आवड जोपासा, सोशल मीडिया व बातम्यांवर कमी वेळ व्यतित करा. दिवसातून १५ ते २० मिनिटे पुरेशी आहेत. त्यानंतर तुमचे काम व विकासावर लक्ष केंद्रित करा.''

# हा शो आयुष्याचे सार दाखवतो आणि समाजातील परंपरा व संस्कृती यांचा सुंदर संगम घडवतो : शुभांगी लाटकर

**मुंबई, १५ ऑक्टोबर :** झी टीव्हीवरील नवीन मालिका 'गंगा माई की बेटियाँ' ने प्रेक्षकांच्या मनात घर केले आहे. या कथेत गंगामाई नावाच्या स्त्रीची गोष्ट दाखवली आहे, जिचा नवरा तिला मुलगा न झाल्यामुळे सोडून जातो, पण ती हार न मानता स्वतःचा सन्मान टिकवते आणि आपल्या तीन मुली सहाना (सृष्टी जैन), स्नेहा (अमनदीप सिद्धू) आणि सोनी (वैष्णवी प्रजापती) यांना वाराणसीच्या घाटांच्या पार्श्वभूमीवर वाढवते. या शांत पण ताकदवान आईची भूमिका अनुभवी अभिनेत्री शुभांगी लाटकर साकारत आहेत. तब्बल सहा वर्षांनंतर त्या झी टीव्हीवर परतल्या आहेत.

प्र. 'गंगा माई की बेटियाँ' ही मालिका जिद्द, आत्मसन्मान आणि कुटुंब या विषयांवर प्रकाश टाकते. हे व्यापक विषय तुमच्याशी वैयक्तिक पातळीवर कसे जोडलेले आहेत?

उ. गंगा माई की बेटियाँ' ही केवळ एक कथा सांगणारी मालिका नाही, तर माझ्या मते ती आपल्या आयुष्याचेच प्रतिबिंब आहे. जिद्द, सन्मान आणि कौटुंबिक नाती या फक्त कल्पना नाहीत. हे आपण रोज आपल्या आजूबाजूला पाहतो. आपल्या जवळच्या



लोकांशी असलेले आपले प्रेम आणि नाते आपल्याला स्वप्ने पाहायला, लढायला आणि कधीही हार न मानायला बळ देतात.

प्र. तुम्ही सहा वर्षांनंतर झी टीव्हीवर परतत आहात. तुम्हांला गंगा माई ही भूमिका करण्याकडे कशा आकर्षित झालात आणि तिची ताकद व भावनिक खोली साकारण्यासाठी तुम्ही कशी तयारी केली ?

उ. सहा वर्षांनंतर झी टीव्हीवर परत येणे म्हणजे खरंच घरी परतल्यासारखे वाटत आहे आणि या पुनरागमनासाठी गंगा माईसारखी भूमिका मिळणे माझ्यासाठी खूप खास आहे. मला या भूमिकेने सर्वात जास्त आकर्षित केले ते म्हणजे तिच्या शांत ताकदीमुळे. ती एक अशी स्त्री आहे जिने औपचारिक शिक्षण घेतलेले नाही, तिच्या आयुष्यात तिला कुणाचाही आधार नाहीये, तरीही ती उद्विग्न मनाने आणि समाजाच्या कलंकावर मात करत स्वतःच्या कुटुंबाला सन्मानाने एकत्र ठेवते. एक कलाकार म्हणून अशा भूमिका म्हणजे एक देणगी असते कारण ती तुम्हांला भावनिक नाजूकपणा आणि जिद्द या दोन्ही गोष्टींचा शोध घेण्याची संधी देते. या भूमिकेची तयारी करताना मी अशा महिलांना जवळून पाहिले ज्या लहान खानावळी चालवतात किंवा घरगुती स्वयंपाकघरातून उपजीविका करतात. त्यांची देहबोली, काम करण्याची पद्धत आणि कुटुंबासाठी असलेली त्यांची जबाबदारी यांचे निरीक्षण केले. त्याचबरोबर मी अशा स्त्रियांच्या खऱ्या कथा ऐकल्या ज्यांना सोडून दिले गेले, पण निराश न होता त्यांनी धैर्याची वाट निवडली. माझ्यासाठी गंगा माईला साकारण्याचे सार हे होते की तिच्या वेदनेला तिच्या सौम्यतेशी संतुलित ठेवावे, जेणेकरून प्रेक्षकांना तिचा संघर्षच नव्हे, तर तिच्या आतील अपार ताकदही जाणवेल.

# अशा कथा आजच्या भारतीय टीव्हीसाठी खूप महत्त्वाच्या आहेत : अमनदीप सिधू

**मुंबई, १५ ऑक्टोबर :** झी टीव्हीवरील कौटुंबिक नाट्य 'गंगा माई की बेटियाँ' स्त्रियांच्या जिद्दीला वाराणसीच्या प्रभावी घाटांच्या पार्श्वभूमीवर दाखवल्याबद्दल कौतुक मिळवत आहे. या कथानकाच्या केंद्रस्थानी आहे स्नेहा गंगा माईची (शुभांगी लाटकर) धाडसी, हुशार आणि स्वातंत्र्यप्रिय मधली मुलगी, जिची भूमिका अमनदीप सिधू साकारत आहे. या मुलाखतीत अमनदीप सिधू, स्नेहाच्या गुंतागुंतीच्या व्यक्तिमत्त्वाला साकारण्याचा अनुभव, पात्राला वास्तवाशी जुळवण्यासाठी केलेली काटेकोर तयारी आणि 'गंगा माई की बेटियाँ' सारख्या कथा आजच्या प्रेक्षकांमध्ये बदल आणि सहानुभूती निर्माण करण्याची कशी क्षमता ठेवतात, याबद्दल खुलासा करत आहे.

प्र. 'गंगा माई की बेटियाँ' ही मालिका जिद्द, आत्मसन्मान आणि कुटुंब या विषयांवर प्रकाश टाकते. हे व्यापक विषय तुमच्यासोबत वैयक्तिक पातळीवर कसे जोडलेले आहेत?

उ. 'गंगा माई की बेटियाँ' ही केवळ एक कथा सांगणारी मालिका नाही, तर माझ्या मते ती आपल्या आयुष्याचेच प्रतिबिंब आहे. या मालिकेचे खास वैशिष्ट्य म्हणजे ती एक आई आणि तिच्या मुलींच्या प्रवासातून या सार्वत्रिक मूल्यांचा उत्सव साजरा करते. ती त्या शांत शक्तीचे दर्शन घडवते जी अनेक स्त्रिया आपल्या दैनंदिन आयुष्यात जगतात. मला माझ्या आयुष्यातील अनेक स्त्रिया, मग त्या माझ्या कुटुंबातील असोत, मैत्रिणी असोत किंवा अगदी अनोळखी, अशाच जिद्दीने जगताना दिसतात. हे सर्व पाहून मला प्रेरणा मिळते की या मूल्यांशी नाते घट्ट ठेवावे आणि याचमुळे अशा कथा 'गंगा माई की बेटियाँ' सारख्या सांगणे का महत्त्वाचे आहे याची आठवण होते.

प्र. स्नेहाला धाडसी, हुशार आणि स्वातंत्र्यप्रिय म्हणून सादर करण्यात आले आहे. तिच्या व्यक्तिमत्त्वाचा कोणत्या पैलूंनी तुला सर्वात जास्त आकर्षित केले ?

उ. माझ्यासाठी स्नेहा फक्त टीव्हीवरील आणखी एक पात्र नाही; ती आजच्या अनेक तरुण स्त्रियांचे गुंतागुंतीचे प्रतिबिंब आहे. तिचे प्रेम आकर्षण होते ते तिचा निर्भयपणा आणि स्पष्ट विचार. समाजाच्या मर्यादा आणि बहिणींच्या कर्तव्यांमध्ये राहण्यास किंवा आजूबाजूच्या अन्यायाला आव्हान देण्यास कधीही मागे पाहत नाही. मला आवडले की ती महत्त्वाकांक्षी आणि बौद्धिकदृष्ट्या हुशार असूनही तिच्या भावनांमध्ये खोलवर रुजलेली आहे. तिच्या वेदना, विशेषतः वडिलांकडून सोडले जाण्याचे दुःख या शक्तीत रूपांतरित करण्याची तिची कला खूपच प्रेरणादायक आहे. कलाकार म्हणून अशा पात्राला साकारताना मला तिचे कठीण बाह्यरूप आणि संवेदनशील अंतर्मन यांचा अनुभव घेता येतो, जे खूप समाधानकारक आहे. मला वाटते की ती अनेक प्रेक्षक, विशेषतः तरुण स्त्रिया, तिच्या प्रवासात स्वतःला पाहतील.

प्र. स्नेहाच्या पात्राला वास्तवाशी जुळवण्यासाठी तू काही विशेष तयारी केली होतीस का, जसे बोलीभाषेवर काम किंवा खऱ्या आयुष्यातील निरीक्षण ?

उ. हो, नक्कीच. स्नेहासारखे पात्र फक्त बाह्यरित्या साकारले जाऊ शकत नाही; तिच्यात खरं आत्मा आणि प्रामाणिकपणा असावा लागतो. मी लहान शहरातील त्या तरुण स्त्रिया पाहिल्या ज्यात शिक्षण, काम आणि कुटुंबीय जबाबदाऱ्या पार पाडत असतात, कारण स्नेहा त्या आत्म्याचे प्रतिनिधित्व करते. मी तिच्या देहबोलीवरही काम केले; ती नैसर्गिक अधिकार असलेली आणि परिस्थिती सहज हाताळू शकणारी वाटायला हवी होती. तिच्या स्वराती ठामपणा, चालण्याची शैली, आणि उत्तर देतानाची तीक्ष्णता या लहान तपशीलांवर विशेष लक्ष दिले. तिचे स्टायलिंग, तिची सिग्नेचर काळी बिंदी, चांदीचे पेंडंट ही तिच्या



पात्राला वास्तवाशी जोडण्यासाठी महत्त्वाचे ठरले. या सगळ्या गोष्टी तिच्या ताकदीचे प्रतीक आहेत, पण त्या तिच्या सौम्य बाजूची सूक्ष्मपणे दर्शवतात. या सर्व घटकांनी मिळून मला स्नेहाला जिवंत, जुळवून घेण्याजोगी आणि खरीखुरी वाटेल अशी साकारता आली.

# एव्हरस्टोन कॅपिटलचे पाठबळ लाभलेल्या इंटिग्रिस मेडटेक लिमिटेड या मेडटेक कंपनीचा आयपीओसाठी सेबीकडे डीआरएचपी दाखल

**मुंबई, १५ ऑक्टोबर :** इंटिग्रिस मेडटेक या कंपनीने सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) या बाजार नियामक संस्थेकडे आपला ड्राफ्ट रेड हेरिंग प्रॉस्पेक्टस (डीआरएचपी) दाखल केला आहे. इंटिग्रिस मेडटेक हा आर्थिक वर्ष २०२५ मध्ये कार्यकारी उत्पन्नाच्या दृष्टीने भारतातील दुसरा सर्वात मोठा विविधीकृत वैद्यकीय तंत्रज्ञान क्षेत्रातील प्लॅटफॉर्म आहे. या आयपीओमध्ये प्रत्येकी १ रुपया दर्शनी मूल्य असलेल्या एकूण ९२० कोटी रुपयांपर्यंतचे इक्विटी शेअर्सचे फ्रेश इश्यू समाविष्ट आहे, तसेच २९,६७४,५३१ समभागांचा विक्री प्रस्ताव (ऑफर फॉर सेल) यामध्ये कंपनीने दिला आहे. या विक्री प्रस्तावात प्रवर्तक आणि विद्यमान शेअरहोल्डर्सकडील समभागांची विक्री केली जाणार असून, त्यात एव्हरक्युब होल्डिंग पीटीई लिमिटेडकडील १५,९७४,२५२ शेअर्स, गुरमीत सिंग चुग यांच्याकडील ३,२५०,१४० शेअर्स आणि पुनिता शर्मा यांच्याकडील ३,२५०,१४० शेअर्सचा समावेश आहे.

आयपीओमधून उभारण्यात येणाऱ्या निधीचा वापर प्रामुख्याने काही कर्जाची परतफेड किंवा आगाऊ परतफेड करण्यासाठी करण्याची योजना कंपनीने आखली आहे. या कर्जामध्ये तिच्या पूर्ण मालकीच्या तसेच उपकंपन्यांकडून घेतलेल्या एकूण ६९६.३९ कोटी रुपयांच्या कर्जांचा आणि त्यावरील व्याज व आगाऊ परतफेडशुल्काचा समावेश आहे. उर्वरित निधीचा काही भाग सामान्य व्यावसायिक गरजांसाठी वापरण्यात येणार आहे. गुरमीत सिंग चुग आणि पुनिता शर्मा यांनी सह-स्थापना केलेल्या इंटिग्रिस मेडटेक कंपनीची सुरुवात कार्डियोलॉजी उत्पादनांच्या विक्रीपासून झाली. नंतर या कंपनीने युकॉन ड्रग एल्यूटिंग स्टेंटसारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देत उत्पादन क्षेत्रात प्रगती केली आणि प्रगत वैद्यकीय उपकरणनिर्मितीकडेवाटचाल केली. अलीकडेच कंपनीने प्रोबीर दास यांची मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांना जागतिक मेडटेक क्षेत्रात २६ वर्षांहून अधिक नेतृत्वाचा अनुभव असून, त्यांनी यापूर्वी टेरुमो आणि बेक्टन डिकिन्सन यांसारख्या अग्रगण्य कंपन्यांमध्ये वरिष्ठ पदे भूषवली आहेत.

एव्हरस्टोन कॅपिटलकडून २०१९ मध्ये मिळालेल्या वाढीव भांडवलाच्या मदतीने इंटिग्रिसने झपाट्याने प्रगती साधली. या निधीतून कंपनीने युरोपमध्ये, तसेच प्रयोगशाळा क्षेत्रीय आणि महत्त्वाच्या कंपन्यांचे अधिग्रहण केले, तसेच कॉम्प्लेक्स कोरोनरी इंटरव्हेन्शन्ससाठी आवश्यक असलेले मालकी तंत्रज्ञान मिळवले. परिणामी, आज इंटिग्रिस ही विज्ञानाधारित जागतिक प्लॅटफॉर्म आणि युरोपमध्ये उत्पादन सुविधांसह जागतिक स्तरावरील कंपनी आहे. इंटिग्रिसच्या तंत्रज्ञानावर आधारित विस्तारामुळे झालेल्या विविध अधिग्रहणांतून स्पष्ट होते. २००४ मध्ये कंपनीने ट्रान्सल्युमिना जीएमबीएच आणि व्हल्यू मेडिकल डिव्हाइसेस या कंपन्या विकत घेतल्या. त्याचप्रमाणे भौगोलिक आणि उत्पादन श्रेणीतील वैविध्यपूर्ण विस्तारासाठी लंडेक जीएमबीएच या कंपनीचे अधिग्रहण केले आहे.

## गोंदिया जिल्हा पालकमंत्रिपदाचा बाबासाहेब पाटलांचा राजीनामा



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :
राज्याचे सहकारमंत्री बाबासाहेब पाटील यांनी गोंदियाच्या पालकमंत्रिपदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी स्वतः याची पुष्टी केली आहे. त्यांच्या जागी आता राज्यमंत्री इंद्रनील नाईक यांच्याकडे गोंदियाच्या पालकमंत्रिपदाची धूरा सोपवण्यात आल्याची माहिती आहे. पण तूर्त तरी त्याची अधिकृत पुष्टी झाली नाही.

दरम्यान, बाबासाहेब पाटलांच्या राजीनाम्यामागे सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते प्रफुल्ल पटेल यांच्या नाराजीचे कारण असल्याचा दावा केला जात आहे.

बाबासाहेब पाटील यांनी गुडघ्याच्या शस्त्रक्रियेनंतर तब्येतीचा हवाला देत आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. सततचा लांबचा प्रवास आणि शारीरिक त्रास यामुळे कामकाजात अडथळा येत असल्याचे त्यांनी सांगितले. मात्र, विरोधक आणि पक्षांतर्गत वर्तुळात यामागे राजकीय दडपण असल्याची कुजबूज आहे.

बाळासाहेब पाटील म्हणाले की, प्रफुल्ल पटेल यांनी सांगितले ते बरोबर आहे. आपण १५ ऑगस्ट, २६ जानेवारी व १ मे रोजी जातो, त्यानंतर दोन-तीन महिन्यातून एकदा जातो. परंतु, पटेल यांनी टीका केली म्हणून रागारागाने मी राजीनामा दिलेला नाही. मुळात राग यायचे कारण नाही. पालक मंत्रिपदावरून थोडी गैरसोय होते. परंतु, सगळंच काही मनासारखे होणार नाही. कारण राज्यात तीन पक्षांचे सरकार आहे.

## सन्नाटा कोणाकडे होता?

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. १५ :
राज्यात आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर विरोधी पक्षांनी निवडणूक आयोगाकडे केलेल्या मागण्यांवर आणि त्यांच्या एकत्रित भूमिकेवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तीव्र टीका केली आहे.

विरोधकांनी आपला पराभव मान्य केल्याचे आणि त्यांचे अवसान गळाल्याचे दिसत असल्यामुळेच ते एकत्र आले, असे शिंदे म्हणाले. तसेच सन्नाटा कोणाकडे होता? आमच्याकडे की त्यांच्याकडे? असे म्हणत राज ठाकरेंना टोला लगावला.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासह महाविकास आघाडीच्या नेत्यांनी आज सलग दुसऱ्या दिवशी राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. त्यात त्यांनी मतदार याद्यांतील चुकांवर बोट ठेवत आयोगावर धारदार प्रश्नांची सरबत्ती केली. त्यानंतर आयोजित संयुक्त पत्रकार परिषदेतून निवडणूक आयोगासोबत झालेल्या बैठकीत आपले कोणतेही समाधान झाले नसल्याचे मत व्यक्त केले. या पार्श्वभूमीवर एकनाथ शिंदे यांनी विरोधकांवर निशाणा साधला आहे.



सगळे पक्ष एकत्र आल्यामुळे आपण जिंकू, असा विश्वास त्यांना वाटायला हवा होता. मात्र, त्यांना जिंकण्याची खात्री वाटत नाही, उलट महायुती १०० टक्के जिंकणार असा विश्वास त्यांना निर्माण झाला आहे. म्हणूनच त्यांनी निवडणूक आयोगाकडे निवडणुका रद्द करण्याची आणि मतपत्रिकेवर घेण्याची मागणी केली आहे, अशी टीका उपमुख्यमंत्री शिंदे यांनी केली.

लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला महायुतीपेक्षा जास्त जागा मिळाल्या होत्या, तेव्हा निवडणूक आयोग त्यांना चांगला वाटला. तेव्हा त्यांनी आयोगावर कोणतेही आक्षेप घेतले नाहीत. जेव्हा त्यांना निवडणुकीत यश मिळते, ते जिंकतात, तेव्हा मात्र सगळेच चांगले असते. पण जेव्हा हरतात तेव्हा निवडणूक आयोगाला दोष देण्याचे काम ते करत असतात, असा टोला शिंदे यांनी लगावला.

### पान १ वरून....

### विरोधी पक्ष आक्रमक...

निवडणूक आयोगापुढे मांडण्याची ग्वाही दिली. तसेच या याद्या दुरुस्त करण्याचे काम लवकरात लवकर सुरू करण्याचे आश्वासनही दिले. निवडणूक आयोगाचे सर्व्हर दुसरेच कुणीतरी वापरत असल्याचा संशय असल्याचेही पाटील म्हणाले.

निवडणूक याद्यांमध्ये घोळ आहेत. हे घोळ आम्ही राज्य आणि केंद्रीय निवडणूक आयोगाच्या प्रतिनिधींसमोर ठेवलेले आहेत. ते सुधारले पाहिजेत. ते सुधारून विरोधीपक्षाचे समाधान झाले पाहिजे. सत्ताधारी पक्षांचेही समाधान झाले पाहिजे. निवडणूक आयोगाने या गोष्टींचा विचार करावा. त्यामध्ये इतर वेगवेगळे कायदे आणूच नयेत. ही सोपी गोष्ट आहे. त्यात काही कॉम्प्लिकेटेड नाहीये. आम्ही क्लिष्ट विषय बोलत नाहीयेत, असे राज ठाकरे म्हणाले.

**आठ वेळा निवडून येणार मी कसा पडतो?**

आठ वेळा निवडून येणारे काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात पडले कसे असा सवाल राज ठाकरे यांनी निवडणूक आयोगाला विचारला होता. याबाबत बाळासाहेब थोरात यांना विचारले असता, अनेक प्रश्न सर्वांना शंकास्पद वाटतात. मलाच नाही, तर महाराष्ट्रातील आणि देशातील प्रमुख लोकांना त्याबाबत शंका असल्याचे ते म्हणाले. मतदार याद्यांनुसार एक-एक घरात शेकड्याने लोक राहत आहेत. निवडणूक आयोगाने अंतिम उत्तर दिलेले नाही. काही सकारात्मक व्हावे अशी अपेक्षा आहे. निवडणूक आयोगाने आमच्याकडे वेळ मागितला नाही, मात्र गोंधळाच्या अवस्थेतील मतदार यादीवर निवडणुका निकोप नाही, ही वस्तुस्थिती आहे, असेही बाळासाहेब थोरात म्हणाले.

मतदार याद्यांच्या घोळाबाबत प्रत्येक जण हात झटकत आहेत, तर मग यांची जबाबदारी कुणाची? आम्ही कुणाला जाब विचारणार? असा सवाल उद्धव ठाकरे यांनी बैठकीत केला. त्रुटी आहेत, तर निवडणुका कशासाठी घेता, थेट इलेक्शन फॉर सिलेक्शन करून टाका, असा खोचक टोला उद्धव ठाकरेंनी लगावला.

ठाण्यात महानगरपालिका निवडणुकीसाठीसाठीचीवॉड रचना एका पक्षाला पाहिजे तशी केल्याचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे. त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव न घेता आरोप केला.

या बैठकीदरम्यान शेकापचे जयंत पाटील चांगलेच आक्रमक झाल्याचे दिसून आले. कामठी मतदारसंघात घर क्र. ० आणि राहणाऱ्यांची संख्या ४०० बोगस मतदारांवर अंकुश का नाही? असा सवाल करत, आम्हाला फालतू उत्तरे देऊ नका, असे म्हणत जयंत पाटील यांनी संताप व्यक्त केला.

### माओवाद पर्वाच्या....

मुख्यमंत्री म्हणाले की, ४० वर्षांपूर्वी अहेरी, सिरोंचा या भागात नवीन दलम सुरू करून मावोवाद चळवळ उभी करणाऱ्या भूपतीसारख्या वरिष्ठ माओवादी नेत्याने आज ६१ साथीदारांसह सशस्त्र आत्मसमर्पण केले आहे. ही देशाच्या इतिहासातील अत्यंत मोठी घटना आहे, असे त्यांनी नमूद केले. ते पुढे म्हणाले, आजच्या आत्मसमर्पणातून नवीन इतिहास लिहिल्या गेला आहे. यापूर्वी उत्तर गडचिरोलीतून माओवाद संपुष्टात आणण्यात आला आहे, आणि आजच्या या आत्मसमर्पणामुळे दक्षिण गडचिरोलीतील माओवादही संपुष्टात येत असल्याचे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री यांनी जे काही ८ ते १० माओवादी शिल्लक आहेत, त्यांना आत्मसमर्पण करून मुख्य धारेत येण्याचे आवाहन केले, अन्यथा त्याचे परिणाम भोगावे लागतील असा इशाराही दिला.

मुख्यमंत्र्यांनी गेल्या ४० वर्षांपासून दंडकारण्याच्या या भागातील गडचिरोलीची माओवादाशी सुरू असलेली लढाईबाबत सांगितले, यामुळे हा भाग विकासापासून वंचित राहिला. 'पिपल्स वॉर ग्रुप' सुरू झाल्यापासून माओवादी सक्रिय झाले आणि त्यांनी येथील युवकांमध्ये व्यवस्थेविरुद्ध संभ्रम निर्माण करून, संविधान-निर्मित व्यवस्था उलथून नवीन व्यवस्था सुरू करण्याचे स्वप्न दाखवले. मात्र समता व न्याय फक्त भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लिखित संविधानातूनच येऊ शकते या वास्तविकतेची जाणीव झाल्याने माओवादी चळवळीच्या नादी लागलेले आता आत्मसर्पण करत आहेत.

आत्मसमर्पण करणाऱ्यांना मुख्यमंत्र्यांनी संविधानाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याचे सांगितले. संविधानाचा आदर करेल, त्याच्या जीवनात सकारात्मक बदल होईल असा संदेश आम्ही आत्मसमर्पितांच्या पुनर्वसनातून देऊ, असे आश्वासन त्यांनी दिले. तसेच, प्रत्येकाचे उचित पुनर्वसन झाल्याशिवाय आम्ही थांबणार नाही अशी ग्वाही त्यांनी दिली. आजच्या आत्मसमर्पणानंतर सर्व आत्मसमर्पित माओवादी सदस्यांना पुनर्वसनासाठी एकत्रितपणे एकूण ३ कोटी ०१ लाख ५५ हजार रुपयांचे बक्षिस देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्र्यांनी गडचिरोली पोलिसांनी सातत्याने मावोवादविरूद्ध मोहिमा आखून माओवादाला जेरबंद व नेस्तनाबूत केले आणि विकास कामांतून नवीन माओवाद्यांची भरती बंद केली, याबद्दल पोलिस दलाचे आणि केंद्रीय राखीव दलाचे अभिनंदन केले. या ऐतिहासिक कामगिरीबद्दल त्यांनी गडचिरोली पोलिस दलाला १ कोटी रुपयांचा पुरस्कार जाहीर केला. जिल्हा पोलिस अधीक्षक निलोत्पल यांनी प्रास्ताविकातून माहिती दिली की, २०२१ पासून आतापर्यंत १४० माओवाद्यांना अटक करण्यात आली आहे, ८१ माओवाद्यांनी आत्मसमर्पण केले आहे, तर ९३ जहाल माओवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले आहे. यावेळी नक्षल पीडित कुटुंबांना धनादेशांचे वितरणही करण्यात आले. अपर पोलिस अधीक्षक एम रमेश यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

## खरीखरी...

### पान १ वरून...

आज गडचिरोलीच्या नक्षलग्रस्त जिल्ह्यातून उद्योग मस्त वाटचाल करताना आपले मुख्यमंत्री म्हणतात की हा जिल्हा भारतातील सर्वाधिक खनिज संपन्न जिल्हा होणार आहे. मग अशा परिस्थितीमध्ये जोपर्यंत या जिल्ह्यामधून नक्षली पोबारा करीत नाहीत तोपर्यंत गडचिरोलीच्या भावी उद्योग श्रीमंतीचे कधीही बारा वाजतील, हे त्यांना ठाऊक होते. त्यामुळेच येन-केन प्रकारेण नक्षल चळवळीमधील शिरपेच असलेला हा नेता सामान्य जनतेच्या जवळ घेता आला तर या जिल्ह्याचा कायापालट होऊ शकतो असे त्यांना वाटले असावे. अनेक वर्षापासून गडचिरोली जिल्ह्याच्या विकासाचे चाक महाभारतातील कर्णाच्या चाकाप्रमाणे नक्षल्यांच्या दलदलीमध्ये फसून गेले होते. आजच्या शरणोत्सवात खुद्द मुख्यमंत्री यांनीच भाग घेतल्यामुळे सरकार याबाबतीत किती गंभीर आहे हेच दिसून येते. आता उरल्या सुरल्या नक्षल्यांनी भूपतीचा रस्ता धरावा आणि मुख्य प्रवाहात यावे. मरणासन्न होण्यापेक्षा शरणासन्न होऊन राष्ट्राच्या हितासाठी हातभार लावला तर चांगलेच असते. हाच आजचा संदेश आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## प्रारूप मतदार यादीतून १९ गावे गायब!

■ महासागर प्रतिनिधी
अमरावती, दि. १५ :
जिल्ह्याच्या अंजनगाव सुर्जी तालुक्यातील सुमारे १९ गावे मतदार यादीतून गायब झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. निवडणूक विभागाने प्रसिद्ध केलेल्या प्रारूप मतदार यादीत या गावांचा समावेश नसल्याचे दिसून आले आहे.

जिल्हा परिषदेचे माजी सभापती शशिकांत मंगळे यांनी यासंदर्भात गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्या मते स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या मतदार यादीत ही गावे नसल्यामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.

निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी आणि या गावांमधील मतदारांसाठी हा अत्यंत गंभीर विषय आहे. या गावांमधील मतदार निवडणुकीपासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली आहे. शशिकांत मंगळे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे या संदर्भात अधिकृत तक्रार दाखल केली आहे. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे तातडीने चौकशी करून मतदार यादीतील ही त्रुटी दूर करण्याची आणि गायब झालेल्या गावांचा पुन्हा समावेश करण्याची मागणी केली आहे. या घटनेमुळे स्थानिक राजकीय वतुर्ळात तसेच सामान्य जनतेमध्येही चर्चेला उधाण आले आहे.

शशिकांत मंगळे म्हणाले, मतदार याद्यांची पाहणी करीत असताना निदर्शनास आले की काही गावेच्या गावे या मतदार यादीतून गायब आहेत. पांढरी खानमपूर पंचायत समिती गणामध्ये टाकरखेडा मोरे आणि धनेगाव ही गावे मतदार यादीत नाहीत. कापूसतळणी गणामध्ये रौंदळपूर, पोही, रत्नापूर, जवळा, औरंगपूर, सौदापूर ही गावे मतदार यादीतून बेपत्ता झाल्याचे दिसत आहे.

चौसाळा, भंडारज या गणामध्येही हाच प्रकार आढळून आला आहे. काही गावांना दुस?याच मतदारसंघात समाविष्ट करण्यात आले आहे. काही गावे उजाड जरी असली, तरी त्याची नोंद निवडणूक आयोगाच्या प्रारूप मतदार यादीत असते. या गावांना उल्लेख निवडणूक आयोगाने केला नाही, असे त्यांनी सांगितले.

## टिप्परखाली चिरडून दुचाकीस्वार ठार

■ महासागर प्रतिनिधी, भंडारा, दि. १५ :
भंडारा जिल्ह्यातील लाखनी-भंडारा राष्ट्रीय महामार्गावर सिंगोरी गावाजवळ आज एक भीषण अपघात घडला आहे. वाळूने भरलेल्या एका भरधाव टिप्परने दुचाकीस्वाराला चिरडल्याने त्याचा जागीच मृत्यू झाला. मृत व्यक्तीचे नाव राजू भोयर असल्याचे समजते.

टिप्पर हा चुकीच्या लेनने साकोलीच्या दिशेने जात असताना समोरून येणाऱ्या राजू भोयर यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडकेनंतर टिप्पर रस्त्याच्या कडेला उलटला आणि वेगात असल्याने राजू भोयर यांचा जागीच मृत्यू झाला. त्यांच्या दुचाकीचा अक्षरशः चेंदामेंदा झाला.

अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली आणि पोलिसांना कळवले. कारधा पोलिस स्टेशनचे ठाणेदार गोकुल सूर्यवंशी यांनी पथकासह घटनास्थळी दाखल होत क्रेनच्या मदतीने मृतदेह बाहेर काढला. टिप्पर हटवण्यासाठी दोन क्रेन आणि एका जेसीबी मशीनचा वापर करण्यात आला. टिप्परमधील वाळू रिकामी करून अपघातग्रस्त वाहन बाजूला करण्यात आले.

दरम्यान, अपघातानंतर टिप्पर चालक घटनास्थळावरून फरार झाला असून कारधा पोलिस त्याचा शोध घेत आहेत.

## मतिमंद मुलांना केलं शिल्पकार 'आई डे-केअर'मधून अनोखी जनसेवा

लोकजागर



पेण सारख्या गावच्या ठिकाणी special school च्या संकल्पनेचाच आभाव असल्याने कुमारी चैताली या स्वतःच्या सेरेबल पालसी मुलीच्या शिक्षणाकरीता स्वतःच्या राहत्या घरात विशेष मुलांसाठी डे केअर सेंटरची सुरुवात केली.

त्यांच्या माहितीतील विशेष मुलांच्या पालकांनी त्यांना स्वतःच्या मुलीबरोबरच इतर मुलांना त्यांच्या डे केअरमध्ये सामावून घेण्याचा आग्रह धरला आणि त्यांना नाही म्हणणे शक्यच झाले नाही. मुलांची वाढती संख्या लक्षात घेता श्रीमती मोहिते यांनी भाड्याच्या जागेत या मुलांसाठी प्रशिक्षण केंद्र चालू करण्याचे ठरविले. इथे साथ मिळाली रोटरी क्लब ऑफ पेण ओरायन ज्यांनी एक वर्ष कार्यशाळेची. आर्थिक बाजू उचलून खऱ्या अर्थाने समाजसेवेचे इंद्रधनुष्य सांभाळले.

स्वाती मोहिते यांनी मतीमंद शिल्पकला मुलांना कला शिकवली. या मुलांनी बनविलेल्या वस्तूंची संस्था विविध ठिकाणी स्टॉल लावून विक्री करते व त्यातून होणाऱ्या नफ्यातून विद्यार्थ्यांना मानधनही दिले जाते. विशेष म्हणजे जवळजवळ अठरा विद्यार्थी रु. १००० ते रु. ४००० पर्यंत मानधन घेत आहेत.

२०१० सालानंतर सुरू झालेल्या शासनमान्य कोणत्याही विशेष शाळेला सरकारी आर्थिक मदत आजवर मिळालेली नाही आणि म्हणूनच देणगीदारांकडून आलेल्या पैशातून शाळेचा खर्च भागवला जातो. चाळीस मुलांचे वसतिगृह उभारण्यात आले आहे. पण अंतर्गत फर्निचर आदी कामे अपूर्ण असल्याने केवळ सहा मुले व चार चा स्टाफ वसतिगृहात आहे.'आई डे केअर'या नावाने ही संस्था चालवली जाते. मतिमंद मुलांसाठी निवासी व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण केंद्र, पेण, रायगड विशेष मुलांना शालेय शिक्षण व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे अद्वितीय काम ही संस्था अविरतपणे करत आहे. या संस्थेच्या कायार्ची माहिती www.aaiday-care.org या वेबसाईट द्वारे अनेक मान्यवरांपर्यंत पोहोचली आहे.

भाड्याच्या एका जागेतून दुसऱ्या जागेवर स्थलांतरित करत असताना सातव्यांदा लोकमान्य हाउसिंग सोसायटी पेण येथील वामन मिरवणकर यांनी स्वतःची मोकळी जागा व घर कोणतीही अनामात रक्कम किंवा घर भाडे न घेता निशुल्क वापरण्यास दिले. आपल्या संस्थेचे सीए रोटेरियन सुनीत देव सरांनी या संस्थेच्या कायदेशीर बाबींची पूर्तता करण्यासाठी आपले स्नेही व नातलग यांना घेऊन एक विश्वस्त कमिटी बनविण्यास सांगितले आणि २०१० साली ख?या अथार्ने आई डे केअर संस्थेची स्थापना झाली. समाजातील विशेष मुलांना व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण देऊन त्यांना स्वतःच्या पायावर उभे करण्याचे काम या संस्थेद्वारे केले जात आहे.

आजूबाजूच्या खेड्यापाड्यातील आणि अतिशय गरीब कुटुंबातून आलेल्या या ५४ मुलांना आज संस्थेने कोणत्याही प्रकारची फि न आकारता व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण आणि विनामूल्य बस सेवा, युनिफॉर्म, औषधे, अन्न उपलब्ध करून दिले आहे. आई डे केअर संस्था सहाय्यक धर्मदाय आयुक्त, अलिबाग तसेच समाज कल्याण विभाग महाराष्ट्र राज्य शासन यांचे कडून नोंदणीकृत करण्यात आली आहे.

संस्थेमध्ये या विशेष मुलांना व्यवसाय प्रशिक्षणाबरोबर शिक्षण ही दिले जाते. आई डे केअर संस्थेतील काही विद्यार्थ्यांना आई-वडील नाहीत व काही विद्यार्थ्यांचे आई-वडील वृद्ध झाले आहेत त्यामुळे व वसतीगृह ही काळाची गरज आहे ही महत्वाची बाब लक्षात आली.

आता वसतिगृहही अलीकडे सुरू करण्यात आलीते. संस्थेची या विशेष व गरीब मुलांप्रती चालू असलेली धडपड व सचोटीचे काम पाहून दातृत्वादी असलेले सुप्रसिद्ध वकिल सविता फडके व सौ उषा फडके यांनी त्यांचे मालकीचे रामवाडी, पेण येथील प्रत्येकी २.५ गुंठ्यांचे दोन प्लॉट वसतिगृहासाठी उपलब्ध करून दिले. आज अतिशय सुंदर अशी तीन मजली वास्तू उभी आहे. अशा काही दानशूर मंडळींनी संस्थेला मदत केली आहे. ■ ■ ■

## कुस्ती पंढरीत उभं केलं जिम साहित्य बनवण्याचं साम्राज्य



कुस्तीच्या माहेरघरात, जिथे मातीतील पैलवानी आणि तालमींची परंपरा शतकानुशतके जपली जाते, तिथे एका सामान्य माणसाने आपल्या धाडस आणि जिद्दीच्या जोरावर एक अनोखं साम्राज्य उभं केलं आहे. दिलीप पाटील एक मध्यमवर्गीय तरुण असून यांनी कोल्हापुरात जिम साहित्य निर्मितीचा उद्योग उभारून केवळ स्वतःचं स्वप्न पूर्ण केलं नाही, तर अनेकांना प्रेरणा दिली आहे. त्यांच्या यशाची ही कहाणी कोल्हापूरच्या गल्ली-बोळांपासून ते देशभरातील फिटनेस केंद्रांपर्यंत पसरली आहे.

दिलीप पाटील यांचा जन्म कोल्हापुरातील एका साध्या कुटुंबात झाला. त्यांचं बालपण आणि तरुणपण या शहराच्या मातीत आणि कुस्तीच्या संस्कृतीत घडलं. कोल्हापुरातील प्रतिष्ठित केआयटी कॉलेजमधून त्यांनी अभियांत्रिकीचं शिक्षण पूर्ण केलं. शिक्षणानंतर त्यांनी किर्लोस्कर ब्रदर्स आणि पुण्यातील पूनावाला ग्रुपसारख्या नामांकित कंपन्यांमध्ये जवळपास एक दशकाहून अधिक काळ नोकरी केली.

या काळात त्यांनी उद्योग क्षेत्रातील बारकावे, तांत्रिक कौशल्य आणि व्यवस्थापनाचे धडे घेतले. पण त्यांच्या मनात कुठेतरी स्वतःचं काहीतरी करून दाखवण्याची आग धगधगत होती.

1990 च्या दशकात कोल्हापूरमध्ये आधुनिक व्यायामशाळांचा ट्रेंड हळूहळू रुजत होता. पारंपरिक तालमी आणि कुस्तीच्या जोडीला तरुणांमध्ये जिम आणि फिटनेसचं आकर्षण वाढत होतं. पण दिलीप यांच्या तीक्ष्ण नजरेने एक गोष्ट टिपली कोल्हापुरात जिम साहित्य बनवणारी एकही कंपनी नव्हती. ट्रेडमिल, वेट लिफ्टिंग मशीन, डंबेल्स यांसारखी उपकरणं पुणे, मुंबई किंवा इतर मोठ्या शहरांमधून आयात करावी लागत होती. याच संधीचा फायदा घेत दिलीप यांनी 1998 मध्ये स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा धाडसी निर्णय घेतला.

कोणताही नवीन व्यवसाय सुरू करणं सोपं नसतं आणि दिलीप यांच्यासाठीही हा प्रवास खड्ड्यांनी भरलेला होता. भांडवलाचा अभाव, तांत्रिक ज्ञानाची कमतरता आणि स्थानिक बाजारपेठेतील अनिश्चितता यामुळे त्यांच्यासमोर अनेक आव्हानं उभी ठाकली.

स्थानिक तालमींमधील पैलवान, जिम मालक आणि फिटनेस प्रशिक्षक यांच्याशी सतत चर्चा करून त्यांनी बाजारपेठेच्या गरजा समजून घेतल्या. त्यांनी छोट्या कार्यशाळेतून जिम साहित्य बनवण्यास सुरुवात केली. सुरुवातीला त्यांनी डंबेल्स, वेट प्लेट्स आणि साध्या व्यायाम बेंचपासून सुरुवात केली.

दिलीप यांच्या उपकरणांची गुणवत्ता, टिकाऊपणा आणि परवडणारी किंमत यामुळे त्यांना हळूहळू मागणी वाढू लागली. त्यांनी स्थानिक कारागिरांना प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार उपलब्ध करून दिला. यासोबतच त्यांची मुलगी स्मृती पाटील हिनेही व्यवसायात सक्रिय सहभाग घेतला. स्मृतीने आधुनिक तंत्रज्ञान आणि डिजिटल मार्केटिंगचा वापर करत कंपनीला नव्या उंचीवर नेऊन तरुण उद्योजकांपर्यंत नेऊन ठेवण्याचा प्रयत्न करतेय. ऑनलाइन मार्केटिंग, सोशल मीडियाचा वापर आणि वेबसाइटच्या माध्यमातून त्यांनी कंपनीची व्याप्ती वाढवत आहे.

एकूणच, मनात जर काही करण्याची जिद्द असेल आणि तितकाच प्रचंड आत्मविश्वास असेल तर पारंपारिक चाकोरीबद्ध अशा नोकरीला फाटा देऊन आपल्या आवडीच्या व्यवस्यात नक्कीच यशश्वी बनता येत याच मूर्तिमंत उदाहरण म्हणजेच दिलीप पाटील हे आहेत. त्यांच्या या जिद्दीला मनापासून सलाम. ■ ■ ■

: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## महाभारतातील 'कर्ण' गेला पंकज धीर यांचे निधन



■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १५ :
बी.आर. चोप्रा यांच्या महाभारतात कर्णाची भूमिका करणारे अभिनेते पंकज धीर (६८) यांचे बुधवारी निधन झाले. ते बऱ्याच काळापासून कर्करोगाशी झुंज देत होते.

पंकज धीर यांनी हिंदी चित्रपट आणि दूरदर्शन मालिकांमध्ये काम केले आहे. ते चंद्रकांता, युग, द ग्रेट मराठा आणि बधो बहू सारख्या शोमध्ये दिसले आहेत.
आशिक आवारा, सडक, सोल्जर आणि बादशाह यांसारख्या चित्रपटांमध्येही ते दिसले होते. महाभारत मालिकेत त्यांनी साकारलेला कर्ण बराच गाजला होता, पंकज यांचा मुलगा निकितिन धीर हा देखील अभिनेता आहे. त्याने अभिनेत्री क्रतिका सेंगरशी लग्न केले आहे.




६९ व्या धम्मचक्र अनुप्रवर्तन दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा!

हरीभाऊ सार्वजनिक वाचनालय चकजांभुळविहीरा ता.चिमुर जि चंद्रपूर



रंजना गेडाम
अध्यक्ष



लिला मुनेश्वर
कोषाध्यक्ष



विश्वास गेडाम
सचिव



राजकुमार हरी गेडाम
उपक्रमशिल शिक्षक



गुलाबराव पाटील
उत्कृष्ट शिक्षक जि प चंद्रपूर





भुमिपुजन व लोकार्पण सोहळा
गुरुवार, दि. १६ ऑक्टोबर २०२५
सकाळी ११ ते ३ : आमदार आपल्या दारी शिबीर, अंतोरा
दुपारी ४ ते ६ : विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण
... कार्यक्रमाचे अध्यक्ष ...
मा.श्री.दादारावजी केचे, आमदार, विधान परिषद
... शुभहस्ते ...
मा.श्री. सुमितदादा वानखेडे
आमदार आर्वी विधानसभाक्षेत्र
... प्रमुख उपस्थिती ...
सौ. रेखाताई मतले, माजी सभापती, पं.स. आष्टी
सौ. छायाताई घोडीले, माजी सदस्या, जि.प. वर्धा | सौ. अंकितातार्ई होले, माजी सदस्या, जि.प. वर्धा | सौ. हेमलताताई भगत, माजी उपसभापती, पं.स. आष्टी | श्री. गोविंदाभाऊ खंडाळे, माजी उपसभापती, पं.स. आष्टी
सर्व आजी माजी सरपंच, उपसरपंच व सदस्य यांच्या उपस्थित संपन्न होत आहे.
तरी गावातील सर्व नागरीकांनी उपस्थित रहावे ही विनंती.

| अ.क्र. | गावाचे नांव | कामाचे नांव | किमंत | वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | माणिकनगर | जि.प. शाळा दुरुस्ती करणे. | ६.३७ लक्ष | ४.०० |
| २. | चिंचोली | सिमेंट रस्ता बांधकाम करणे. | ७.०० लक्ष | ४.३० |
| ३. | सिरसोली | वर्धा नदीवरील मुख्य पुलाचे बांधकाम करणे. | ३०.०० कोटी | ५.०० |
| ४. | खडकी | प्राथमिक आरोग्य केंद्र इमारत बांधकाम करणे. | ५०.०० लक्ष | ५.३० |

विनीतः भारतीय जनता पार्टी, आष्टी तालुका

नागपूर
महासागर
वृत्तसागर
■ गुरूवार, दि. १६ ऑक्टोबर २०२५ ■

## कफ सिरपने बालकांच्या मृत्यूच्या पार्श्वभूमीवर

# औषध विक्री दुकानांची झाडाझडती

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :**
कफ सिरप मुळे मध्यप्रदेशमधील २० आणि तामिळनाडू राज्यातही अनेक बालकांचा मृत्यू झाला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात देखील औषध प्रशासन विभागाने औषध विक्री करणाऱ्या दुकानांची तपासणी सुरू केली आहे.

तपासणीत मृत्यूचे कारण ठरलेले 'कोल्ड्रिफ' कफ सिरपचा साठा आढळून आला नाही. मात्र, 'आरईएसपीआयआरईएसएच टीआर बी' च्या काही बॉटलचा स्टॉक असल्याचे दिसून आले. औषध प्रशासनाने हा साठा तात्काळ प्रतिबंधित करून तो सील केल्याची माहिती आहे.

शासकीय रुग्णालयांचे ड्रग स्टोअर्स तसेच इतर किरकोळ आणि घाऊक विक्रेत्यांकडून चाचणीसाठी प्रत्येकी दोन कफ सिरपचे नमुने घेण्यात आले आहेत. यासोबतच, आयुक्तांच्या



आदेशानुसार, भंडारा जिल्ह्यामध्ये किरकोळ मेडिकल दुकानांमधून डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय कफ सिरप विक्री केली जाते का, यासाठी विशेष मोहीम राबवण्यात आली. या मोहिमेदरम्यान, डॉक्टरांची चिठ्ठी नसतानाही काही मेडिकल दुकानांवर प्रशासनाने तात्काळ कारवाई केल्याची माहिती आहे.

यवतमाळ येथे ६ वर्षीय शिवम नामक बालकाचा कफ सीरपमुळे मृत्यू झाल्याचे सांगण्यात येते. कुटुंबियांनी तसा आरोप केला असला तरी, काही शासकीय विभागांनी याचा इन्कार केला आहे. या पार्श्वभूमिवर संबंधित विभाग अधिक सक्रिय झाला असून, नागपूर शहरासह जिल्ह्याच्या विविध भागात मेडिकल स्टोर्सची धडाक्यात तपासणी सुरू आहे. डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय संबधित सिरपची विक्री सुरू आहे का? याचीही तपासणी केली जात आहे. आज दिवसभर या विभागातील अधिकाऱ्याशी संपर्क होवू शकला नाही.

# प्रसिद्ध रामझुल्यासह इमारतीही उजळल्या





■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :**
दिवाळी सणाला अद्याप सहा दिवसांचा अवकाश असला तरी, शहरात आतापासून उत्साहाला उधाण आले आहे . नागपूर शहरातील रामझुला म्हणून प्रसिद्ध असलेल्या रेल्वे पुलावर आकर्षक गुलाबी रंगाची रोषणाई करण्यात आली आहे.

विभागाचे मुख्यालय असलेल्या नागपूर शहरात अनेक जुन्या आणि नवीन इमारतीमध्ये शासकीय कार्यालये असून, यातील अनेक इमारतींनाही प्रकाश संयोजनाने सजविण्यात आले आहे .सायंकाळच्या वेळी रामझुला आणि या इमारती आकर्षक रंगांमध्ये न्हावून निघत असून, ही रंगसंगती पाहण्यासाठी शहरातील नागरिक गर्दी करू लागल्याचे दिसून येते.

## विनयभंग : आरोपीला कारावास

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :**
एका अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याचा आरोप सिद्ध झाल्याने अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. एच. ग्वालानी यांनी संदीप उर्फ 'गिरीधर काशीराम यादव (१९) रा. अजनी यास पोक्सो कायद्यान्वये तीन वर्षाचा कारावास सुनावला.
पीडित १४ वर्षीय मुलगी ही देखील अजनी हद्दीत राहते. स्नॅपचॅटद्वारे त्यांची ओळख झाली. त्यानंतर त्यांचे फोनवर बोलणे सुरू केले. ऑगस्ट २०२३ ते २१ मार्च २०२४ दरम्यान आरोपी संदीपने पीडित मुलीला तिचे तोकड्या कपड्यावरील छायाचित्राची मागणी केली. मुलीने छायाचित्र पाठविण्यास नकार दिला असता तो तिला त्रास देऊ लागला. तो तिचा पाठलाग करून विनयभंग करायचा. त्रासाला कंटाळून शेवटी मुलीने अजनी पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंदवून संदीपला अटक केली.
तत्कालीन सहायक निरीक्षक सचिन निंबाळकर यांनी याप्रकरणाचा तपास करून आरोपीविरुद्ध न्यायालयात आरोपपत्र दाखल केले. न्यायालयात आरोपी संदीपविरुद्ध आरोप सिद्ध झाल्याने न्यायाधीश ग्वालानी यांनी त्याला तीन वर्षाचा कारावास आणि ६ हजार रुपये दंड सुनावला. आरोपीतर्फे अॅड. झा यांनी, तर सरकारतर्फे सहायक सरकारी वकील दिपीका गवळी यांनी बाजू मांडली.

## भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना मनपातर्फे अभिवादन



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :**
विज्ञान क्षेत्रात बहुमोल योगदान देणारे भारताचे मिसाईल मॅन माजी राष्ट्रपती, भारतरत्न.डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त नागपूर महानगरपालिकेच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी भारतरत्न. डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या तैलचित्राला पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन केले. मनपा मुख्यालयातील दालनात आयोजित छोटेखानी समारंभात मनपाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती वसुमना पंत, अतिरिक्त आयुक्त श्रीमती वैष्णवी बी.उपायुक्त मिलिंद मेश्राम, उपायुक्त राजेश भगत, जनसंपर्क अधिकारी मनीष सोनी यांनी देखील पुष्प अर्पण करीत अभिवादन केले. याप्रसंगी स्वप्नील लोखंडे अमोल तपासे, प्रमोद हिवसे राजू लोणारे, श्री.कमलेश जंजाळ, अनिकेत यादव जितेश धकाते, शुभम राऊत, राज चौधरी, अनिकेत आटे, शैलेश जांभूळकर यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.



## कोयता घेऊन दहशत माजवणाऱ्यास अटक

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :**
गुन्हा करण्याच्या हेतूने कोयता घेऊन फिरणारा नावेद अयूब शाह (२४), रा. समतानगर याला कपिलनगर पोलिसांनी अटक केली.
मध्यरात्री नावेद हा शस्त्र घेऊन फिरत आहे अशी माहिती कपिलनगर पोलिसांना समजली होती. पोलिस घटनास्थळी गेले आणि त्याला पकडले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याजवळ कोयता मिळून आला. पोलिसांनी गुन्हा नोंदवून नावेद यास अटक केली.

## हुक्का पार्लरवर धाड

■ **नागपूर :** पाचपावली हद्दीत कमाल चौकात येथे अवैधरित्या सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर पोलिसांनी धाड घालून दोघांना अटक करीत त्यांच्या ताब्यातून १३ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.
रंजीत सेवाग्राम कोचे (३६) टेका नाका आणि जॉन्टी सोलोमनं फलीप्स (२६) मार्टीननगर यांनी काही दिवसांपूर्वी कमाल चौकातील एका इमारतीत हॅमर्स रेस्टॉरंट अॅण्ड कॅफे या नावाने हुक्का पार्लर सुरू केला होता. स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी पार्लरमध्ये येणाऱ्या ग्राहकांना प्रतिबंधीत तंबाखूजन्य पदार्थ पुरवित असत. पाचपावली पोलिसांना ही माहिती समजताच पोलिसांना या पार्लरवर धाड घातली. त्यावेळी दोघेही हे ग्राहकांना सेवा देत असल्याचे आढळून आले.

## रेल्वेतून पडून प्रवाशाचा मृत्यू

■ **नागपूर :** प्रवासादरम्यान रेल्वेतून खाली पडल्याने मंदारपाणी (झारखंड) येथील कार्तिक चंदू नगेशिया (५२) या प्रवाशाचा मृत्यू झाला.
कार्तिक हा चेन्नई येथे कामाला होता. नागपूरला येऊन तो दुसऱ्या गाडीने रांची येथे जाणार होता. रेल्वेने जात असताना मंगळवारी सायंकाळी तो वैशालीनगर हद्दीत रेल्वे रूळावर जखमी अवस्थेत मिळून आला. पोलिसांनी त्याला मेडिकलमध्ये नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. कार्तिकच्या खिशात चेन्नई ते नागपूर आणि नागपूर ते चेन्नई अशी तिकीटे मिळाली. तो बहुतेक चुकीच्या गाडीत बसला असावा आणि गाडीतून उतरण्याच्या नादात पडला असता असा पोलिसांचा संशय आहे. याप्रकरणी बेलतरोडी पोलिसांनी नोंद केली आहे.



■ ***नागपूर :*** *शासकीय कला आणि अभिकल्प महाविद्यालय, नागपूरच्यावतिने दिपावलीनिमित्त प्रकाश पर्व २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे औचित्य साधून महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी प्रांगणात आकर्षक सजावट केली होती.*

## बलात्कारातील आरोपीला अटक

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :**
एका तरुणीला आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी कपिलनगर पोलिसांनी प्रशांत अनिल मराठे (२८) नवीन कामठी यास अटक केली.
प्रशांतची इन्स्टाग्रामच्या माध्यमातून पीडित २६ वर्षीय तरुणीसोबत ओळख झाली. ओळखीचे रुपांतर प्रेमात झाले. त्यानंतर ते आपसात चॅटींग करू लागले. प्रशांतने तिला लग्नाचे आमिष दाखविले होते. तिचा विश्वास संपादन करून २९ एप्रिल २०२४ रोजी त्याने तिला कपिलनगर हद्दीत नेऊन तिचे लैंगिक शोषन केले. त्यानंतर त्याने अनेकदा तिच्या इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध प्रस्थापित केले. तरुणीने त्याला लग्नाविषयी विचारणा केली असता तो टाळाटाळ करू लागला. याप्रकरणी पीडित तरुणीच्या तक्रारीवरून कपिलनगर पोलिसांनी गुन्हा नोंदवून प्रशांत यास अटक केली.

## चोरीच्या सात दुचाकी जप्त

■ **नागपूर :** तहसील पोलिसांनी एका परप्रांतिय वाहनचोराला अटक करून त्याच्या ताब्यातून चोरीच्या सात दुचाकी जप्त केल्या.
प्रल्हाद उर्फ करण चोखेलाल चंद्रवंशी (३६) ब्राम्हणी, सिवनी (म.प्र.) असे आरोपीचे नाव आहे.
आशिष संजय डेकाटे (२७) यांची मोटरसायकल चोरून नेली होती. गुन्हे शाखेच्या वाहन चोरी पथकाने प्रल्हाद यास अटक करून त्याच्या ताब्यातून काही दुचाकी जप्त केल्या होत्या. पोलिस कोठडी संपल्यानंतर त्याची मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली. तहसील पोलिसांनी प्रॉडक्शन वारंटवर प्रल्हादला कारागृहातून ताब्यात घेतले. त्याची सखोल चौकशी केली असता त्याने पाचपावली, लकडगंज, रामटेक येथून सात दुचाकी चोरल्याची कबुली दिली. या दुचाकी मध्य प्रदेशात नेऊन विक्री केल्याचे सांगितले.

## सायकलस्वाराला लुटले

■ **नागपूर :** दुकान बंद करून सायकलने घरी जाण्यास निघालेल्या एका चहा विक्रेत्याला चाकूचा धाक दाखवित त्याच्याजवळील बाराशे रुपये लुटून नेणाऱ्या एका लुटारूला गणेशपेठ पोलिसांनी अटक केली.
कमलेश अनिल दुबे (३२) दुकान बंद करू कमलेश हे सायकलने घरी जात होते. मोक्षधाम चौकातून जात असताना एका दुचाकीवर आलेल्या तीन लुटारूंनी त्यांना अडविले. तिघांनीही त्यांना हातबुक्कीने मारहाण केली. त्याचप्रमाणे एकाने चाकूचा धाक दाखवित दुबे यांच्या खिशातील बाराशे रुपये हिसकावून पळून गेले.

# माहिती व जनसंपर्क विभागाची विभागस्तरीय छायाचित्रण कार्यशाळा

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :**
शासकीय योजना, उपक्रम जनतेपर्यंत पोचवणारा छायाचित्रकार हा शासन आणि नागरिक यांच्यातील दुवा असतो. त्यामुळे सखोल गृहपाठ आणि परिश्रम यातून छायाचित्रण करणे गरजेचे आहे.आपल्या व्यवसायाची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी सतत मेहनत करावी, अशा शब्दात ज्येष्ठ छायाचित्रकार संगीता महाजन यांनी मार्गदर्शन केले.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नागपूर संचालक कार्यालयातर्फे विभागाच्या नागपूर व अमरावती विभागातील शासकीय छायाचित्रकारांसाठी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या प्रसंगी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. नागपूर - अमरावती विभागाचे संचालक (माहिती) डॉ. गणेश मुळे अध्यक्षस्थानी होते.

छायाचित्रकार हा विचार शक्तीनुसार कॅमेराची कळ दाबून उत्तमोत्तम छायाचित्र चित्रित करीत






असतो. सृजनशील व संवेदनशील छायाचित्रकारीतेसाठी दृष्टिकोन असावा लागतो व तो वाचन, निरीक्षण व सतत अभ्यासाने तयार होतो. दृष्टीकोन हा छायाचित्रकारांसाठी महत्वाचा असतो, असे सांगत शासकीय विभागातील छायाचित्रकारांनी करायची तयारी व घ्यावयाची काळजी घ्यावी.

शासकीय छायाचित्रकारांची विश्वसनीयता आणि जबाबदारीचे महत्व समजावून सांगताना वेळेत उपस्थित राहणे, आवश्यक साधन सामुग्री बाळगणे, शिस्त व नम्रता, निवडक छायाचित्रांची निवड व साठवण याबाबत माहिती दिली. छायाचित्रातील अचूक कॉम्पोजिंग व सिमीट्री यासोबतच कॅमेरा अँगलस, प्रकाशाच्या विविध छटा, रूल ऑफ थर्ड, डेफ्थ ऑफ फिल्ड, आयएसओ, अपार्चर, लेन्स आदी तांत्रिक बाबींवर विविध छायाचित्रे व सादरीकणाद्वारे श्रीमती महाजन यांनी मार्गदर्शन केले.

तत्पूर्वी, संचालक डॉ. गणेश मुळे यांनी कार्यशाळेमागील भूमिका सांगताना छायाचित्रकार हा समाजाचा महत्वाचा घटक असल्याचे सांगून शासनात छायाचित्रीकारीतेच्या विविध अंगांचे महत्व उदाहरणासहीत विशद केले. सहायक संचालक पल्लवी धारव यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. या कार्यशाळेत नागपूर, चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, अमरावती, यवतमाळ या जिल्ह्यातील शासकीय छायाचित्रकार उपस्थित होते.

# माथणी टोल नाका प्रशासनाने पास बंद केल्याने वाहकांमध्ये तीव्र नाराजी




महासागर प्रतिनिधी
मौदा , दि. १५ :
राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५३ नागपूर भंडारा या मार्गावर बातमी टोल नाका आहेत. टोल नाका सुरू झाला तेव्हापासून मौदा शहरातील नागरिकांना पाचशे दिल्या जायच्या परंतु मागील काही दिवसात या संपूर्ण वाहनचालकाच्या पाशी टोल नाका प्रशासनाने बंद केल्यामुळे मौदा शहरातील नागरिकांमध्ये तीव्र संतोष निर्माण झालेला आहे आज मौदा शहरातील शेकडो वाहन चालक या मार्गाने इजा करीत असतात त्यामध्ये शासकीय कर्मचारी व्यापारी वर्ग यांची आठवड्यातून दोन-तीन वेळा जाणे असते साधारणतः सहाशे रुपये पर्यंत ही पास सहा महिन्याकरता दिली जायची परंतु नव्याने आलेल्या व्यवस्थापन मंडळाने या पासेस पूर्णपणे बंद केलेले आहे त्यामुळे या टोलनाक्यावरून दररोज जाणाऱ्या वाहनचालकांना शंभर ते दीडशे रुपयाचा आर्थिक भुरदंड बसतो त्यामुळे या पासेस पूर्ववत देण्याची मागणी मौदा शहर वाशियानी व चालकांनी केली.

## दादाराव मुळे यांची विशेष कार्यकारी अधिकारीपदी नियुक्ती



हिंगणा : नप वानाडोंगरी निवासी सामाजिक कार्यकर्ता दादाराव नारायण मुडे यांची विशेष कार्यकारी अधिकार पदी दुसऱ्यांदा नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्ती बद्दल त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व आमदार समीर मेघे यांचे आभार मानले आहेत. मुळे गेल्या दहा वर्षापासून संजयगांधी निराधार योजना सदस्यपदी नियुक्ती झालेली आहे.त्यांच्या या नियुकी बद्दल त्यांचे नागपूर जिल्हा महामंत्री संध्या गोतमारे, माजी सरपंच महानंदा पाटील, माजी बांधकाम सभापती आबा काळे ललिता राऊत गजानन झाडे भागवत काळे सुलोचना झाडे नितीन साखरे वाना डोंगरी शहराध्यक्ष राजेंद्र लोहकरे मंडल अध्यक्ष सचिन मेंडजोगे माजी शिक्षण सभापती अर्चना मुडे अनितताई गुप्ता माजी गटनेते बाळू मोरे आशिष अजमेरे यांनी आणि परिसरातील नागरिकांनी अभिनंदन केले आहे.

# प्रभागनिहाय आरक्षण जाहीर इच्छुकांची 'फिल्डिंग' सुरू

महासागर प्रतिनिधी
सावनेर , दि. १५ :
सावनेर नगरपालिकेची सर्वसाधारण प्रवर्गासाठी सावनेर नगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक : राजकीय पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साह : सावनेर सावनेर नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी बुधवारी (दि. ८) प्रभागनिहाय आरक्षण सोडत काढण्यात आली. यात २४ जागांचे आरक्षण जाहीर करताच राजकीय पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साह निर्माण झाला आणि त्यांनी उमेदवारी मिळिवण्यासाठी 'फिल्डिंग' सुरू केली. यात सर्वसाधारण प्रवर्गासाठी १४ जागा आरक्षित करण्यात आल्या असून, नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी सहा, अनुसूचित जाती प्रवर्गासाठी तीन आणि अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी एक जागा राखीव करण्यात आली. सर्वसाधारण प्रवर्गासाठी १ (ब), २ (ब), ३ (ब), ४ (ब), ५ (ब), ६ (ब) आणि ११ (ब) असे सात प्रभाग तर सर्वसाधारण प्रवर्गातील महिलांसाठी २ (अ), ५ (अ), ७ (ब), ८ (ब), ९ (क), १० (ब) आणि ११ (ब) असे सात प्रभाग राखीव करण्यात आले आहेत. नागरिकांचा मागास प्रवर्गासाठी ७ (अ), ९ (ब), १० (अ) असे तीन तर नागरिकांचा मागास प्रवर्गातील महिलांसाठी ३ (अ), ४ (अ) आणि ६ (अ) असे तीन प्रभाग आरक्षित केले आहेत. अनुसूचित जाती प्रवर्गासाठी ८ (अ), अनुसूचित जाती प्रवर्गातील महिलांसाठी १ (अ) व ९ (अ) असे दोन तसेच अनुसूचित जमाती प्रवर्गातील महिलांसाठी ११ (अ) हा एकमेव प्रभाग राखीव करण्यात आला आहे.

ही सोडत उपविभागीय अधिकारी संपत खलाटे, पालिकेचे मुख्याधिकारी अर्शिया जुही यांच्या उपस्थितीत नगरपालिकेच्या षटकाराची संधी ॲड. अरविंद लोधी यांनी प्रभाग क्रमांक १ मधून सलग पाचवेळा विजय संपादन केला आहे. हा प्रभाग त्यांच्यासाठी याहीवेळी अनुकूल असल्याने ते सहाव्यांदा विजय मिळवून षटकार मारण्याची शक्यता बळावली आहे. आरक्षण काहींच्या विरोधात गेल्याने त्यांनी घरातील महिलांना निवडणूक रिंगणात उतरविण्याची तयार सुरू केली आहे. एकूण २४ पैकी १३ जागा आणि नगराध्यक्षपद महिलांच्या वाट्याला गेल्याने नवीन पालिकेत एकूण १४ महिला लोकप्रतिनिधी असतील. काँग्रेसकडून नगराध्यक्षपदासाठी सीमा सुनील चापेकर यांनीही दावेदारी केली आहे. सभागृहात काढण्यात आली.

# राजपालसिंग चव्हाण यांचा कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश




महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. १५ : शहरातील पक्ष कार्यालयात झालेल्या या कार्यक्रमात शहराध्यक्ष अनिल अहिरकर यांच्या हस्ते राजपालसिंग चव्हाण यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा दुपट्टा परिधान करून पक्षात प्रवेश देण्यात आला. कार्यक्रमात बोलताना शहराध्यक्ष अनिल अहिरकर व शहर कार्याध्यक्ष श्रीकांत शिवणकर यांनी सांगितले की राजपालसिंग चव्हाण हे सामाजिक आणि संघटनात्मक कार्यात नेहमीच सक्रिय राहिले आहेत. त्यांच्या आणि त्यांच्या कार्यकर्त्यांच्या पक्षप्रवेशामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला शहरात नवसंजीवनी मिळाली असून, येत्या स्थानिक स्वराज्य निवडणुकांमध्ये पक्ष निश्चितच अधिक बळकट होईल.

राजपालसिंग चव्हाण यांनी पक्षप्रवेशानंतर भावना व्यक्त करताना सांगितले अजितदादा पवार यांच्या नेतृत्वावर आमचा संपूर्ण विश्वास आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षच जनतेच्या प्रश्नांवर ठोस आणि प्रामाणिक लढा देऊ शकतो. पक्ष संघटनेच्या माध्यमातून आम्ही जनतेशी जोडलेले राहून काम करणार आहोत असे मत व्यक्त केले.

यावेळी शहर कार्याध्यक्ष श्रीकांत शिवणक मुकेश रेवतकर, जानबा मस्के, संजय तिवारी, राजेश शुक्ला, भरत शर्मा, रिंकू मिश्रा, कार्तिक सिंग, ऋषी सिंग, रजत चव्हाण अनिल पौनिपगार, अर्चना गजबिये, संदीप सातपुते,आदि पदाधिकारी व कार्यकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष म्हणून अफजल फारूख यांची नियुक्ती



महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (राष्ट्रवादी) शरदचंद्र पवार गटाच्या अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष,अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष, अफजल फारूख यांना राष्ट्रवादी नागपूर शहराच्या वतीने त्यांच्या निवासस्थानी शुभेच्छा देण्यात आल्या. अलिकडेच मुंबईहून नागपूरला आल्यावर पक्षाच्या कार्यकर्त्यांनी त्यांची भेट घेतली आणि भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे (राष्ट्रवादी) कामगार माथाडी सेल नागपूर शहर अध्यक्ष वसीम लाला, उपाध्यक्ष शहजाद अन्सारी, प्रवक्ते शादाब खतीब,सरचिटणीस अफजल शेख, माजी नागपूर अध्यक्ष सलीम शेख, सामाजिक कार्यकर्ते अन्वर पटेल, मोहसीन कुरेशी, तौहीद अन्सारी, प्रशांत गाणेर, श्याम शाहू, इजाज शेख, मोहसीन कुरेशी आणि इतर पदाधिकारी आणि कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. नवनियुक्त राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभागाचे प्रदेशाध्यक्ष अफजल फारूख यांनी गृहमंत्री अनिल देशमुख यांचे आभार मानले.

# कामगार नगर येथे कोजागिरी कार्यक्रम संपन्न



महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :
रमना मारोती परिसरातील कामगार नगर येथे आयोजित कोजागिरी कार्यक्रमाचे नुकताच आयोजन करण्यात आले होते.यावेळी कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून आमदार अभिजित वंजारी यांची उपस्थिती होती. यावेळी सुगम संगीत व इतर खेळांचे सुद्धा आयोजन करण्यात आले होते. उपस्थितांनी नागरिकांना कोजागिरी पौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी नगरसेविका नयना झाडे, पुरुषोत्तम मुरमे, सुरेश जिचकार, जांभुळकर, प्रा संजय झाडे आदींची उपस्थिती होती.

## 'शैक्षणिक गुणवत्ता राखण्यात नागपूर विद्यापीठ असमर्थ : अभाविप'




नागपूर, दि. १५ :
गेल्या अनेक वर्षांपासून विद्यापीठाच्या कामकाजातील ढिसाळपणा, निष्क्रियता आणि विद्यार्थ्यांच्या विषयांवर विद्यापीठ प्रशासनाने गंभीरतेने लक्ष न देता विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करण्याचे काम विद्यापीठ प्रशासन करत आहे. अशी टीका या निष्काळजी वृत्तीमुळे हजारो विद्यार्थ्यांचे शैक्षणिक आयुष्य अंधारात जात आहे. वेळोवेळी समस्यांना घेऊन अखिल भारतीय विद्यार्थी परिषद सातत्याने आवाज उठवत आली आहे. विद्यार्थी हितासाठी निवेदन देण्यापासून तर आंदोलन करण्यापर्यंत सर्व पातळ्यांवर परिषदेने प्रयत्न केले, तरीही विद्यापीठ प्रशासनाने विद्यार्थ्यांच्या हिताचे ठोस निर्णय घेतलेले नाही. शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी महत्त्वाचे बिंदू म्हणजे प्रवेश, परिक्षा, परिणाम, पाठ्यक्रम व पदभरती म्हणून अखिल भारतीय विद्यार्थी परिषद आपल्या मागणी मध्ये सुद्धा म्हणते की 'ठीक करेंगे तीन काम प्रवेश परिक्षा और परिणाम'. परीक्षेच्या काळात हॉल तिकीटचे प्रश्न असो, परीक्षा केंद्रावरची असुविधा असो यामुळे परिक्षेच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. सर्व विषयांना लक्षात विद्यापीठ प्रशासनाच्या भोंगळ कारभाराच्या विरोधात विद्यापीठ स्तरीय मोर्चा काढणार, या मोर्चात प्रामुख्याने प्रवेश, परीक्षा, परिणाम, पाठ्यक्रम, पदभरती, शिष्यवृत्ती, वसतिगृह, छएझ क्रियान्वयन आणि अत्यंत महत्वाचे म्हणजे छात्र संघ निवडणुका ज्या अशा विविध विषयांचे समावेश आहे. त्यामुळे विद्यापीठ मोर्च्यात.दि. ०६ नोव्हेंबर ला महाविद्यालय बंद आंदोलन आणि,१३ नोव्हेंबर ला विद्यापीठ मोर्चा काढण्यात येणार आहे अशी माहिती पत्रकार परिषदेत विदर्भ प्रांत मंत्री पायल किनाके अनिकेत दांदडे ,वैष्णवी पांडेय , अनुज पवार ,ऋत्विक डोंगरवार यांनी दिली. त्यावेळी संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## स्थानिक स्वराज्य निवडणुकांसाठी भाजपा सज्ज : डी. मल्लिकार्जुन रेड्डी

महासागर प्रतिनिधी
रामटेक, दि. १५ :
भारतीय जनता पार्टी रामटेक विधानसभा क्षेत्राच्या वतीने आज दि १५ ऑक्टोंबर ला एक भव्य बैठक पार पडली. या बैठकीस माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी प्रामुख्याने उपस्थित होते. या बैठकीत आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा आढावा घेण्यात आला.

या वेळी बोलताना माजी आमदार रेड्डी यांनी सांगितले की, रामटेक व कन्हान नगरपरिषद तसेच कांद्री व पारशिवणी नगरपंचायतींमध्ये भारतीय जनता पार्टी ठामपणे अग्रेसर असून, त्या ठिकाणी पक्षाचे अध्यक्ष व नगरसेवक निवडणुकीच्या रिंगणात उतरतील.




तसेच त्यांनी स्पष्ट केले की, जिल्हा परिषद सर्कल मनसर, चाचेर, नगरधन, गोंडेगाव व टेकाडी येथे भारतीय जनता पार्टीचा विद्यमान दावा कायम आहे. मात्र, इतर ठिकाणी जर मित्रपक्षांसोबत प्रस्ताव आला, तर तो वरिष्ठ पातळीवर विचारात घेतला जाईल. ङ्गमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे,जिल्हाध्यक्ष आनंदराव राऊत, डॉ.राजीव पोद्दार यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील निवडणुकीबाबद निर्णय घेतले जातील आणि त्यानंतर आमचा विचार ठरेल, असे माजी आमदार मल्लिकार्जुन रेड्डी यांनी नमूद केले. या बैठकीतून रामटेक विधानसभा क्षेत्रात भारतीय जनता पार्टी पुन्हा एकदा संघटनाच्या बळावर विजय मिळवण्यासाठी सज्ज असल्याचे चित्र स्पष्ट दिसून आले.

या बैठकीला माजी आमदार डी. मल्लिकार्जुन रेड्डी,महामंत्री रिंकेश चावरे,माजी नगराध्यक्ष दिलीप देशमुख, संजय मुलमुले,डॉ. राजेश ठाकरे, ज्योती कोल्हेपरा, ज्ञानेश्वर ढोक, व्यंकट कारमोरे, रजत गजभिये, आलोक मानकर, सतीश डोंगरे, रवी चौहान, विशाल कामदार, योगेश म्हात्रे, संजय बीसमोगरे तसेच सर्व माजी नगरसेवक नगरसेविका भाजपचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सरकारचे 'मोटर वाहन ॲग्रीग्रेटर २०२५ नियमात, सुधारणाची मागणी

नागपूर : विदर्भ ॲप बेस्ड टॅक्सी युनियनने महाराष्ट्र शासनाच्या 'मोटर वाहन ॲग्रीगेटर नियम, २०२५'च्या जाहीर केलेल्या नियमांवर गंभीर आक्षेप घेतला आहे. युनियनचे अध्यक्ष दीपक साने यांनी ११ ऑक्टोबर २०२५ रोजी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, परिवहन आयुक्त आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांना पाठवलेल्या ई-मेलमध्ये(विषय: महाराष्ट्र सरकारचे 'मोटर वाहन अग्रीगेटर नियम, २०२५' चालकांच्या कल्याणासाठी आवश्यक सुधारणा आणि समावेशक धोरणाची मागणी) स्पष्टपणे नमूद केले आहे की, हे नियम प्रवाशांच्या सुरक्षेसाठी स्वागतार्ह असले तरी चालकांच्या कल्याणाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. शासन चालकांसोबत अन्याय करत आहे. या नियमांमध्ये आमच्या मेहनतीचे रक्षण करणारी एकही ठोस तरतूद नाही,' असे साने यांनी ई-मेलमध्ये म्हटले आहे.युनियनच्या प्रमुख मागण्या, खालीलप्रमाणे आहेत: भाडे नियमन: ठढज ने ठरविलेल्या दरांचा स्पष्ट उल्लेख आणि कंपन्यांना बंधनकारक करणे. पीक आवर्समध्ये दुप्पट दर चालकांना लाभ देणारे असावेत. कंपन्यांना कोर्टात जाण्यापासून रोखणारी तरतूद आणि पूर्ण दरपत्रक जोडणे.विमा संरक्षण: विमा दावे ३० दिवसांत मंजूर करणे अनिवार्य, चालकांना पॉलिसी कॉपी देणे आणि शासनाने सामूहिक विमा योजना राबवावी. स्थानिक कार्यालय आणि तक्रार निवारण: प्रत्येक जिल्ह्यात कंपन्यांचे कार्यालय आणि २४ तासांत तक्रार निराकरणाची यंत्रणा. तक्रारींमध्ये चालक आणि प्रवाशांची सुनावणी घेणे.

रिचार्ज पद्धत बंदी: ही अन्यायकारक पद्धत तात्काळ बंद करणे. पीक-अप मर्यादा: ५ किलोमीटरपर्यंत मर्यादित करणे. इमर्जन्सी प्रतिसाद: अपघातात १५ मिनिटांत कंपनी प्रतिनिधी घटनास्थळी पोहोचणे अनिवार्य आहे दिपक साने यांनी ई-मेलमध्ये म्हटले आहे, 'आम्ही अनावश्यक मागण्या करत नाही. मागण्या पूर्ण न झाल्यास , चालकांच्या संघर्षाला नवीन वळण मिळेल आणि आवश्यकता भासल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# ॲडीक्शन एक्सपर्टस अँड रिहॅबिलीटेशन सेंटरचा चौथा वर्धापन दिन उत्साहात साजरा




महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ :
व्यसनमुक्त भारत घडविण्याच्या उद्देशाने सतत कार्यरत असलेल्या ॲडीक्शन एक्सपर्टसब अँड रिहॅबिलीटेशन सेंटर तर्फे चौथा वर्धापन दिन वैशाली नगर येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या केंद्राच्या प्रमुख भाग्यश्री जांभुळकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला. मागील चार वर्षांपासून या केंद्रामार्फत दोन हजारांहून अधिक रुग्ण व्यसनमुक्त झाले आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटन पाचपावली पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक बाबुराव राठोड यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, तरुण पिढी व्यसनाच्या आहारी जाऊन आपले आरोग्य व भविष्य दोन्ही गमावत आहे. त्यामुळे व्यसनमुक्तीचे जनजागरण प्रत्येक तरुणाने स्वत:पासून सुरू केले पाहिजे.या कार्यक्रमाला रुजिता मानवंदे, सुनील जांभुळकर, गायत्री सूद, तसेच अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान व्यसनमुक्त झालेल्या तरुणांचा विशेष सन्मान करण्यात आला. त्यांना स्मृतिचिन्ह व मेडल प्रदान करून गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन सचिन अंबाडे, आयुष चव्हाण, अजुश बोडख, शैलेश निनावे, पिंटू महेश बेले, राहुल चव्हारे, उज्ज्वल चौधरी, नवीन कोटांगळे यांनी केले. विशेष उपस्थिती इंदुपाल गजभिये आणि भिस्मार लोंढे यांची होती. कार्यक्रमाचे संचालन बाबू जांभुळकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन भाग्यश्री जांभुळकर यांनी केले.

## पारंपरिक कला आणि आधुनिक फॅशनचा अद्भुत संगम



महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५
भारतातील अग्रगण्य ज्वेलरी ब्रँड तनिष्कने सणासुदीसाठी नवे आकर्षक कलेक्शन 'मृगांका' सादर केले आहे. या कलेक्शनमध्ये पौराणिक आणि कल्पनारम्य जगातून प्रेरणा घेऊन सोन्यात तरंगते राजवाडे, आकाशीय उद्याने आणि अलौकिक प्राणी साकारले गेले आहेत.

कुंदन, मीनाकारी, थ्रीडी आकृतिबंध आणि जटिल जाळीच्या लेयर्सच्या प्रगत तंत्रांचा बापर करून तयार केलेल्या या दागिन्यांमध्ये पारंपरिक कला आणि आधुनिक फॅशनचा अद्भुत संगम आहे.'मृगांका' कलेक्शन प्रत्येक परिधान करणाऱ्याला काल्पनिक आणि अलौकिक जगात घेऊन जाते, जिथे मिथक, कलात्मकता आणि सणासुदीच्या आनंदाची जाणीव एकत्रितपणे अनुभवता येते. या कलेक्शनसाठी माजी मिस वर्ल्ड आणि अभिनेत्री मानुषी छिल्लर यांची निवड करण्यात आली असून, तनिष्कने आधुनिक भारतीय महिलेसाठी सणासुदीच्या दागिन्यांची नवी व्याख्या सादर केली आहे.

# महावितरण कार्यालयात वीज देयकांची होळी

महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. १५ : वीज दरवाढ आणि स्मार्ट प्रीपेड मीटर विरोधात विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या कार्यकर्त्यांनी महावितरणच्या कार्यालयचीं वीज बिलाची होळी करून संताप व्यक्त केला. याप्रकरणी कोतवाली पोलिसांनी दोन कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले. महावितरणने १ ऑक्टोबर २०१५ ला प्रति युनिट ३५ ते ९५ पैसे दराने वीजेच्या बिलात दरवाढ केली आहे. दिवाळी सारख्या आनंदाच्या सणात महावितरणे ही दरवाढ करून विजेचा शॉक दिला आहे. त्यातच टीओडी मीटरच्या नावाखाली स्मार्ट प्रिपेड मीटर लावून जनतेला लुटण्याचे काम होत आहे. स्मार्ट मीटर आणि वीज दरवाढीच्या विरोधात विदर्भ राज्य आंदोलन समितीचे शहराध्यक्ष नरेश निमजे यांच्या नेतृत्वात महाल येथील शिवाजीनगर गेट ते तुळशीबाग महावितरण कार्यालयापर्यंत वीज मार्च काढण्यात आला. आंदोलकांना पाहून तुळशीबाग येथील महावितरण कार्यालयाचे मुख्य गेट लावण्यात आले. यावेळी समितीचे संतप्त कार्यकर्ते घोषणा देत धक्का देऊन गेटला उघडले आणि अधिकाऱ्यांची भेट घेण्यासाठी आत गेले. मात्र, तेथे कुणीही अधिकारी नसल्याने आंदोलक आक्रमक झाले. अधिकाऱ्यांना बोलवा अशी मागणी आंदोलकांनी केली. त्यानंतर तेथेच वीज बिलाची होळी करण्यात आली.

या आंदोलनात पोलिसांनी मुकेश मासुरकर आणि नरेश निमजे यांना ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या कार्यकर्त्यांना पोलिस सोडत नाही तोपर्यंत आम्ही जाणार नाही असा इशारा अरूण केदार आणि ज्योती खांडेकर यांनी दिला. पोलिसांनी दोघांचीही सुटका केल्यानंतर आंदोलक निघून गेले.

### रेल्वेतून पडून प्रवाशाचा मृत्यू

नागपूर, दि. १५
प्रवासादरम्यान रेल्वेतून खाली पडल्याने मंदारपाणी (झारखंड) येथील कार्तिक चंदू नगेशिया (५२) या प्रवाशाचा मृत्यू झाला. कार्तिक हा चेन्नई येथे कामाला होता. नागपूरला येऊन तो दुसऱ्या गाडीने रांची येथे जाणार होता. रेल्वेने जात असताना मंगळवारी सायंकाळी तो वैशालीनगर हद्दीत रेल्वे रूळावर जखमी अवस्थेत मिळून आला. पोलिसांनी त्याला मेडिकलमध्ये नेले असता डॉक्टरांनी मृत घोषित केले. कार्तिकच्या खिशात चेन्नई ते नागपूर आणि नागपूर ते चेन्नई अशी तिकीटे मिळाली. तो बहुतेक चुकीच्या गाडीत बसला असावा आणि गाडीतून उतरण्याच्या नादात पडला असता असा पोलिसांचा संशय आहे.

# दत्ता मेघे आयुर्वेद सेंटरच्या विद्यार्थ्यांची सिद्धायु आयुर्वेद रिसर्च सेंटरला शैक्षणिक भेट

■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. १५ :**

आमदार समीर मेघे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्राचार्या डॉ. हर्षला शर्मा व उपप्राचार्य डॉ. मोहन राऊत यांच्या सहयोगाने दत्ता मेघे आयुर्वेद सेंटर, नागपूर येथील विद्यार्थ्यांनी सिद्धायु आयुर्वेद रिसर्च सेंटर, नागपूर येथे शैक्षणिक भेट दिली. या भेटीदरम्यान डॉ. संतोष पुसदकर, डॉ. योगी ताजणे आणि डॉ. वास्वी तोटावार हे मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांसोबत उपस्थित होते. विद्यार्थ्यांना या निमित्ताने आयुर्वेद संशोधनाची सखोल माहिती मिळाली.रिसर्च सेंटरमधील




आधुनिक प्रयोगशाळा, औषध निर्मिती प्रक्रिया आणि गुणवत्ता नियंत्रणाच्या विविध टप्प्यांची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. तसेच संशोधन कार्य, नवनवीन आयुर्वेदिक उत्पादने विकसित करण्याची प्रक्रिया त्यांनी प्रत्यक्ष पाहिली.

डॉ. संतोष सुर्यकांत पुसदकर यांनी सांगितले की, आयुर्वेद ज्ञान आणि वैज्ञानिक संशोधन यांचे परस्पर संबंध समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. या भेटीमुळे विद्यार्थ्यांना औद्योगिक दृष्टीकोन आणि व्यावहारिक अनुभव दोन्ही मिळाले आहेत. संपूर्ण भेट शिक्षणदृष्ट्या अत्यंत उपयुक्त ठरल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. या अनुभवाचा उपयोग भविष्यातील वैद्यकीय प्रात्यक्षिकांमध्ये होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## दिलीप धोटे यांची धापेवाडा जिल्हा परिषद सर्कल करिता वाटचाल



**कळमेश्वर:** धापेवाडा येथील सामाजिक कार्यकर्ते व भारतीय जनता पक्षाचे नेते दिलीप धोटे यांची धापेवाडा जिल्हा परिषद करिता वाटचाल सुरू झाली आहे धापेवाडा जिल्हा परिषद सर्कल हे जनरल आल्याने तेथे त्यांना धावपळ सुरू केली आहे. दिलीप धोटे हे मागील अनेक वर्षापासून ग्रामपंचायत सदस्य त्यानंतर भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा तालुका अध्यक्ष भारतीय जनता पार्टी कळमेश्वर तालुका अध्यक्ष पाच वर्ष व नंतर ते कळमेश्वर पंचायत समिती सदस्य त्यानंतर धापेवाडा ग्रामपंचायत सदस्य त्यानंतर भाजपा किसान मोर्चा नागपूर जिल्हा अध्यक्ष पदही त्यांनी भुसावले पक्षाच्या विश्वास म्हणून मला पक्षाने कळमेश्वर तालुका अध्यक्षपदी निवड करण्यात आली या सर्व कार्यकर्ता शेतकऱ्याचे आंदोलन करिता नेहमी सज्ज असायचे या काळात पक्षाने कळमेश्वर तालुका अध्यक्ष भूषविले होते यावेळी शेतकऱ्यांचा करिता सहभाग व बरेच आंदोलन मध्ये मोर्चे काढून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्याचे का कार्य केले त्याच बरोबर मी शेतकऱ्यांना भाव मला मिळून देण्याकरिता आंदोलन करण्यात आले सावनेर विधानसभा क्षेत्राचे आमदार आशिष बाबू देशमुख यांच्या प्रचारा र्थ त्यांनी सक्रिय भाग घेऊन देशमुख साहेब यांना निवडून आणण्याचे प्रयत्न सुद्धा करण्यात आले त्याचप्रमाणे भारतीय जनता पक्ष पक्षाने धापेवाडा जिल्हा परिषद करिता जर माझ्यावर विश्वास टाकला तर व मला तिकीट दिली तर धापेवाडा जिल्हा परिषद करिता माझी लढण्याची तयारी आहे.

# त्रिभाषा धोरणाबाबत विमाशि संघाची ठाम भूमिका




■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. १५ :**

त्रिभाषा धोरण निश्चिती समितीसमोर नियोजन भवन, सदर येथे विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाने आपली ठाम व रोखठोक भूमिका मांडली. संघटनेच्या प्रतिनिधींनी सांगितले की, इयत्ता पहिलीपासून त्रिभाषा सूत्र लागू करणे योग्य ठरणार नाही. लहान वयात विद्यार्थ्यांवर अधिक विषयांचा भार पडतो, याची काळजी घेणे आवश्यक आहे. सध्या हिंदी भाषा पाचवीपासून शिकविली जाते. मुलांच्या कोवळ्या वयात दोन भाषाही नीट आत्मसात होत नाहीत, त्यात पुन्हा तिसऱ्या भाषेची भर टाकल्यास त्याचा शैक्षणिक दर्जावर विपरीत परिणाम होऊ शकतो, असे संघटनेने नमूद केले.

मराठी भाषेला अभिजात दर्जा प्राप्त झाल्यानंतरही तिसऱ्या भाषेचा समावेश करून मराठीचे महत्त्व कमी करण्याचे षड्यंत्र तर नाही ना, असा प्रश्नही संघटनेने उपस्थित केला. ही भूमिका आणि निवेदन त्रिभाषा धोरण निश्चिती समितीसमोर सादर करताना विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष रमेश काकडे, नागपूर जिल्हाध्यक्ष अनिल गोतमारे, नागपूर महानगर अध्यक्ष विठ्ठल जुनघरे, जिल्हा कार्यवाह, संजय बारकर, जिल्हा उपाध्यक्ष धनराज राऊत, तसेच जिल्हा सहकार्यवाह सचिन इंगोले , विजय चौधरी उपस्थित होते.

# शिवसेना उपजिल्हाप्रमुख मधु माणके पाटील यांच्या उपोषणाची घेतली दखल

■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. १५ :**

वाडी नगर परिषद अंतर्गत मँगोकीया ब्रदर्स प्रा. ली या कंपनीने संपूर्ण वाडीत भूमिगत मल निस्सारण वाहिण्यासाठी शहराचे सर्व चांगले गुळगुळीत पक्के रस्ते खोदून खराब केले. जून - जुलै २०२५ मध्ये रस्त्यावरील खड्ड्यामुळे सर्व वाडीकरांना ज्या अत्यंत वाईट व तितक्याच लज्यास्पद यातना भोगाव्या लागल्या त्यामुळे शिवसेना उपजिल्हाप्रमुख मधु माणके पाटील यांनी उपोषण करण्यासाठी अर्ज सादर केले. १४ जुलै २०२५ रोजी वाडी नगर प्रशासनाला त्यांनी लेखी कळवून वाडीला खड्ड्यात टाकणाऱ्या त्या मांगोकीया ब्रदर्स वर सात दिवसाच्या आत कार्यवाही करून सर्व रस्ते खड्डे मुक्त करा अन्यथा आमरण उपोषणाचा इशारा मधु माणके पाटील यांनी दिला. प्रशासन मात्र वेळ निघून गेल्यावरही सुस्तच होते. २३ जुलै २०२५ रोजी पुन्हा स्मरण पत्राद्वारे आम जनतेच्या जीवघेण्या त्रासाची दखल न घेतल्यामुळे आमरण




उपोषणाची तयारी सुरु केली असता मुख्याधिकाऱ्यांनी तसे न करण्याची विनंती केली. त्यावेळी शहरातील प्रतिष्ठित जाणकार व्यक्तीच्या उपस्थितीत रस्त्यावरील खड्ड्याच्या साक्षीने मुख्याधिकारी व न. प. वाडीच्या प्रशासनाने वाटाघाटी करीत मँगोकीया ब्रदर्स वर कार्यवाही करण्याचे मान्य केले. तेव्हा कुठे थातूर माथुर पणे रस्त्यावरील खड्डे बुजविण्यास सुरुवात झाली होती. परंतु या कार्याने नागरीक समाधानी नसल्यामुळे दत्ता कॉम्प्लेक्स ते हरी ओम सोसायटी व रामकृष्ण सभागृहा पर्यंत २० फूट रुंद कॉंक्रिट रस्ता तयार करून देण्याची मागणी त्यांनी लावून धरली.

तेव्हा वाडीकरांची दिवाळी खड्ड्यात जाऊ नये म्हणून दत्ता कॉम्प्लेक्स पासून सत्य साई सोसायटी पर्यंत तात्पुरत्या स्वरूपात डांबर रस्त्याच्या घोटाईसाठी रस्ता सफाई चे काम मंगळवार १४ ऑक्टोबर रोजी सुरु झाले आहे. या कार्यात प्रशासनाला धारेवार धरण्यासाठी सर्व पक्षीय नेते व पदाधिकारी शिवसेनेचे युवासेना राष्ट्रीय कार्यकारीणी सदस्य हर्षल काकडे, कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष अश्विन बैस,संतोष केचे, रुपेश झाडे, शैलेश थोराने पाटील, संजय जीवनकर,गौतम तिरपुडे, पंकज फलके बहुजन वंचित आघाडी दिनेश बन्सोड, भाऊराव रेवतकर, उमेश महाजन, राघोजी नागलवाडे, शंकर इखार, चंद्रशेखर येवले, मोहन ठाकरे, अमित हुसनापुरे, राजेश जिरापुरे जेम्स फ्रांसिस, शरद इंगळे आदींनी सहकार्य केले.

# डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त नबीरा महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

■ महासागर प्रतिनिधी,
**काटोल, दि. १५ :**



भारताचे माजी राष्ट्रपती व मिसाईल मॅन ऑफ इंडियाह्न म्हणून ओळखले जाणारे डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त नबीरा महाविद्यालय, काटोल येथे ङ्कवाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्ष व प्रमुख वक्ते डॉ. विकास बारसागडे यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात वाचन हे व्यक्तिमत्त्व विकासाचे मूळ साधन असल्याचे प्रतिपादन केले. डॉ. कलाम यांचे जीवन हे ज्ञान, मेहनत आणि सकारात्मक विचारांचे उत्कृष्ट उदाहरण आहे? सांगतानाच वाचनाचे महत्व व आपणही डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनातून प्रेरणा घेतली पाहिजे असेही त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. भारत कडबे यांनी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनाचा धावता आढावा घेऊन त्यांचे जीवन विद्यार्थ्यांसमोर मांडले. त्याच बरोबर वाचन संस्कृती जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. प्रा. विनोद वंजारी यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले. या प्रसंगी डॉ. दमयंती घागरगुंडे, प्रा. हरीश किनकर, प्रा. बेहनिया, प्रा. शिशिर कळंभे आणि प्रा. कल्याणी यांच्यासह अनेक प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गणित विभागप्रमुख डॉ. कटरे व विभागातील इतर प्राध्यापकांचा विशेष सहयोग लाभला.विद्यार्थ्यांनी या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदवाला.

## नागपूर विद्यापीठात उद्योजकता आणि आरोग्य प्रदर्शन आज

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात उद्योजकता आणि आरोग्य प्रदर्शनाचे आयोजन गुरुवार, दि. १६ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी ४:३० दरम्यान करण्यात आले आहे. पदव्युत्तर गृहविज्ञान विभागाच्या वतीने आयोजित या प्रदर्शनीत खाद्य पदार्थांची मेजवानी खवय्यांना मिळणार आहे. या सोबतच नाविन्यपूर्ण उपक्रम अंतर्गत विविध वस्तूंची प्रदर्शनी यादरम्यान केली जाणार आहे. या प्रदर्शनात विविध स्वरूपाच्या वस्तू विक्रीसाठी देखील उपलब्ध राहणार आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन माननीय कार्यकारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे चवरे (भाप्रसे) यांच्या शुभहस्ते होणार असून प्रभारी प्र-कुलगुरूडॉ. सुभाष कोंडावार, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, माजी विभाग प्रमुख डॉ. कल्पना जाधव यांची प्रामुख्याने उपस्थिती राहणार आहे. कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन विभाग प्रमुख डॉ. वंदना धवन यांनी केले आहे.

## प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेचा मुख्याध्यापकांच्या खिशावर ताण

### चार महीण्यापासून इंधन, भाजीपाल्याचे अनुदान थकीत

■ महासागर प्रतिनिधी
**वाडी, दि. १५ :**

शाळांमधून इयत्ता १ ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना देण्यात येत असलेल्या मध्यान्ह भोजनाच्या 'प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेचे' अनुदान मागील चार महिण्यापासून थकीत असल्यामुळे मुख्याध्यापकांची आर्थिक कुचंबणा होत असून त्यामुळे मुख्याध्यापकांमध्ये प्रचंड असंतोष पसरला असल्याचे दिसून येते. स्थानिक स्वराज्य संस्था तसेच खाजगी अनुदानित शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत शाळेत दररोज मध्यान्ह भोजन दिल्या जाते. योजनेसाठी आवश्यक धान्य व धान्यादी मालाचा पुरवठा शासनामार्फत होत असतो, परंतु इंधन, भाजीपाला व पुरक आहाराचा खर्च मात्र शाळा व्यवस्थापन समिती ला महिना अखेरीस उपलब्ध करून दिल्या जातो. इयत्ता १ ली ते ५ वी करिता प्रतिविद्यार्थी २.५९ रुपये तर इयत्ता ६ वी ते ८ वी ३.८८ रुपये अनुदान अनुज्ञेय असते. शासनाकडून हा निधी शाळांना उपलब्ध होईपर्यंत हा सर्व खर्च मुख्याध्यापकांना स्वताजवळून करावा लागतो.

परंतु मागील जून महीण्यापासून चार महीण्याचे अनुदान थकीत असल्याने या योजनेचा खर्च मुख्याध्यापकांना स्वताच्या खिशातून करावा लागत आहे. त्यामुळे मुख्याध्यापकां कडून संताप व्यक्त होत आहे.

# 'संघ गंगा के तीन भगीरथ' नाटकाचा सुवर्ण महोत्सवी ५० वा प्रयोग संपन्न

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. १५ :**

तारा राणी फाउंडेशन आणि राधिका क्रिएशन (नागपूर-पुणे)यांच्या संयुक्त विद्यमाने, लेखक श्रीधर गाडगे आणि दिग्दर्शक संजय पेंडसे यांच्या 'संघ गंगा के तीन भगीरथ' या हिंदी नाटकाचा सुवर्ण महोत्सवी (५०वा) प्रयोग १४ ऑक्टोबर रोजी रात्री ८ वाजता रवींद्र नाट्य मंदिर, मुंबई येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

या नाटकात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पहिले तीन सरसंघचालक यांच्या नेतृत्व, कर्तृत्व आणि विचारधारा यांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार, तर प्रमुख उपस्थिती राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल यांची होती. प्रारंभी संजय



पेंडसे यांनी प्रास्ताविक केले.यानंतर ॲड.आशिष शेलार यांनी सुवर्ण महोत्सवी सादरीकरणाबद्दल आयोजक संस्थांचे अभिनंदन करून व नाटकाचे अधिक प्रयोग राज्यभर करण्याचे आश्वासन दिले.

तसेच संघाच्या कार्यकुशलतेबद्दल गौरवोद्गार काढले. राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल यांनी आपल्या भाषणात रामटेकमधील राष्ट्रीय स्वयंसेवक संघातील अनुभवांबद्दल सांगितले. त्यांनी बालपणापासूनच संघाच्या शाळेत शिक्षण घेतल्याचे आणि त्या काळात मिळालेल्या संस्कारांचा प्रभाव आपल्या व्यक्तिमत्त्वावर आजही आहे, असे सांगून संस्थेच्या उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल प्रशंसा केली. या नाटकात मनीष उके (डॉ. हेडगेवार), ॲड. रमण सेनाड (परमपूज्य गुरुजी गोलवलकर), स्वप्निल जतकर, अनिल पालकर (महात्मा गांधी), तसेच मीनल मुंडले (भारत माता) यांनी प्रमुख भूमिका साकारल्या. 'संघ गंगा के तीन भगीरथ' या नाटकाच्या सुवर्ण महोत्सवी सादरीकरणाला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि सादरीकरणाची प्रशंसा करण्यात आली.

# विद्यार्थ्यांनी 'डिजिटल हायजीन' राखावे : श्रीया जोशी

## 'वर्ल्ड मेंटल हेल्थ डे २०२५' निमित्त मानसिक आरोग्यावर विशेष व्याख्यान

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. १५ :**

तरुण पिढीमध्ये स्क्रीनचा अति वापर वाढत असून त्यामुळे मानसिक आरोग्यावर परिणाम होत आहे. निरोगी भविष्यासाठी विद्यार्थ्यांनी तंत्रज्ञानाचा समतोल वापर करावा, डिजिटल हायजिन राखावे आणि भावनिक स्थैर्य वाढवावे, असे आवाहन द लिसनिंग स्पेसच्या संस्थापिका क्लिनिकल सायकॉलॉजिस्ट श्रीया जोशी यांनी केले. वसंतराव नाईक शासकीय कला आणि समाजशास्त्र संस्था, नागपूर येथील मानसशास्त्र विभागाच्या वतीने, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ अध्ययन केंद्र आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष



यांच्या सहकार्याने 'वर्ल्ड मेंटल हेल्थ डे २०२५' निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या डिजिटल डिटॉक्स अँड मेंटल हेल्थ : व्हाय कॉलेज स्टुडंट नीड द स्काय' या विषयावर बोलत होते. कार्यक्रमाला संस्थेचे संचालक डॉ. मनोहर कांबळे, मानसशास्त्र विभाग प्रमुख डॉ. शफीक पठाण व सह-संयोजक डॉ. अश्विन जयस्वाल यांची उपस्थिती होती. श्रीया जोशी यांनी प्रत्यक्ष मानवी संवाद, निसर्गाशी नाते आणि सजग जीवनशैली अंगीकारण्याचे महत्त्व यावेळी अधोरेखीत केले. कार्यक्रमाला विद्यार्थी व आणि शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.



# नागपूर विद्यापीठात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जयंती

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. १५ :**

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांची जयंती राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ बुधवार, दि. १५ ऑक्टोबर २०२५ रोजी साजरी करण्यात आली. जमनालाल बजाज प्रशासकीय भवनातील सभागृहात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला सामान्य प्रशासन विभागाचे प्रभारी उपकुलसचिव गणेश कुमकुमवार यांच्या शुभहस्ते माल्यार्पण करण्यात आले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे प्रभारी अधिक्षक शैलेश राठोड, जनसंपर्क अधिकारी प्रेमदास वाडकर यांच्यासह अन्य कर्मचारी उपस्थित होते.

# नागपूर मंडळातील टॉवर वॅगनवर अत्याधुनिक सीसीटीव्ही सर्व्हेलन्स प्रणालीची स्थापना

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. १५ :** मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने ट्रॅक्शन डिस्ट्रीब्युशन (ढठऊ) विभागांतर्गत तांत्रिक निरीक्षण आणि कार्यपद्धतीतील पारदर्शकता वाढविण्यासाठी आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. विभागातील १४, आठ चाकी टॉवर वॅगनवर अत्याधुनिक ३६0 सीसीटीव्ही सर्व्हेलन्स प्रणाली बसविण्यात आली आहे.

या प्रणालीद्वारे अधिकारी व पर्यवेक्षक आता देखभालीच्या नियमित कामांदरम्यान तसेच आकस्मिक दुरुस्तीच्या कामांदरम्यान



टॉवर वॅगनवर कार्यरत कर्मचाऱ्यांचे कामकाज थेट पाहू व रेकॉर्ड करू शकतात. यामुळे कार्याची पारदर्शकता वाढते, तसेच आवश्यकतेनुसार तात्काळ सूचना व मार्गदर्शन देणे सुलभ होते. या प्रणालीची खास वैशिष्ट्ये म्हणजे सर्व टॉवर वॅगनवरील कॅमेरे एकाच लॉगिन आयडीखाली एकत्रित करण्यात आले आहेत. त्यामुळे सर्व व्हिडिओ फीड एकाच वेळी आणि कोणत्याही ठिकाणाहून पाहणे शक्य झाले आहे. या केंद्रीकृत मॉनिटरिंग व्यवस्थेमुळे कामाचे समन्वयन, कार्यक्षमता आणि आकस्मिक परिस्थितीतील प्रतिसादक्षमता अधिक मजबूत झाली आहे. सीसीटीव्ही प्रणालीच्या स्थापनेमुळे सुरक्षा, पारदर्शकता आणि देखरेखीत मोठी सुधारणा झाली असून ही तांत्रिक उन्नती नागपूर मंडळासाठी एक उल्लेखनीय टप्पा ठरली आहे. मध्य रेल्वेचा हा उपक्रम सुरक्षा, डिजिटलायझेशन आणि तांत्रिक नवोन्मेषाच्या दिशेने आणखी एक यशस्वी पाऊल आहे.

# आम आदमी पार्टी, नागपूर तर्फे मूक आंदोलन




■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ :** सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सी.जे.आय.भूषण गवई यांच्यावर झालेल्या हल्ल्याच्या निषेधार्थ आम आदमी पार्टी, नागपूर यांच्या वतीने १४ ऑक्टोबरला संविधान चौक, नागपूर येथे मूक आंदोलन करण्यात आले. हल्ल्याचा निषेध व्यक्त करून लोकशाही व संविधानाच्या संरक्षणाचा संदेश देण्यात आला.

# सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविणाऱ्या ८६ प्रकरणांची नोंद

## उपद्रव शोध पथकाची धडक कारवाई

■ महासागर प्रतिनिधी
**नागपूर, दि. १५ :**

नागपूर महानगरपालिकेच्या उपद्रव शोध पथकाने सार्वजनिक ठिकाणी लघुशंका करणाऱ्यांवर, कचरा फेकणाऱ्यांवर, थुंकणाऱ्यांवर, ७९ मायक्रॉन पेक्षा कमी प्लास्टिक पिशवीचा वापर करणाऱ्यांवर अधिक कठोर कारवाई ची सुरुवात केली आहे. बुधवार (ता.१५) रोजी शोध पथकाने ८६ प्रकरणांची नोंद करून ४७,२००/-रुपयाचा दंड वसूल केला. हाथगाडया, स्टॉल्स, पानठेले, फेरीवाले, छोटे भाजी विक्रेते यांनी लगतच्या परिसरात अस्वच्छता (रु. ४००/- दंड) या अंतर्गत २८ प्रकरणांची नोंद करून ११,२००/-रुपयांची वसुली करण्यात आली. व्यक्तीने रस्ता फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत २ प्रकरणाची नोंद करून रू.२०० रूपयाची वसुली करण्यात आली.दुकानदाराने रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा अशा ठिकाणी कचरा टाकणे (रु. ४००/-दंड) या अंतर्गत १० प्रकरणांची नोंद करून ४,०००/-रुपयांची वसुली करण्यात आली. मॉल, उपहारगृहे, लॉजिंग, बोर्डिंगचे हॉटेल, सिनेमाहॉल, मंगल कार्यालये, कॅटरर्स सर्व्हिस प्रोव्हायडर इत्यादींनी रस्ता, फुटपाथ मोकळी जागा, अशा ठिकाणी कचरा टाकणे या अंतर्गत २ प्रकरणाची नोंद



करून रू.४,००० रूपयाची वसुली करण्यात आली. वाहतूकीचा रस्ता मंडप, कमान, स्टेज इत्यादी रचना करुन अथवा वैयक्तिक कामाकरीता बंद करणे या अंतर्गत १६ प्रकरणांची नोंद करून ११,०००/-रुपयांची वसुली करण्यात आली. सार्वजनिक रस्ता, फुटपाथ, मोकळी जागा इत्यादी ठिकाणी बांधकामाचा मलबा/टाकावून कचरा टाकणे/साठवणे या अंतर्गत २ प्रकरणांची नोंद करून २,०००/-रुपयांची वसुली करण्यात आली.

उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव व्यक्ती असल्यास १४ प्रकरणांची नोंद करून २,८००/-दंड वसूल करण्यात आलेला आहे. उपरोक्त यादीत न आढळणारे इतर उपद्रव संस्था असल्यास १२ प्रकरणांची नोंद करून १२,०००/- दंड वसूल करण्यात आलेला आहे. ही कारवाई उपद्रव शोध पथक प्रमुख वीरसेन तांबे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. तसेच उपद्रव शोध पथकाने लक्ष्मीनगर झोन अंतर्गत मे.गजानन हाईटस यांनी सी ॲण्ड डी वेस्ट फुटपाथवर टाकल्याप्रकरणी ५,०००/- हजार रुपयांचा दंड वसूल केला. धरमपेठ झोन अंतर्गत मे. सन सोलर एनर्जी यांनी विनापरवानगी विद्युत खांबांवर जाहिरातीचे बॅनर लावल्याप्रकरणी ५,०००/-हजाररुपयांचा दंड वसुल केला. गांधीबाग झोन अंतर्गत मे. गंगा स्वीटस यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल ५,०००/-हजार रुपयांचा दंड वसुल केला. सतरंजीपुरा झोन अंतर्गत मे.रोशी स्वीटस यांनी प्लास्टिक पिशवीचा वापर केल्याबद्दल ५,०००/-हजार रुपयांचा दंड वसूल केला.

मंगळवारी झोन अंतर्गत मे. बॉम्बे कार लिंग यांनी कचरा जाळल्याप्रकरणी व फुटपाथवर दुकान सजविल्यामुळे रु.५,००० दंड वसुल करण्यात आले. उपद्रव शोध पथकाने ५ प्रकरणांची नोंद करून रू. २५,०००/-दंड वसूल केला.

# जनतेच्या विश्वासाला तडा जावू देणार नाही!

संघटन अभियान व कार्यकर्ता मेळाव्यात राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांची ग्वाही



■ महासागर प्रतिनिधी, मौदा, दि. १५ : रामटेक लोकसभा निवडणुकीतील पराभव विसरून शिवसेना कार्यकर्त्यांनी आगामी निवडणुकीत जोमाने कामाला लागावे आणि विरोधकांचे फेक नरेटीव्ह खोडून काढून आपल्या केंद्र व राज्य सरकारने जनकल्याणासाठी राबविलेल्या सोयीसुविधा, सवलती, जन कल्याणकारी योजना शिवसैनिकांनी प्रत्येकांच्या घरोघरी जावून जनतेपर्यंत जाऊन सांगाव्यात, असे आवाहन करीत जनतेने माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला मी तडा जावू देणार नाही, अशी ग्वाही राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी दिली.

शिवप्रतिक सेलिब्रेशन लॉन मौदा येथे आयोजित शिवसेनेचे संघटन अभियान व कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. ॲड. जयस्वाल पुढे म्हणाले, जशी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना आहे, तशी मुख्यमंत्री माझी सुरक्षित बहीण योजनादेखील आमची आहे. पुढे होऊ घातलेल्या निवडणूकीत शिवसेना कार्यकर्त्यांनी जिल्ह्यातील संपूर्ण जागा महायुतीच्या पारड्यात येण्यासाठी परिश्रमाची पराकाष्टा करून विजयश्री खेचून आणावी.

हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे ज्वलंत हिंदूत्वाचे विचार घराघरात पोहचावे यासाठी व आगामी निवडणुकीसाठी प्रत्येक कार्यकर्त्यांनी सक्रिय व्हावे असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी जिल्हा संघटिका करूणा आष्टनकर, माजी जि. प. सभापती हर्षवर्धन निकोसे, न. पं. पारशिवणी गटनेता दीपक शिवणकर, शिवसेना तालुका प्रमुख प्रशांत भुरे, माजी जि. प. सभापती नंदा लोहबरे, नागपूर ग्रामीण तालुका प्रमुख रंजीत लाडस्कर, तालुका संघटिका रंजना पिसे, माजी तालुका प्रमूख सदुकर हटवार, युवासेना तालुका प्रमुख रुषभ बावणे, युवासेना तालुका प्रमुख शुभम गभने, माजी पं. स.सभापती मनोज कोठे, माजी उपसभापती महेश मोटघरे, माजी उपसभापती रक्षा थोटे, श्रीहरी थोटे, रामपाल किरपान, मनोज गहेरवार, पुंडलिक गिरेपुंजे, महेंद्र चकोले, बंडू सावें, अरविंद तांबुलकर, महेंद्र शेंडे, विकास झाडे, स्वप्नील भोयर, शहर संघटिका वंदना बुरडे, शहर प्रमुख पिंटू धनजोडे, अभी बडे व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यापसंगी तालुक्यातील विविध पक्षातील शेकडो कार्यकर्त्यांनी ॲड. जयस्वाल यांच्या नेतृत्वात शिवसेनेत प्रवेश केला. या कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना तालुका प्रमुख नितेश वांगे यांनी केले होते. आगामी निवडणुकीत आम्ही ताकद पणाला लावू, तालुक्यात दोन ते तीन मेळावे होणार आहेत, अशा बैठकांमुळे वेगळे बळ निर्माण होईल, ॲड. आशिष जयस्वाल अजिंक्य योध्दा आहेत, असे सांगत शिवसेनेच्या माध्यमातून घराघरात पोहाचावे लागेल, असे नितेश वांगे यावेळी म्हणाले.

## ६ नोव्हेंबरला जाहीर होणार
# प्रारूप मतदार यादी

नागपूर मनपा निवडणूक

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १५ : मतदार यादीतील घोळ, बोगस मतदारांची नोंद आणि अनेक पात्र नागरिकांची नावे वगळण्याच्या प्रकारांवर विरोधकांनी आक्रमक भूमिका घेतली आहे.

कॉंग्रेस नेते राहुल गांधी यांनी नुकताच राष्ट्रीय स्तरावर हा मुद्दा उपस्थित केल्यानंतर, महाराष्ट्रातील महाविकास आघाडीकडूनही यावर जोरदार आवाज उठवण्यात आला आहे. राज्य निवडणूक आयोगाकडे या संदर्भात तक्रारी सादर करण्यात आल्या असून, आयोगाने अद्याप समाधानकारक उत्तर दिलेले नाही, अशी टीका करण्यात येत आहे.

या पार्श्वभूमीवर नागपूर महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी ६ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रारूप मतदार यादी जाहीर होणार आहे. १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदार यादीच्या आधारे ही यादी तयार केली जात आहे.

यावर हरकती व सूचना दाखल करण्यासाठी १४ नोव्हेंबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. विरोधकांनी मतदार यादीतील पारदर्शकता सुनिश्चित करण्याची मागणी केली असून, नागरिकांनीही यादीतील आपली नावे काळजीपूर्वक तपासण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

नागपूर महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी आवश्यक तयारीला वेग आला आहे. राज्य निवडणूक आयोगाने नागपूर महापालिकेसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम नुकताच जाहीर केला आहे. त्यानुसार, येत्या ६ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.

मनपाच्या निवडणुकीसाठी प्रभाग रचना आधीच अंतिम करण्यात आली आहे. आता १ जुलै २०२५ रोजी अस्तित्वात असलेल्या विधानसभा मतदार यादीच्या आधारे प्रभागनिहाय प्रारूप मतदार यादी तयार करण्यात येत आहे.

ही यादी जाहीर केल्यानंतर नागरिकांना हरकती व सूचना नोंदवण्याची अंतिम तारीख १४ नोव्हेंबर २०२५ पर्यंत दिली जाणार आहे. त्यानंतर, प्राप्त हरकती व सूचनांचा विचार करून २८ नोव्हेंबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल.

गेल्या काही निवडणुकांमध्ये मतदार यादीतील गोंधळाचे प्रकार उघडकीस आले होते. काही ठिकाणी मतदारसंख्येत अचानक वाढ, तर काही ठिकाणी नावे गहाळ होण्याचे प्रकार निदर्शनास आले होते. त्यामुळे यंदा यादी तयार करताना अधिक काटेकोरपणे प्रक्रिया राबवण्यात येत आहे. प्रारूप यादीवर नागरिकांनी तक्रारी केल्यास त्या तपासून योग्य त्या दुरुस्त्या करण्यात येणार आहेत.

राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी दिलेल्या माहितीनुसार, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी स्वतंत्र मतदार यादी तयार केली जात नाही. त्याऐवजी, विधानसभेच्या यादीचा आधार घेत प्रभागनिहाय यादी तयार केली जाते. याद्वारे महापालिकेच्या निवडणुकीतील पारदर्शकता आणि अचूकता राखली जाणार आहे.

यापुढील टप्प्यात, ४ डिसेंबर २०२५ रोजी मतदान केंद्रांची यादी, तर १० डिसेंबर २०२५ रोजी मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे.मतदारांनी आपली नावे यादीत तपासून आवश्यक असल्यास हरकती निर्धारीत वेळेत नोंदवाव्यात, असे आवाहन नागपूर महापालिकेकडून करण्यात आले आहे. योग्य आणि अद्ययावत मतदार यादी हा निवडणुकीच्या पारदर्शकतेचा मुख्य आधार असल्यामुळे या प्रक्रियेकडे नागरिकांनी गांभीर्याने पाहावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



■ नागपूर : दिवाळीचा सण तोंडावर आला असून, कपडे, सजावट साहित्य आणि इतर प्रकारची खरेदी करण्यासाठी बाजारात प्रचंड गर्दी होवू लागली आहे, खरेदीसाठी बाहेर पडलेल्या नागरिकांमुळे महाल, सिताबर्डी, आणि शहराच्या सर्वच भागात वाहतुकीची प्रचंड कोंडी होत असल्याचे दिसून येते.

## सोबत पालकत्व प्रकल्पाचा
# दिवाळी मिलन सोहळा आज

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ : श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्ट, नागपूर संचालित सोबत पालकत्व प्रकल्पातर्फे आज १६ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता लक्ष्मीनगरातील जेरील लॉन येथे दिवाळी मिलन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विभागीय आयुक्त श्रीमती विजयलक्ष्मी बिदरी आणि नागपूरचे पोलिस आयुक्त रवींद्र सिंघल उपस्थित राहतील. समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, ह्यसोबत पालकत्व प्रकल्पाशी संलग्न पालक, बालक व स्वयंसेवक या सोहळ्यात सहभागी होणार आहेत.

दरवर्षी दिवाळीच्या पार्श्वभूमीवर सोबत पालकत्व प्रकल्पातर्फे आयोजित हा उपक्रम समाजातील पालकत्व हरवलेल्या मुलांसाठी आनंद, आधार आणि आपलेपणाचा संदेश देणारा ठरतो. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे आमंत्रक श्री सिद्धिविनायक सेवा ट्रस्टचे अध्यक्ष आमदार संदीप जोशी आणि कार्यक्रमाचे संयोजक अनंत टोळ, ज्योत्स्ना कुऱ्हेकर, प्रकाश रथकंठीवार, प्रणय मोहबंशी आणि प्रणव घुगरे यांनी केले आहे.

# रेल्वेचा लाचखोर अधीक्षक जाळ्यात

■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १५ : मध्य रेल्वेत कार्यरत एका मृत कामगाराच्या कुटुंबियांकडून पेंशन लागू करण्यासाठी २५ हजाराची लाच घेणाड्या मध्य रेल्वेच्या मुख्य अधीक्षकाला सतर्क विभागाच्या पथकाने रंगेहात पकडले. रोशन कुंभलवार असे या मुख्य अधीक्षकाचे नाव आहे.

मध्य रेल्वेतील एक कर्मचारी काही दिवसांपूर्वी मृत झाला होता. त्याच्या कुटुंबियांनी फॅमिली पेंशन सुरू करावी यासाठी कुंभलवार यांच्याशी संपर्क केला होता. त्यावेळी कुंभलवार यांनी २५ हजाराची लाचेची मागणी केली होती.

मृत कामगाराच्या पत्नीला लाच देण्याची इच्छा नव्हती. त्यामुळे तिने सतर्कता विभागाकडे तक्रार केली होती. सतर्कता विभागाच्या अधिकाड्यांनी खात्री केल्यानंतर मध्य रेल्वेच्या डीआरएम कार्यालयात सापळा रचला. दुपारी कुंभलवार यांनी पीडित तक्रारदार महिलेकडून २५ हजार रुपये घेतले आणि तो आपल्या खुर्चीत जाऊन बसला. तोच दबा धरून बसलेल्या सतर्कता विभागाच्या पथकाने त्याला रंगेहात पकडले. त्याच्या खिशातून सरकारी नोटा जप्त करण्यात आल्या.

रेल्वेत नोकरीला असलेल्या कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्यास त्याची पत्नी, विधवा मुलगी, अल्पवयीन मुले किंवा परित्यक्ता मुलींना कौटुंबिक निवृत्ती वेतन (फॅमेली पेंशन) मिळण्याची तरतूद आहे.

मात्र, प्रत्यक्षात ही प्रक्रिया सोपी नाही. रेल्वेच्या कार्मिक विभागामार्फत पेंशन मिळविण्यासाठी मृत कर्मचाड्यांचे संबंधित लाभार्थ्यांसोबतचे नाते सिद्ध करणे अनिवार्य असते. यासाठी अनावश्यक कागदपत्रांची मागणी केली जाते. त्यामुळे लाभार्थ्यांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागतो, असे अनेक पीडित वारसदारांचे म्हणणे आहे.

## कळमेश्वर तालुक्यातील
# जि. प., पं. स. आरक्षण जाहीर

■ महासागर प्रतिनिधी, कळमेश्वर, दि. १५ : कळमेश्वर तालुक्यातील सर्व नेते व कार्यकर्त्यांचे लक्ष लागून असलेल्या ग्रामीण स्तरावरील जिल्हा परिषद व पंचायत समिती गट व गणांचे आरक्षण आज जाहीर करण्यात आले.

त्यामध्ये तेलकामठी सर्कलचे आरक्षण इतर मागासवर्गीय महिलांसाठी आरक्षित करण्यात आलेले आहे.कळमेश्वर तालुक्यातील सर्वात बहुचर्चित असे सर्कल राहिलेले धापेवाडा सर्कल यावेळेस सर्वसाधारण करिता आरक्षित झालेले आहे.

या ठिकाणी महिला व पुरुष दोघेही निवडणूक लढू शकतात. कळमेश्वर तालुक्यातील तिसरे सर्कल असलेले गोंडखैरी सर्कल हे इतर मागासवर्गीय महिलांकरिता राखीव झालेले आहे. तर पंचायत समितीमध्ये तेलकामठी गण सर्वसाधारण करीता, कोहळी गण सर्वसाधारण करिता, गोंडखैरी गण ओबीसी महिला करिता, सेलू गण अनुसूचित जाती महिला करिता, धापेवाडा गण अनुसूचित जमाती महिला करिता तर उबाळी गण सर्वसाधारण करिता आरक्षित करण्यात आलेले आहे.

# मानवाधिकार पायदळी तुडवले..

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ : शैक्षणिकदृष्ट्या प्रगत दिसणाऱ्या तामिळनाडूचा खरा चेहरा दलितविरोधी असून, राज्यात मानवाधिकारांचे उल्लंघन होत आहे, अशी टीका चेन्नई येथील एमआयडीएस विद्यापीठाचे राज्यशास्त्राचे माजी प्राध्यापक सी. लक्ष्मणन यांनी केली.

केंद्रीय गुन्हे तपास यंत्रणांच्या अहवालानुसार, अॅट्रॉसिटीच्या घटनांमध्ये तामिळनाडू दुसऱ्या स्थानावर आहे. सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रांत मागासवर्गीयांना स्थान दिले जात नाही, तसेच शासनविरोधी भूमिका घेणाऱ्या दलितांवर कारवाई केली जाते, असेही लक्ष्मणन म्हणाले. ते नागपुरात रिपब्लिकन फेडरेशनतर्फे आयोजित चर्चेत बोलत होते.

प्रा. लक्ष्मणन यांनी सांगितले की, तामिळनाडूमध्ये दलित अत्याचारांनी परिसीमा गाठली आहे. विषारी दारूच्या घटनांमध्ये दलितच बळी पडतात. द्रविडी क्रांतीची प्रतिमा असलेल्या या राज्यात कामगार कायदे पायदळी तुडवले जात आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही हजारो कंत्राटी कर्मचाऱ्यांना किमान वेतन दिले जात नाही. 'जस्टिस पार्टी' सत्तेत असताना दलितांचे प्रमाण ६० टक्के होते, ते आता कमी होत आहे.

सरकार एसईझेडसाठी हजारो एकर जमीन देते, परंतु गरिबांना भूदान देण्यासाठी जमीन नसल्याचे सांगते. राज्यातील राजकीय, न्याय आणि प्रशासकीय यंत्रणा, विशेषतः पोलीस यंत्रणा जातीयवादी मानसिकतेतून काम करत आहे. माध्यमे, न्यायव्यवस्था किंवा प्रशासन दलितांच्या प्रश्नांवर ठोस भूमिका घेत नसल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. यावेळी रिपब्लिकन फेडरेशनचे मिलिंद पखाले, डॉ. एस.के. गजभिये, छाया खोब्रागडे, भारती सहारे, नरेश वाहाणे, नरेंद्र धनविजय, विशाल वानखेडे, अनिल वालदे यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

तामिळनाडूत मागासवर्गीय मंत्रालय अस्तित्वात नाही, त्यामुळे अनुसूचित जाती, जमाती उपयोजना निधीचा प्रश्न निर्माण होतो. गेल्या १० वर्षांपासून अनुसूचित जाती, जमातीच्या ३ हजार पदांची नोकरभरती बंद आहे. पेरियार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव आज कुठेही दिसत नाही, जे होते ते पुसले जात आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

# नागरिकांच्या प्रदीर्घ लढ्यानंतर वाहतूक सुरू



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १५ : दीर्घ संघर्ष आणि नागरिकांच्या सतत आंदोलनानंतर टेलिफोननगर चौक अखेर वाहतुकीसाठी खुला करण्यात आला.

इंदोरा ते दिघोरी रस्त्यावर बांधकाम सुरू असलेल्या उड्डाणपुलामुळे भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने उमरेड रस्त्यावर गर्डर टाकून टेलिफोननगर चौकात अडवणूक केली होती. त्यामुळे दिघोरी आणि नरसाळा परिसरातील वाहनांची वाहतूक पूर्णपणे थांबली होती. परिणामी नागरिक व व्यापाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला. ही समस्या सोडवण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते नितीन तिवारी यांच्या नेतृत्वाखाली संघर्ष समिती स्थापन करण्यात आली.

समितीने एनएचएआयविरुद्ध आंदोलन केले, निषेध केला. चौकातील बांधकाम थांबवून गर्डरवर एनएचएआयविरोधात बॅनर लावत जोरदार निदर्शने केली. चौक लवकरच पुन्हा सुरू केला नाही तर रस्ता रोको आंदोलन सुरू केले जाईल, असा. इशारा समितीने दिला होता.तीव्रता आणि वाढता जनक्षोभ पाहून आमदार मोहन मते यांनी एनएचएआय अधिकाऱ्यांना फटकारले. त्यानंतर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत त्यांनी एनएचएआय अधिकाऱ्यांना हा चौक त्वरित पन्हा सरू करण्याचे निर्देश दिले. कंत्राटदाराने दिल्लीहून एक विशेष पुलर मशीन आणून गर्डर काढण्यास सुरुवात केली आणि चौक पुन्हा सुरू करण्यात आला.

या निर्णयाचा मोठ्या प्रमाणात आनंद झाला. नितीन तिवारी यांच्या नेतृत्वाखाली संघर्ष समितीचे सदस्य आणि स्थानिक नागरिकांनी गुलाल उधळत आनंद साजरा केला. केशव तिवारी, प्रीतम कापसे, डॉ. कोसरकर, शशिधर तिवारी, राम राचलवार, छोटू बाविस्कर,ललित भोयर, बाळू भोरले, अरुण लांडे, रोशन काडे, मंगेश तोंडलवार, मिथुन कुकडे, शेखर छुटे आणि आशिष सरोदे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

# फुटपाथ खचल्याने मोठा खड्डा



अपघाताचा धोका

महासागर
प्रभाग वार्ता

■ प्रमोद जांभूळकर इंदोरा (प्रभाग ७), नागपूर, दि. १५ : शेरे पंजाब चौकापासून पंचशील नगरकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर चांभार नाल्यालगत असलेला फुटपाथ पूर्णपणे धसल्याने मोठा खड्डा निर्माण झाला आहे. या खड्डयामुळे परिसरातील नागरिकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे. अंधारात हा खड्डा लक्षात येणे कठीण असल्याने कोणत्याही क्षणी मोठा अपघात होण्याची शक्यता आहे.

दररोज या मार्गावरून अनेक विद्यार्थी शाळा व महाविद्यालयांकडे ये-जा करतात. जनावरे देखील या खड्डयात पडू शकतात, अशा वेळी हा खड्डा जीवघेणा ठरू शकतो, अशी भीती स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे.

सुरेश पाटील, संजय फुलझेले, अजय सहारे, विलास नितनवरे, प्रसन्ना सहारे, नवीन शहारे, भूषण नाईक, प्रभू गजभिये, प्रशांत साखरे, भूषण रामटेके, राजेश जांभूळकर, जयेश गेडाम आणि राज कोटांगळे आदी नागरिकांनी संबंधित विभागाचे तातडीने लक्ष वेधले आहे.

कोणताही मोठा अनर्थ होण्यापूर्वी प्रशासनाने हा खड्डा तातडीने बुजवावा, फुटपाथ पूर्ववत करावा आणि त्या ठिकाणी फलक व प्रकाशव्यवस्था करावी अशी मागणी नागरिकांनी केली आहे. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास नागरिक तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# मध्य रेल्वे नागपूर विभागात स्वच्छता पंधरवाड्याचा समारोप




■ महासागर प्रतिनिधी नागपूर, दि. १५ : मध्य रेल्वेच्या नागपूर विभागात स्वच्छता पंधरवडा २०२५ उत्साहात साजरा करण्यात आला. पुनरावलोकन, विवरण आणि स्वच्छता जनजागृती रॅली या विषयावर हा दिवस साजरा करण्यात आला.

या निमित्ताने १५ दिवस चाललेल्या स्वच्छता अभियानाच्या यशस्वी उपक्रमांचे पुनरावलोकन करण्यात आले आणि जनतेमध्ये स्वच्छतेबद्दल जागरूकता निर्माण करण्यात आली.

डीआरएम कार्यालय, नागपूर येथे विभागीय रेल्वे व्यवस्थापक विनायक गर्ग यांच्या अध्यक्षतेखाली पुनरावलोकन बैठक घेण्यात आली. या बैठकीस अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (प्रशासन) अमोलकुमार पिंगळे, अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक (तांत्रिक) अरुणकुमार सिंह, शाखा अधिकारी तसेच विविध विभागांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सर्व विभागांकडून प्राप्त झालेल्या अहवालांच्या आधारे स्वच्छता पंधरवड्याच्या उपक्रमांचे सविस्तर पुनरावलोकन करण्यात आले. डीआरएम गर्ग यांनी अधिकाऱ्यांना निर्देश दिले की पंधरवडा संपल्यानंतरही स्वच्छतेचे आणि जनसहभागाचे हे स्तर संपूर्ण वर्षभर कायम ठेवावेत.

अभियानाच्या समारोपानिमित्त नागपूर रेल्वे स्थानक ते डीआरएम कार्यालयापर्यंत स्वच्छता जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या रॅलीत रेल्वे अधिकारी, कर्मचारी, स्काऊट्स अँड गाईड्स, आरपीएफ कर्मचारी तसेच स्वच्छता कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. सहभागी सदस्यांनी स्वच्छ रेल निरोगी भारत आणि स्वच्छता ही सर्वांची जबाबदारी अशा घोषणांद्वारे जनजागृतीचा संदेश दिला.

स्वच्छता पंधरवाड्याच्या पंधराव्या दिवशी नागपूर विभागाने स्वच्छ भारताच्या संकल्पाला अधिक बळकट करत स्वच्छता आणि पर्यावरण संरक्षणाबद्दलची आपली सातत्यपूर्ण बांधिलकी पुन्हा दृढ केली.